इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक – २८ ■ वर्ष – ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर – सांगली – सातारा – बेळगांव

## इबोलाची लक्षणे आढळल्याने व्यापारी आयसोलेशनमध्ये

**गांधीनगर,ता.२८–**

**आफ्रिका खंडातील कांगो देशातून भारतात परतलेल्या ३७ वर्षीय व्यापारी अमुरी लोकुला यांना इबोलाची लागण झाल्याची शंका होती.**

त्याच्या शरीरात आढळून आलेली लक्षणे देखील इबोलाशी मिळतीजुळती असल्याने आरोग्य प्रशासनाची चिंता वाढली. अमुरी लोकुला यांनी कांगोहून मुंबई गाठली.मग ते गुजरातच्या अहमदाबादला पोहोचले.

अमुरी लोकुला यांची इबोला चाचणी करण्यात आली. त्या चाचणीचा अहवाल निगेटिव्ह आल्याने आरोग्य विभागाला दिलासा मिळाला आहे.अमुरी लोकुला यांना अहमदाबादच्या सिव्हिल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांचा इबोला रिपोर्ट निगेटिव्ह आल्यामुळे आरोग्य विभागाचा जीव भांड्यात पडला.कारण गेल्या काही दिवसांपासून आरोग्य विभाग गॅसवर होता.

शुक्रवार, ता. २९ मे २०२६ | अधिक ज्येष्ठ शुक्ल १३ | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२+४=१६ | किंमत ₹ ५.००

# समान नागरी संहिता कायद्यावर विचार

## महायुती सर्व जागा जिंकणार–शिंदे

**नवी दिल्ली ता.२८(प्रतिनिधी)**

**भारतीय जनता पक्ष नेतृत्वाखालील महायुती राज्यात विधान परिषदेच्या १७ जागा लढेल आणि या सर्व जागा आम्ही जिंकू असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. तसेच राज्यात समान नागरी कायदा लागू करण्याबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा करेन, असे शिंदे यांनी एका प्रश्नाच्या उत्तरादाखल म्हटले.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार हे तिन्ही नेते कालपासून दिल्लीत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पतंप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन राज्यातील प्रगतिशील प्रकल्प आणि हाती घेतल्या जाणाऱ्या विकास प्रकल्पाबाबत चर्चा केली. राज्याच्या विकासासाठी त्यांनी मोदी यांची भेट घेतली. यामुळे या भेटीकडे वेगळा असा दृष्टिकोन ठेऊन पाहण्याची गरज नाही असे एकनाथ शिंदे यांनी एका प्रश्नाच्या उत्तरादाखल म्हटले.राज्यात विधान परिषदेसाठी निवडणूक (पान २ वर)

# डीके शिवकुमार मुख्यमंत्री होणार

## सिध्दरामय्यांचा राजीनामा;काँग्रेसची आज बैठक

**बंगळूरू,ता.२८–**

**कर्नाटकमधील सत्ताधारी काँग्रेस सरकारमध्ये गुरूवारी मोठा राजकीय बदल झाला.मुख्यमंत्री सिध्दरामय्या यांनी गुरूवारी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला असून त्यांच्या जागी डी.के. शिवकुमार हे पुढील**

**डी.के. शिवकुमार कर्नाटकमधील कनकपुरा विधानसभा मतदारसंघातून आठव्यांदा आमदार म्हणून प्रतिनिधीत्व करत आहेत.एकदाही त्यांचा पराभव झालेला नाही.काँग्रेसचे संकटमोचक म्हणून डी. के. शिवकुमार प्रसिध्द आहेत.महाराष्ट्र, गुजरात आणि कर्नाटकमध्ये काँग्रेसचे संकटमोचक म्हणून यशस्वी ठरले होते. गुजरातमध्ये २०१७ च्या राज्यसभा निवडणुकीत काँग्रेसचा उमेदवार त्यांनी निवडून आणला होता.**



**मुख्यमंत्री होणार असल्याचे निश्चित मानले जात आहे. शुक्रवारी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत नव्या मुख्यमंत्र्यांच्या निवडीची औपचारिकता पार पडणार आहे.**

सिध्दरामय्या यांनी लोकभवनात जाऊन मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला.त्यांनी राज्यपाल कार्यालयात आपला राजीनामा सुपूर्द केला.शुक्रवारी कर्नाटकमध्ये काँग्रेस विधिमंडळ पक्षाची बैठक होणार असून त्यात नव्या मुख्यमंत्र्यांची निवड केली जाणार आहे. मात्र, डी.के. शिवकुमार यांची मुख्यमंत्रीपदी निवड जवळपास निश्चित मानली जात आहे.

मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर सिध्दरामय्या यांनी पत्रकार परिषद घेतली.यावेळी उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमारही उपस्थित होते.सिध्दरामय्या म्हणाले, माझ्यासाठी राज्यहित सर्वांत महत्त्वाचे आहे.माझ्या या निर्णयाला सर्व आमदारांचा पाठिंबा आहे. हायकमांडने यापूर्वीच राजीनामा देण्यास सांगितले होते. (पान २ वर)

**डी.के शिवकुमार हे सध्या कर्नाटकमधील काँग्रेस सरकारमध्ये उपमुख्यमंत्री आहेत.त्यांच्याकडे जलसंपदा, बंगळूरु शहर विकास प्राधिकरण आणि नगररचना विभाग आहेत.याशिवाय ते कर्नाटक प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष आहेत. डी.के. शिवकुमार यांच्यासोबत चार उपमुख्यमंत्री असतील, अशा चर्चा आहे.**



# मुख्यमंत्री फडणवीस यांची पंतप्रधान मोदी यांच्याशी चर्चा

**नवी दिल्ली,२८(प्रतिनिधी)–**

**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या विकासाच्या विविध प्रकल्पांबाबत पंतप्रधानांशी चर्चा केली.**

या भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या विविध महत्त्वाकांक्षी आणि पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांची सद्यस्थिती आणि त्यांच्या प्रगतीबाबत पंतप्रधानांना सविस्तर माहिती दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट ही नेहमीच अत्यंत प्रेरणादायी आणि सकारात्मक ऊर्जा देणारी असते, अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भेटीनंतर व्यक्त केली.मुख्यमंत्री फडणवीस कालपासून दिल्ली दौऱ्यावर असून केंद्रीय गृह आणि (पान २ वर)

# बेटींगप्रकरणी नगरसेवक नितेश पोवारसह तिघांना अटक

## आजअखेर नऊजणांवर कारवाई;२६ लाखाचे १०४ संगणक जप्त

**इचलकरंजी,ता.२८–**

**आयपीएलमधील क्रिकेट सामन्यावर ऑनलाईन बेटींग प्रकरणी आणखी तिघांना गुरुवारी अटक केली.**



नितेश पोवार

**त्यामध्ये नगरसेवक नितेश उर्फ गोट्या किरण पोवार (वय ३६ रा.नवीन कोल्हापूर नाका), मनीष भरत सांगावकर (वय ३२ रा.गणपती कट्टा) व सचिन सदाशिव हरगापुरे (वय २४ रा.बावडेकर मळा इचलकरंजी) अशी तिघांची नावे आहेत. बेटिंग प्रकरणांमध्ये नगरसेवकाचा संबंध उघड झाल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.**

दरम्यान या बेटिंग प्रकरणी सुमारे २६ लाख २८ हजार रुपये किमतीचे १०४ संगणक्हजप्त केले आहेत. या बेटिंग प्रकरणी आजअखेर नऊ जणांना अटक झाली आहे. तर ८६ लाख ९३ हजार २३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती अप्पर पोलीस अधीक्षक अण्णासाहेब जाधव यांनी पत्रकार बैठकीत दिली. दरम्यान, अटक केलेल्या तिघांना तसेच यापूर्वी पोलीस कोठडीत असलेल्या सहाजणांना न्यायालयासमोर हजर केले असता ३० मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

शहरात अवैधपणे क्रिकेट बेटिंग व्यवसाय चालत असल्याची माहिती मिळाल्यानंतर अप्पर पोलिस अधीक्षक अण्णासाहेब जाधव यांच्या पथकाने २५ मे रोजी छापा टाकून सहा संशयितांना अटक केली होती. अमेय विलास बडवे (वय ३२ रा. प्रियदर्शनी कॉलनी), गणेश प्रकाश पाटील (वय २७ रा.मुरदुंडे मळा), अभिजित विलास बडवे (वय ३० रा.प्रियदर्शनी कॉलनी), उत्तमसिंग प्रतापसिंग बग्गा (वय ३८ रा. गणेशनगर ग.नं.४), याकुब अब्दुल मुजावर (वय ४७ रा.मगदुम दर्गाजवळ) व रिषभ उमेश पाटील (वय २६ रा. मिरची कट्टा, जवाहरनगर) अशी त्यांची नांवे असून त्यांच्यावर शिवाजीनगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास (पान २ वर)



बेटींग प्रकरणी संगणक संचासह ताब्यात घेतलेले संशयित आरोपी. (छाया– मयूर चिंदे)

### राजस्थानला पथक रवाना होणार

**क्रिकेट बेटिंग प्रकरणाचे धागेदोरे परराज्यात मिळून येत आहे. त्यामध्ये काही संशितांचे राजस्थानमध्ये वास्तव्य असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी राजस्थानला पथक रवाना करणार असल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक जाधव यांनी दिली.**

### राजकीय वर्तुळात खळबळ

**बेटिंग घेण्याच्या प्रकरणांमध्ये नगरसेवक नितेश पोवार याचा संबंध असल्याची माहिती उघडकीस आल्यानंतर त्याला अटक झाली. त्यामुळे शहरातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. त्याचबरोबर या बेटिंग प्रकरणांमध्ये सहभागी असणारे अनेकजण आपल्यावर कारवाई होईल, या भीतीने प्रसार झाल्याची चर्चा शहरात सुरू आहे.**

## जरांगेंचा बेमुदत उपोषणाचा इशारा

**छ.संभाजीनगर,ता.२८–**



**मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी येत्या ३० मेपासून आंतरवाली सराटी येथे रखरखत्या उन्हात आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. सरकारने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत त्यांनी कठोर भूमिका जाहीर केली.**

सरकारला गेल्या दहा महिन्यांपासून वेळ दिला होता, मात्र सातारा गॅझेटिअर संदर्भात अद्याप शासन निर्णय (जीआर) काढण्यात आलेला नाही, अशी टीका जरांगे यांनी केली. मला आता चर्चा नकोय, आरक्षणाची अंमलबजावणी पाहिजे, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. यापूर्वी सावलीत, मंडपात (पान २ वर)

## कारच्या धडकेत पादचारी ठार

**सरूड,ता.२८(प्रतिनिधी)–**



**शाहूवाडी तालुक्यातील उचत परिसरात गुरुवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात जगन्नाथ बाळू कांबळे (वय ५५,रा.कासर्डे) पादचाऱ्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवल्याप्रकरणी कारचालकाविरुद्ध शाहूवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

गुरुवार सकाळच्या सुमारास पूर्व मलकापूर–अनुस्कुरा रोडवरील उचत (पान २ वर)

## बँकेतून बोलत असल्याचे सांगून

# वृध्दास सहा लाखाचा गंडा

**सांगली,ता.२८(प्रतिनिधी)–**

**सेवानिवृत्त व्यक्तीशी संपर्क साधून बँकेतून बोलत असल्याचे सांगून एका भामट्याने सुमारे सहा लाख रुपये हडप केले. मोबाईल हॅक करून बँकेतील उमेश त्रिंबक श्रोत्री (वय ६८, रा. राधाकृष्ण वसाहत,सांगली) यांच्या 'एफडी' व बचत खात्यातील रक्कम भामट्याने काढून घेतली आहे. याबाबत श्रोत्री यांनी सायबर पोलिस ठाण्याकडे तक्रार नोंदवली आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उमेश श्रोत्री हे सेवानिवृत्त असून सध्या एकटेच राहतात. त्यांचे इंडसइंड बँकेत खाते आहे. या खात्यावरून त्यांनी सात 'एफडी' बँकेत केल्या होत्या. तसेच बचत खात्यामध्ये ४३ हजार रूपये होते. दि.१४ मे रोजी सायंकाळी सव्वा सातच्या सुमारास श्रोत्री यांच्या मोबाईलवर एकाने कॉल केला. इंडसइंड बँकेतून बोलत असल्याचे हिंदीमधून सांगितले. श्रोत्री यांना त्याने 'तुमचे नेट बँकिंग सुरू करण्यासाठी माहिती लागणार आहे' असे (पान २ वर)

# विशाळगड उरुसाला अटींसह परवानगी

## २ जूनपर्यंत धार्मिक विधींवर प्रशासनाची कडक नजर

**सरूड,ता.२८(प्रतिनिधी)–**

**शाहूवाडी तालुक्यातील ऐतिहासिक विशाळगडावर २८ मे ते २ जूनदरम्यान होणाऱ्या रेहान मलिक बाबा यांच्या उरुसासाठी कुर्बानीला न्यायालयाने काही महत्त्वाच्या अटींसह मर्यादित परवानगी दिली आहे. यासंदर्भात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करताना कोल्हापूर सर्किट बेंचने हा आदेश दिला.**



न्यायालयाच्या आदेशानुसार, उरुसासाठी बाहेरगावाहून येणाऱ्या यात्रेकरूंना गडावर मुक्काम करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच यात्रेकरूंना सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंतच गडावर प्रवेश दिला जाणार आहे. स्थानिक नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी कुर्बानी देण्यास बंदी घालण्यात आली असून, धार्मिक विधी घरामध्येच करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, कोणत्याही प्रकारचे पशू किंवा मांसाहार गडावर नेण्यास न्यायालयाने स्पष्ट मनाई केली आहे.

यापूर्वी प्रशासनाने २७ मेपासून पशुहत्येस परवानगी नाकारली होती. मात्र, न्यायालयाच्या नव्या आदेशानंतर आजपासून २ जूनपर्यंत धार्मिक विधी पार पाडले जाणार आहेत. उरुस व बकरी ईद काळातील सर्व धार्मिक कार्यक्रम प्रशासनाच्या देखरेखीखाली पार (पान २ वर)

# अमेरिकेचा इराणवर पुन्हा हल्ला

## होर्मुझ सामुद्रधुनीवरील धोक्याचा दावा

**वॉशिंग्टन,ता.२८ –**

**अमेरिकेने बुधवारी पुन्हा एकदा इराणवर हल्ला करत त्याला 'संरक्षणात्मक कारवाई' असे संबोधले आहे. या आठवड्यात अमेरिकन सैन्याने इराणविरोधात केलेली ही दुसरी कारवाई आहे. अमेरिकन अधिकाऱ्यांच्या मते, इराणी सैन्याकडून आक्रमक हालचाली दिसून आल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आले.**



अमेरिकन अधिकाऱ्यांनी सांगितले की, अमेरिकन सैन्याने इराणचे चार ड्रोन पाडले आणि ज्या लष्करी तळावरून पाचवा ड्रोन उड्डाणासाठी सज्ज केला जात होता, त्या ठिकाणावरही हल्ला केला. अधिकाऱ्यांच्या मते, या ड्रोनमुळे होर्मुझ सामुद्रधुनी परिसराला धोका निर्माण झाला होता.दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष (पान २ वर)

# 'नीट'साठी लष्कर मैदानात

## विमानामार्फत पेपर पोहोचविणार

**नवी दिल्ली,ता.२८–**

**वैद्यकीय प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेतील घोटाळे आणि पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार आता पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आले आहे. आगामी २१ जून रोजी होणारी नीटची फेरपरीक्षा अत्यंत पारदर्शक, सुरक्षित पार पाडण्यासाठी सरकारने भारतीय लष्कराची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. देशातील सर्व परीक्षा केंद्रांवर गोपनीय पेपर्स सुरक्षितपणे पोहोचवण्यासाठी भारतीय वायूदलाची मदत घेतली जाणार आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी ही माहिती दिली.**

नीटच्या फेरपरीक्षेच्या नियोजनासंदर्भात दिल्लीमध्ये केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या निवासस्थानी उच्चस्तरीय बैठक पार पडली. या महत्त्वपूर्ण बैठकीला केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया, एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह, सीबीएसईचे वरिष्ठ अधिकारी आणि पंतप्रधान कार्यालयातील काही वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत २१ जून रोजी होणाऱ्या फेरपरीक्षेच्या संपूर्ण सुरक्षा व्यवस्थेवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीनंतर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पत्रकारांशी संवाद साधताना या महत्वपूर्ण निर्णयाची घोषणा केली. परीक्षेतील वाढते गैरप्रकार रोखण्यासाठी (पान २ वर)

# सांगलीत ८५ लाखाचा बेदाणा–काजूचा ट्रक गायब

### मालक,चालकावर गुन्हा

**कुपवाड,ता.२८(प्रतिनिधी)**

**सांगलीतील ट्रान्सपोर्ट व्यवसायात खळबळ उडवणारी घटना समोर आली आहे. बिहारला पाठविण्यात आलेला ८५ लाखांहून अधिक किमतीचा बेदाणा आणि काजूचा माल गंतव्यस्थानी पोहोचण्याऐवजी परस्पर हडप केल्याचा आरोप ट्रक मालक आणि चालकावर करण्यात आला आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

फिर्यादी रितेश बाबूलाल रावळ (वय ४२, व्यवसाय ट्रान्सपोर्ट, रा.सांगली) यांनी याबाबत तक्रार दिली आहे. पोलिसांत नोंदीनुसार, १५ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास पंढरपूर रोडवरील रावळ ट्रान्सपोर्ट येथून ट्रकमधून माल बिहारमधील पटणा येथे पाठविण्यात आला होता. (पान २ वर)

# गांजा विक्रीसाठी फिरणारा युवक जेरबंद

## दोन किलो गांजासह दुचाकी,मोबाईल जप्त

**कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)**



**'नशामुक्त कोल्हापूर' मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने (एलसीबी) कारवाई करत जरगनगर परिसरातून गांजाविक्रीसाठी फिरणाऱ्या युवकाला अटक केली. त्याच्याकडून दोन किलो गांजा, दुचाकी, मोबाईल आणि हॅंडसेट असा सुमारे दीड लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

अमिरहमजा शकील नदाफ (वय १९, रा.पाचगाव) असे अटक करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. याप्रकरणी त्याच्याविरुद्ध करवीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात 'नशामुक्त कोल्हापूर' अभियान राबविण्यात येत आहे. त्यानुसार एलसीबीचे पोलीस निरीक्षक सुशांत चव्हाण यांनी सहायक पोलीस (पान २ वर)

(पान १ वरून)

# शिवकुमार मुख्यमंत्री होणार

त्यानुसार मी माझा राजीनामा सादर केला आहे. राज्यपाल परतल्यानंतर ते माझा राजीनामा स्वीकारतील, असा मला पूर्ण विश्वास आहे, कारण हे संविधानानुसारच होणे आवश्यक आहे. सिध्दरामय्या म्हणाले, राज्यपाल सध्या बंगळूरूमध्ये नाहीत.त्यांच्या कार्यालयाने मला सांगितले की, ते उशिरा रात्री परतणार आहेत. त्यामुळे मी माझा राजीनामा त्यांच्या सचिवांकडे सुपूर्द केला आहे. राज्यपाल परत आल्यानंतर ते माझ्या राजीनाम्याला मंजुरी देतील, असा मला विश्वास आहे. माझ्यासाठी राज्याचे हित सर्वांत महत्त्वाचे आहे. सिध्दरामय्या म्हणाले, आमच्याकडे स्पष्ट बहुमत आहे.त्यामुळे सरकार स्थापन करण्यासाठी मुख्यमंत्रीपदाची परवानगी देणे हे पूर्णपणे घटनात्मक आहे. मला ही संधी दिल्याबद्दल मी सोनिया गांधी, राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

दरम्यान, मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देताना सिध्दरामय्या कमालीचे भावुक झाले होते. २००६ मध्ये काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यापासून ते आतापर्यंत मिळालेल्या अफाट समर्थनाबद्दल त्यांनी सोनिया गांधी, राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह काँग्रेस कार्यकर्ते, आमदार आणि खासदारांचे जाहीर आभार मानले.देशात संविधान सर्वोच्च आहे आणि आम्ही नेहमीच संविधानाने दाखवलेल्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न केला आहे. कर्नाटकातील जनतेने आम्हाला नेहमीच भरभरून प्रेम दिले, आमचे समर्थक आणि हितचिंतक प्रत्येक कठीण प्रसंगात आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले.

# पंतप्रधान मोदी यांच्याशी चर्चा

सहकार मंत्री अमित शाह आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांच्या समवेत काल ऊस आणि कांदा उत्पादकांच्या विविध प्रश्नांबाबत तसेच सिंचन प्रकल्प,जलजीवन मिशन आदींबाबत महत्त्वपूर्ण बैठका झाल्या होत्या.

# समान नागरी संहिता कायद्यावर विचार

होत आहे. यात १६ जागांवर द्विवार्षिक निवडणूक आणि १ जागेवर पोट निवडणूक होणार आहे. या १७ जागा महायुती लढेल आणि सर्व जागा जिंकेल असे शिंदे म्हणाले. महाविकास आघाडी सर्व जागा लढवणार आहे. युती आणि आघाडी यांच्यात कोण किती जागा लढवणार हे अद्याप गुलदस्त्यात आहे. महायुतीचे जागा वाटप उद्यापर्यंत होण्याची शक्यता आहे. या बाबतचे संकेत शिंदे यांनी दिले. या निवडणुकीसाठी १ जून ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख आहे. त्या आधी सलोख्याने जागा वाटप होईल असे शिंदे म्हणाले.

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी जम्मू आणि काश्मीर साठीचे ३७० हे विशेष कलम हटवले जावे. अयोध्या मध्ये राम मंदिर उभारले जावे तसेच देशभर समान नागरी संहिता कायदा लागू केला जावा हे तीन स्वप्न पाहिले होते. त्यातील २ स्वप्न पूर्ण झालेली आहेत. केवळ समान नागरी संहिता कायदा देशभर लागू व्हायचा आहे. अलीकडच्या काळात आसाम मध्ये मुख्यमंत्री हेमंत सरमा यांनी आपल्या राज्यात समान नागरी संहिता कायदा लागू केला. आता देशातील ३ राज्यात हा कायदा आहे. महाराष्ट्रात हा कायदा लागू करण्याबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा करेन असे शिंदे यांनी एका प्रश्नाच्या उत्तरादाखल म्हटले.

राज्यसभा खासदार संजय राऊत यांनी महाराष्ट्रात आसाम मधील मंदिरात ५५ रेड्यांचा बळी दिल्यानंतर महायुतीचे सरकार आले असे म्हटले. याबाबत आपले मत काय असे विचारल्यावर शिंदे हसत-हसत म्हणाले की, मला याबाबत काही बोलायचे नाही. समान नागरी कायदा अमलात आल्यावर आरक्षण रद्द होणार नाही. कारण आरक्षण हे राज्यघटनेनुसार देण्यात आले आहे असे ही पत्रकारा बरोबर बोलताना शिंदे म्हणाले.

# कारच्या धडकेत पादचारी ठार

येथे हा अपघात झाला. आरोपीने आपल्या ताब्यातील (एमएच १२ एनएक्स ८७४८) क्रमांकाची कार भरधाव वेगाने व बेदरकारपणे चालवत रस्त्यावरून चालणारा जगनाथ बाळू कांबळे या पादचाऱ्यास जोरदार धडक दिली. या धडकेत संबंधित व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला.या अपघातात कारचेही नुकसान झाले असून घटनेची माहिती मिळताच शाहूवाडी ठाण्याचे सहाय्यक फौजदार कोगेकर, पोलीस हेड कॉन्स्टेबल मानसिंग खताळ यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. मृतदेह मलकापूर ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला. शव विच्छेदनंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या प्रकरणी पोलिस पाटील संदीप बोरे यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार संबंधित कारचालकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास शाहूवाडी पोलिस करत आहेत.

# वृध्दास सहा लाखाचा गंडा

सांगून पूर्ण नाव, जन्मतारीख, बँकेचा खाते क्रमांक, डेबीट कार्ड नंबर मागून घेतला.श्रोत्री यांनी सर्व माहिती दिल्यानंतर थोड्यास वेळात त्यांचा मोबाईल क्रमांक हॅक झाला. त्यानंतर त्यांनी इंडसइंड बँकेत ठेवलेल्या 'एफडी' मधून सुरूवातीला ७९ हजार रूपये, त्यानंतर १ लाख ४८ हजार रूपये व ३ लाख ९० हजार रूपये कपात करून अन्य खात्यात ही रक्कम वर्ग करण्यात आली. भामट्याने एकूण ६ लाख १७ हजार रूपये परस्पर हडप केल्याचे समजताच श्रोत्री यांना धक्का बसला. रात्रीच्या सुमारास हा प्रकार निदर्शनास आल्यामुळे बँकही तेव्हा बंद होती.

श्रोत्री यांनी दुसऱ्या दिवशी बँकेत जाऊन हा प्रकार सांगितला. त्यानंतर सायबर क्राईमकडे ऑनलाईन तक्रार नोंदवली. पोलिस अधिकाऱ्यांची भेट घेऊन तक्रार दिली. त्यानंतर सायबर पोलिस ठाण्याकडे बुधवारी सायंकाळी तक्रार नोंदवली. बीएनएस ३१८ (४) व माहिती तंत्रज्ञान अधिनियमानुसार अज्ञात भामट्याविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# अमेरिकेचा इराणवर हल्ला

डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले की, इराण आता 'कमकुवत स्थितीतून चर्चा' करत आहे. त्यांनी स्पष्ट केले की, नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या मध्यावधी निवडणुकांचा त्यांच्या इराण धोरणावर कोणताही परिणाम होणार नाही आणि ते घाईघाईत कोणताही करार करणार नाहीत.मंत्रिमंडळ बैठकीच्या सुरुवातीला ट्रम्प यांनी विश्वास व्यक्त केला की, दोन्ही देशांमध्ये लवकरच करार होऊ शकतो. त्यांनी सांगितले की, गेल्या आठवड्याच्या अखेरीस त्यांच्या प्रशासन आणि तेहरान यांच्यातील चर्चेत महत्त्वपूर्ण प्रगती झाली होती, मात्र चर्चा अद्याप अंतिम टप्प्यात पोहोचलेली नाही.

ट्रम्प अशा कराराच्या प्रयत्नात आहेत, ज्यामुळे होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा सुरळीतपणे खुली होईल आणि इराणची अणुक्षमता मोठ्या प्रमाणात कमी करण्यात यश आल्याचा दावा करता येईल. यामुळे जवळपास तीन महिन्यांपासून सुरू असलेला संघर्ष संपवण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. मात्र, प्रस्तावित कराराबाबत अजूनही अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. अनेक महत्त्वाचे मुद्दे पुढील चर्चेसाठी राखून ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे ट्रम्प यांना त्यांच्या काही समर्थकांसह रिपब्लिकन नेत्यांच्या टीकेलाही सामोरे जावे लागत आहे.

# नितेश पोवारसह तिघांना अटक

(पान १ वरून )

करताना त्यामध्ये प्राथमिक तपासानुसार १७ आरोपी निश्चित झाले आहेत. त्यामध्ये गुरुवारी नगरसेवक नितेश उर्फ गोट्या पोवार, मनीष सागावकर व सचिन हरगापुरे या तिघांना अटक केली. तर तपासामध्ये मुख्य आरोपी अमेय बडवे याच्या गोदामामध्ये ऑनलाईन बेटिंगसाठी वापरण्यासाठी आणण्यात आलेले सुमारे २६ लाख २८ हजार रुपये किमतीचे १०४ संगणक संच जप्त करण्यात आले आहेत.या बेटिंग प्रकरणाचा पूर्ण तपास करून बेटिंग घेणाऱ्यापासून बेटिंग लावणाऱ्या पर्यंत सर्वांचा शोध घेतला जाणार आहे. याप्रकरणाची पाळेमुळे खणून काढली जाणार असल्याची माहिती शेवटी अप्पर पोलीस अधीक्षक जाधव यांनी दिली. यावेळी डीवायएसपी विक्रांत गायकवाड, पोलीस निरीक्षक शिवाजी गायकवाड उपस्थित होते.



बेटींग प्रकरणी अटक करण्यात आलेल्या संशयितांना न्यायालयात हजर करण्यासाठी नेताना. (छाया-छोटूसिंग)

**सखोल तपास करून कारवाई**

इचलकरंजी आयपीएलवर बेटिंग सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्याचा तपास करून कारवाई करण्यासाठी तब्बल ३० ते ३५ दिवस माहिती घेण्याचे काम सुरू होते. पूर्ण माहिती मिळाल्यानंतरच कारवाई केली असल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक जाधव यांनी दिली.

**पोलीस स्टेशन परिसरात गर्दी**

नितेश पोवार याला अटक झाल्याचे समजल्यानंतर भाजपच्या नगरसेवकांनी शिवाजीनगर पोलीस स्टेशनला भेट दिली याशिवाय अनेक कार्यकर्ते दिवसभर पोलीस स्टेशन आवरत दिसून येत होते. या कारवाई प्रकरणी आम. राहुल आवाडे यांनीही भेट देऊन कारवाईची माहिती घेतली.

# 'नीट'साठी लष्कर मैदानात

(पान १ वरून )

आणि देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचा तसेच पालकांचा विश्वास पुन्हा निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारने कंबर कसली आहे. या बैठकीत नीट परीक्षा अधिक पारदर्शक आणि फुलप्रूफ करण्याबाबत विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. परीक्षा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर तांत्रिक सुधारणा केल्या जाणार असून, संवेदनशील परीक्षा केंद्रांवर कडक पहारा ठेवण्यात येणार आहे. पेपर लीकचा कोणताही मार्ग उरणार नाही, अशा प्रकारे तांत्रिक आणि मानवी सुरक्षा यंत्रणा तैनात केली जाईल. पेपर वाहतुकी दरम्यान होणारे गैरप्रकार टाळण्यासाठीच वायूदलाच्या विशेष विमानांची मदत घेतली जाणार आहे.नीट परीक्षेतील गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर देशभरातून मोदी सरकारवर जोरदार टीका झाली होती. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ होत असल्याच्या तक्रारींनंतर आता खुद्द गृह आणि संरक्षण यंत्रणा लक्ष घालत आहेत. लष्कर आणि वायूदलाच्या थेट सहभागामुळे परीक्षा केंद्रांवर पेपर पोहोचण्यापासून ते परीक्षा संपेपर्यंत कडेकोट बंदोबस्त असणार आहे. आता २१ जूनच्या फेरपरीक्षेत कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी यंत्रणा काम करत आहे.

# महिलेचे मंगळसूत्र हिसकावले

**कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)- मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून दुचाकीस्वार चोरट्यांनी पलायन केले. गुरुवारी सकाळी शाहू नाका परिसरात घडली. या प्रकारात सुमारे दीड लाख रुपये किमतीचे १२ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र लंपास केले.**

सारिका आप्पासो मोरे यांनी याबाबत राजारामपुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून अज्ञात दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. राजारामपुरी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, सारिका मोरे या गुरुवारी पहाटे नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडल्या होत्या. शाहू नाका परिसरातून परतत असताना शांतिनिकेतन स्कूलजवळ पाठीमागून आलेल्या एका युवकाने त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावले.

# युवक जेरबंद

(पान १ वरून )

निरीक्षक सागर वाघ यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार केले आहे. या पथकातील पोलीस अंमलदार वैभव पाटील आणि संतोष बरगे यांना खबऱ्यामार्फत माहिती मिळाली होती की, एक युवक दुचाकीवरून जरगनगर परिसरात गांजा विक्रीसाठी येणार आहे. माहितीच्या आधारे पोलिसांनी बुधवारी सकाळी परिसरात सापळा रचला. संशयित युवकाला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याकडील पिशवीत दोन किलो गांजा आढळून आला. पोलिसांनी तत्काळ त्याला अटक करत गांजा, दुचाकी, मोबाईल व हॅंडसेट असा मुद्देमाल जप्त केला.

# विशाळगड उरूसाला न्यायालयाची परवानगी

(पान १ वरून )

पडणार असल्याची माहिती तहसीलदार सीमा सोनवणे यांनी दिली. तसेच उरुसकाळात गडावर येणाऱ्या व जाणाऱ्या प्रत्येकाची पोलिसांकडून नोंद व तपासणी केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.प्रशासनाने नागरिकांना न्यायालयाच्या आदेशांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले असून, शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# बेदाणा,काजूचा ट्रक गायब

(पान १ वरून )

या मालामध्ये ७८ लाख ६६ हजार ६९५ रुपयांचा १९ हजार ७३५ किलो बेदाणा आणि ६ लाख ५६ हजार ६३८ रुपयांचा ८७० किलो काजू असा एकूण ८५ लाख २३ हजार ३३३ रुपयांचा माल होता. मात्र, संबंधित माल पटणा येथे पोहोचविण्याऐवजी ट्रक मालक महंमद जरार खान आणि चालक जफरून हुसेन कुरेशी यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी तो परस्पर विकला किंवा अपहार केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

# जरागेंचा इशारा

(पान १ वरून )

किंवा फॅनच्या सुविधांमध्ये उपोषण केले जात होते. मात्र यावेळी अंतिम आणि अधिक कठोर स्वरूपाचे आंदोलन करण्याचा निर्धार केल्याचे त्यांनी सांगितले. रखरखत्या उन्हात बाज टाकून उपोषण करणार आहे. ना पाणी घेणार, ना अन्न घेणार आणि पायात चप्पलही घालणार नाही, असे जरांगे म्हणाले.

माझ्या शरीरात प्रचंड वेदना आहेत. समाजाच्या लेकरांच्या आयुष्याचा उन्हाळा झाला आहे, त्यामुळे आता स्वतःच्या जीवाची पर्वा करणार नाही, असे भावनिक वक्तव्य त्यांनी केले. तसेच उष्माघातामुळे काही झाले तर त्याला सरकार आणि देवेंद्र फडणवीस जबाबदार असतील, असा आरोपही त्यांनी केला. आमरण उपोषण जंगलात, रानात किंवा कडक उन्हात कुठेही करण्याचा निर्धार कायम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सरकारचा तुकडा पडेल किंवा माझा तुकडा पडेल, असे म्हणत आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

**॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥**



पप्पा....
आईची उणीव कधी
भासू दिली नाही..
आणि आज न सांगताच
निघून गेलात..
आम्हाला पोरकं करून...

श्री. राजाराम (बापू) विश्वनाथ हावळे (भदरगडे)

सौ. वैशाली विजयानंद लंबे
श्रीमती संगीता प्रशांत चौगुले
ज्योती * विनय * श्रावणी * श्रृती * सार्थ

**॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥**



श्री. राजाराम विश्वनाथ हावळे (भदरगडे)

आमचे मामा आदरणीय श्री. राजाराम विश्वनाथ हावळे (भदरगडे) यांचे बुधवार, दि. २७ मे २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

**शिवलिंग कापसे व परिवार**



भावपूर्ण श्रध्दांजली !

श्री. राजाराम (बापू) हावळे-भदरगडे

आमचे परममित्र, स्नेही श्री. गणेश भदरगडे यांचे वडील,
श्री. राजाराम हावळे-भदरगडे (बापू) यांचे बुधवार, दि. २७/०५/२०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

**युवराज रामचंद्र माळी परिवार**

**॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥**



बापू....
तुमच्या साध्या आणि प्रेमळ
स्वभावाची मायेची सावली
आम्हा सर्वावर सदैव होती..
तुमचे विचार आणि आठवणी
आमच्या हृदयात कायम राहतील..
तुमच्या पवित्र स्मृतीस
भावपूर्ण श्रध्दांजली...!

कै.श्री. राजाराम (बापू) विश्वनाथ हावळे-भदरगडे

आमचे स्नेही गणेश भदरगडे यांचे वडील श्री. राजाराम (बापू) विश्वनाथ हावळे-भदरगडे यांचे बुधवार, दि. २७/०५/२०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

**सौ. मनिषा संतोष कुपटे**
नगरसेविका, इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

**संतोष (आण्णा) कुपटे**
**गणपती कट्टा ग्रुप,** जवाहरनगर, इचलकरंजी

* माती सावडणे : आज शुक्रवार, दि. २९/०५/२०२६ रोजी सकाळी ९ वा. लिंगायत रूद्रभूमी, निरामय हॉस्पिटलजवळ येथे आहे.

**भावपूर्ण श्रध्दांजली!**



श्री. धनंजय विलासराव घोरपडे

आमचे भाचे श्री. धनंजय विलासराव घोरपडे यांचे गुरूवार, दि. २८/५/२०२६ रोजी आकस्मिक दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

बाळकृष्ण मुरलीधर गोरे
अभिजीत गोरे * सागर गोरे
**गोरे परिवार,** इचलकरंजी

* रक्षाविसर्जन : आज शुक्रवारी सकाळी ९ वा. पंचगंगा नदितीरी आहे.

बापू



" संस्कार श्रमाचे दैवत आमुचे
आपुलकीने नाती जपली
अनंताकडे प्रयाण करता
आठवांची झोळी भरली "

**॥ आमचे दैवत ॥**

यांना बुधवार, दि. २७ मे २०२६
देवाज्ञा झाली.
त्यांच्या आत्म्यास शांती लाभो

| जन्म | मृत्यू |
|---|---|
| २४ सप्टेंबर १९४६ | २७ मे २०२६ |

गणेश दत्तात्रय भदरगडे
विवेक राजाराम हावळे
शिवलिंग महादेव कापसे

स्व. श्री. राजाराम विश्वनाथ हावळे - भदरगडे

**भदरगडे, हावळे, कापसे परिवार**

माती सावडणे : आज शुक्रवार, दि. २९-०५-२०२६ स. ८ वाजता, लिंगायत रुद्रभूमी, निरामय हॉस्पिटल जवळ येथे आहे.

# डॉ.आंबेडकर पुतळा परिसरात जलवाहिनीला गळती

## परिसराला तळ्याचे स्वरूप

इचलकरंजी,ता.२८–

**शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात सुरू असलेल्या नवीन रस्त्याच्या कामा दरम्यान पाणीपुरवठा जलवाहिनीला गळती लागल्याने गुरुवारी सायंकाळी मोठ्या प्रमाणावर पाणी वाया गेले. या घटनेमुळे काही काळ परिसरात पाण्याचे कारंजे उडताना दिसून आले असून डॉ.आंबेडकर पुतळा ते थोरात चौक दरम्यानचा रस्ता अक्षरशः जलमय झाला होता.त्यामध्ये लाखो लिटर पाणी वाया गेले.**

महापालिकेकडून या मार्गावर नवीन रस्त्याचे काम सुरू असून जेसीबीच्या सहाय्याने खोदाईचे काम करण्यात येत होते. यावेळी संबंधित कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे जवाहरनगर पाण्याच्या टाकीस पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीला धक्का बसून गळती सुरू झाली.



डॉ.आंबेडकर पुतळा परिसरात जलवाहिनीला गळती लागल्याने परिसराला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले होते.(छाया–मयूर चिंदे)

घटनेची माहिती मिळताच महापालिकेचे स्थायी समिती सभापती सतीश मुळीक तसेच जल अभियंता बाजीराव कांबळे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली.

सायंकाळच्या सुमारास घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. अनेकांनी मोबाईलवर या घटनेचे चित्रिकरण केले. परिणामी काही काळ वाहतुकीवरही परिणाम झाला. दरम्यान, खुदाई करताना आवश्यक दक्षता न घेतल्याने हा प्रकार घडल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू होती. संबंधित ठेकेदार व कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणावरून उलट - सुलट प्रतिक्रिया उमटत होत्या.

**समन्वयाच्या अभावामुळे बुधवारी कामगार चाळ परिसरात गळती लागून लाखो लिटर पाणी वाया गेले तर आज गुरूवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात जलवाहिनीला गळती लागल्याने तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले होते.शहरात पाण्यासाठी वाणवा असताना दुसरीकडे गळती लागून लाखो लिटर पाणी वाया जात असल्याने नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.**

## मनपा प्रसूतीगृहातील शौचालयात मृत अर्भक

मिरज, ता. २८( प्रतिनिधी)–

**मिरजेत महानगरपालिकेच्या प्रसूतीगृहाच्या शौचालयामध्ये पुरुष जातीचे मृत अर्भक सापडल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली.**

माहिती मिळताच महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली होती. येथे पोलिसांना पाचारण करण्यात आले होते.मृत अर्भकास शासकीय रुग्णालयास पुढील तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे. सायंकाळी ही घटना उघडकीस आली. मिरजेतील मार्केट परिसरात असलेल्या महानगरपालिकेच्या प्रसुती गृहाचे शौचालय तुंबले होते. यामुळे प्रसूतीगृहातील कर्मचारी व अधिकाऱ्यांनी ड्रेनेज भागातील कर्मचाऱ्यांना स्वच्छतेसाठी पाचारण केले होते.

गुरुवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास या ठिकाणी स्वच्छता कर्मचारी स्वच्छता करण्यासाठी आले होते. त्यांनी शौचालयाची स्वच्छता केल्यानंतर या ठिकाणी त्यांना मृत अर्भक आढळून आले.



बकरी ईद निमित्त येथील ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज पठण करण्यात आले.(छाया–मयूर चिंदे)

# इचलकरंजीत बकरी ईद उत्साहात साजरी

इचलकरंजी,ता.२८–

**इचलकरंजी व परिसरातील मुस्लिम बांधवांनी गुरुवारी पवित्र बकरी ईद (इद उल अजहा) मोठ्या उत्साहात साजरी केली. स्टेशन रोडवरील ईदगाह मैदान येथे सकाळी सामुहिक नमाज पठण करण्यासाठी मोठ्या संख्येने समाज बांधव जमले होते. यावेळी जागतिक शांततेसह देशातील एकता, बंधुता व अखंडता आणि जातीय सलोखा कायम राहून सर्व संकटे दूर व्हावीत यासाठी दुआपठण करण्यात आले.**

नमाज पठण झालेनंतर सर्वांनी एकमेकांची गळाभेट घेत शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रशासनाच्यावतीने अप्पर पोलीस अधिक्षक अण्णासाहेब जाधव, पोलीस उपअधीक्षक विक्रांत गायकवाड, सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनी मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. मुस्लिम समाजात रमजान ईद बरोबरच बकरी ईद सण उत्साहात साजरा केला जातो. यादिवशी ईदगाह मैदान येथे सामुहिक नमाज पठण केले जाते.

मोठ्या संख्येने ईदगाह मैदान येथे मुस्लिम बांधव नमाज पठण करण्यासाठी जमले होते. अक्सा मस्जिदचे मुफ्ती युसूफ मोमीन यांनी बयान पठण तर नमाज व दुआ पठण गौसिया मस्जिदचे इमाम मौलाना आसिफ मोमीन यांनी केले. हजरत सय्यद मखतूमवली दर्गा ट्रस्ट व ईदगाह ट्रस्ट यांचे वतीने नियोजन करण्यात आले होते. बादशाह बागवान व अहमद मुजावर यांनी आभार मानले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घेतली होती.

## सांगलीत दहशत माजवणाऱ्याची अनोखी दखल

सांगली, ता. २८(प्रतिनिधी )–

**शहरातील रमामातानगरमध्ये बुधवारी रात्रीच्यावेळी दहशत माजवणाऱ्या सुज्योत ऊर्फ बाप्या सुनील कांबळे (रा. रमामातानगर) याची सांगली शहर पोलिसांनी अनोख्या पद्धतीने दखल घेतली . त्याने ज्या भागात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला, त्याच भागात त्याला गुरूवारी सायंकाळी फिरवले. यावेळी नागरिकांची गर्दी जमली होती. पोलिसांच्या अशा पद्धतीच्या तत्काळ कारवाईचे नागरिकांनी स्वागत केले.**

सुज्योत ऊर्फ बाप्या कांबळे याने रमामातानगरमध्ये बुधवारी रात्री आरडाओरड करत दहशत निर्माण केली. त्यामुळे परिसरात घबराट पसरली होती. सांगली शहर पोलिसांना हा प्रकार कळवताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. बाप्याला ताब्यात घेतले.त्याची दहशत मोडीत काढण्यासाठी गुरूवारी सायंकाळी पोलिस पथकाने त्याला ज्याठिकाणी दंगा केला होता, त्याठिकाणी फिरवले.

# शिरढोण ग्रा.पं.आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी दोषीवर कारवाई करा

## अन्यथा जिल्हा परिषद समोर आंदोलन

शिरढोण,ता.२८ (प्रतिनिधी)–

**शिरढोण (ता. शिरोळ) ग्रामपंचायतीत आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या दोषी सरपंच व ग्रामसेवक यांच्या वर येत्या आठ दिवसांत कारवाई करावी. अन्यथा जिल्हा परिषदेसमोर ग्रामस्थांना घेवून आंदोलन करण्याचा इशारा शिरढोण बचाव संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.जास्मीन यांना दिले असल्याची माहिती शिष्टमंडळ प्रमुख भाजपाचे पोपट पुजारी व माजी पं. स. सदस्य अविनाश पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

शिरढोण येथील ग्रामपंचायतीत सन २०२२ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत निविदा प्रक्रिया पूर्ण न करणे, खरेदी बिलाची पावती नसणे, नियमबाह्य कामे,मूल्यांकन नाही, डेड स्टॉक नोंद नसणे, दैनिकात जाहिरात नाही. खरेदी साहित्य जागेवर नसणे अशा प्रकारे बोगस बिले तयार करून लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाला आहे. सहाय्यक गटविकास अधिकारी मुकेश सजगाणे यांच्या अध्यक्षतेखाली समितीने चौकशी करून अहवाल तयार केला. गटविकास अधिकारी विजयकुमार परीट यांनी सदरचा अहवाल ४ मे २०२६ रोजी जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठविले आहे. यामध्ये ४ वर्षात ५ सरपंच व दोन ग्रामसेवक यांना दोषी ठरविण्यात आले असून विविध विभागावर नियमबाह्य तर काही ठिकाणी केवळ कागदोपत्री खर्च दाखवून ८० लाखांहून अधिक रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे तपासणीत स्पष्ट झाले आहे. मात्र, अहवाल पाठवून एक महिना होत आला तरी अद्याप कारवाई होत नसल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.जास्मीन यांना भेटून कारवाईची मागणी केली असल्याचे पोपट पुजारी व अविनाश पाटील यांनी सांगितले.

दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.जस्मिन यांनी अहवाल प्राप्त झाला असून सुस्पष्ट अहवाल पाठवण्याचे आदेश गटविकास अधिकारी विजयकुमार परीट यांना दिले आहे. अहवाल मिळताच कारवाई करण्याचे आश्वासन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले असल्याचे पत्रकार परिषदेत शिष्टमंडळाने सांगितले.

मात्र, येत्या आठ दिवसांत ग्रामपंचायतीत आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या घटकावर कारवाई करून रक्कम वसुली करावी व त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे अन्यथा जिल्हा परिषदे समोर ग्रामस्थांना घेऊन आंदोलन करण्याचा इशारा शिष्टमंडळाने दिला आहे. यावेळी समिती सदस्य सुरेश सासणे, विश्वास बालीघाटे, अशोक मगदूम, सुकुमार पुजारी आदी उपस्थित होते.

# माजी आ.सुरेश हाळवणकरांचा वाढदिवस सेवा सप्ताह म्हणून साजरा करणार

## पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीत निर्धार

इचलकरंजी,ता.२८ –

**माजी आमदार सुरेश हाळवणकर यांच्यावर प्रेम करणाऱ्या नगरसेवक, पदाधिकारी कार्यकर्ते यांनी माजी आम. हाळवणकर यांचा २ जून रोजी होणारा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे आयोजन केले आहे.**

सदर वाढदिवस सेवा सप्ताह म्हणून साजरा करण्याचा निर्धार केला असून ४५ हुन अधिक विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यामध्ये मुख्य कार्यक्रम समृद्ध इचलकरंजीसाठी व इचलकरंजीकरांच्या समृद्धी साठी उज्जैन च्या धर्तीवर पंचगंगा नदीतीरी गंगा आरती करण्यात येणार आहे.

माजी आमदार सुरेश हाळवणकर यांचा वाढदिवस लोकोत्सव व सेवा सप्ताह म्हणवून साजरा करण्याचे भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी ठरवले आहे. याचा एक भाग म्हणून गुरूवारी प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी २९ मे ते ८ जून पर्यंत विविध कार्यक्रम कार्यकर्ते स्वतः खर्च करून करणार आहेत. यामध्ये मुख्य कार्यक्रम हा माजी उपनगराध्यक्ष सुनील महाजन यांच्या साईप्रसाद ग्रुपच्या वतीने ३ जून रोजी सायंकाळी ६ वाजता. पंचगंगा नदी तीरी उज्जैन च्या धर्तीवर गंगा आरती करण्यात येणार आहे.



माजी आम. सुरेश हाळवणकर यांच्या वाढदिवसा निमित्त आयोजीत केलेल्या बैठकीप्रसंगी घेतलेले छायाचित्र(छाया–छोटूसिंग)

सदर बैठकीला माजी उपनगराध्यक्ष सुनील महाजन, भाजपा शहराध्यक्ष शशिकांत मोहिते, नगरसेवक तानाजी पोवार, जहांगीर पटेकरी, मनोज हिंगमिरे, प्रदीप धुत्रे, मारुती पाथरवट, संग्राम स्वामी, किसन शिंदे, नगरसेविका पूनम माळी, सचिन माळी, दिलीप मुथा, सतीश पंडीत, रमा फाटक, सुधीर पाटील, अश्विनी कुबडगे, दिपक पाटील, शुभम बरगे, अरुण कुंभार, सचिन पोवार, राजू भाकरे, संजय चोपडे, मनोज तराळ, काशिनाथ पुजारी, विशाल पाटील, उमाकांत दाभोळे, रावसाहेब कदम यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बगॅस वाहतुक करणारा ट्रक थेट घरात घुसला

## औरवाडमधील दुर्घटना; सुदैवाने जीवीतहानी नाही

बुबनाळ ता.२८ वार्ताहर

**औरवाड (ता.शिरोळ) येथे बगॅस वाहतुक करणाऱ्या ट्रक चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने तो सरळ रस्त्याकडेला असलेल्या गावडे कुटुंबियांच्या घरात घुसल्याची घटना घडली आहे.सुदैवाने यात कोणतीही जीवीतहानी झालेली नाही.ही घटना गुरुवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली आहे.**

याबाबत घटनास्थळावरुन मिळालेली माहीती अशी की, बगॅस वाहतुक करणारा ट्रक क्रमाक (केए २५–सी २०१०) हा औरवाडमधुन नृसिंहवाडीकडे जात होता.गौरवाड फाट्याजवळ असलेल्या वळणावर ट्रक चालकाचा वाहनावरील ताबा अचानक सुटल्याने भरधाव असलेली ट्रक रस्त्याकडेला असलेल्या रामदास गावडे व अशोक गावडे यांच्या घराला जावुन धडकला.जोरदार धडकीमुळे घरातील भिंती व दर्शनी भागाचे व ट्रकचे मोठे नुकसान झाले आहे.अपघाताचा आवाज ऐकुन आसपासच्या ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. सुदैवाने अपघातावेळी घरात कोणीही नसल्याने मोठी जीवीतहानी टळली.अन्यथा गंभीर दुर्घटना घडली असती.दरम्यान सदर अपघाताची रात्री उशिरापर्यंत पोलीस ठाण्यात नोंद झालेली नव्हती.



## सुळेरान जवळील अपघातात युवकाचा मृत्यू

आजरा,ता.२८(प्रतिनिधी)–

**सुळेरान (ता. आजरा) येथे झालेल्या मोटरसायकल अपघातात एकाचा मृत्यू झाला असून एकजण गंभीर जखमीं झाला आहे.**



शिवम पांडुरंग दळवी (वय २४ , रा. मेढेवाडी, ता. आजरा) असे मयत युवकाचे नाव असून मंगेश शिवराम पाटील (रा. मेढेवाडी, ता. आजरा) हा गंभीर जखमी झाला आहे. पॅशनप्रो मोटरसायकल वरुन हे दोघे गावाकडे येत होते. सुळेरान जवळ गाडीवरील ताबा सुटल्याने अपघात झाला. यामध्ये शिवमचा मृत्यू झाला.

## आंतरराज्य इराणी टोळीतील सराईत चोरट्यास अटक

सांगली,ता.२८(प्रतिनिधी)–

**दिशाभूल आणि हातचलाखीने मौल्यवान ऐवजावर डल्ला मारणारा सराईत चोरटा इकबाल हिम्मतलाल बेग (वय ५९, रा. कुडची, ता. रायबाग) याला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने अटक केली. हा आंतरराज्य इराणी टोळीतील सराईत चोरटा आहे. त्याच्याकडून पोलिसांनी सुमारे सव्वा तीन लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.**

ईश्वरपूर येथील एका वृद्धच्या गळ्यातील चेन आणि हाताच्या बोटातील अंगठी चोरट्याने लंपास केली होती. सांगलवाडी ते बायपास रोड परीसरात कर्नाटक पासींगच्या काळ्या रंगाच्या युनीकॉर्न दुचाकीवरुन एक सराईत गुन्हेगार फिरत असल्याची माहिती मिळाली. त्याचा संशय आल्याने पथकाने त्याला पकडले.त्याच्या अंगझडतीत त्याच्या पॅन्टच्या खिशात १६.५ ग्रॅम वजनाचे सोन्याची चैन व अंगठी सापडली.

# इचलकरंजी बार असोसिएशनच्या वतीने जिल्हा न्यायाधिश भोसले यांचा सत्कार

इचलकरंजी,ता.२८–

**इचलकरंजीमध्ये सुमारे ३ वर्षे कार्यरत असणारे जिल्हा व सत्र न्यायाधिश मिलींद भोसले यांची मालेगाव (नाशिक) येथे बदली झाल्या बद्दल दि इचलकरंजी बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजगोपाल तोष्णीवाल व कार्यकारिणीने जिल्हा व सत्र न्यायाधिश मिलींद भोसले यांचा सत्कार करून निरोप देण्यात आला. यावेळी न्यायाधिश पी.एन. रोकडे, न्यायाधिश डी. बी. साठे, न्यायाधिश ए. आर.कुलकर्णी उपस्थित होते.**

कार्यक्रमामध्ये न्यायाधिश ए.आर. कुलकर्णी, ॲड. ए.टी. तांबे, ॲड. एस.बी. सावेकर, व्ही.व्ही चव्हाण, ॲड. एस. एस. कुलकर्णी, ॲड. शैलेंद्र रजपूत यांनी मनोगत व्यक्त केले. समारोपास उत्तर देताना जिल्हा व सत्र न्यायाधिश मिलींद भोसले यांनी इचलकरंजी मध्ये सर्व सिनिअर वकिल कोर्टात नियमीत हजर राहून कामे चालविणेस पुढाकार घेत असलेली बाब कौतुकास्पद असलेचे नमूद केले.





जिल्हा न्यायाधिश मिलींद भोसले यांचा बार असोसिएशनच्यावतीने सत्कार करताना असो. अध्यक्ष ॲड .आर.आर तोष्णीवाल व इतर.

यावेळी दि इचलकरंजी बार असोसिएशनचे राजाराम सुतार, अभिजीत माने,आदित्य मुदगल, विजय शिंगारे,चिराग सोनेचा डी.एम. लटके व श्रद्धा आरेकर दिपाली हणबर,महेश कांबळे,राहुल काटकर, शैलेंद्र रजपूत, अर्चना कुलकर्णी (ओगले), किर्ती जैद, सुरज ओगले, धीरज पारख, राजीव शिंगे, इंद्रजित कांबळे (जयसिंगपूर), कोल्हापूर जिल्हा नोटरी संघाचे अध्यक्ष ॲड. अमित सिंग, क्लार्क प्रविण फगरे व दि इचलकरंजी बार असोसिएशनचे सर्व सदस्य यांनी सहकार्य केले.

सस्नेह निमंत्रण

मुख्यमंत्री नामदार देवेंद्रजी फडणवीस | उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे | उपमुख्यमंत्री नामदार सुनेत्राताई पवार



शुभहस्ते
नामदार श्री.हसनसाहेब मुश्रीफ
मंत्री वैद्यकीय शिक्षण, महाराष्ट्र राज्य

कार्यक्रमाचे अध्यक्ष
आमदार श्री.राजेश क्षिरसागर
विधानसभा सदस्य, कोल्हापूर उत्तर तथा कार्यकारी अध्यक्ष राज्य नियोजन मंडळ

प्रमुख उपस्थिती
महापौर सौ.रुपाराणी निकम
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

महाराष्ट्र राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री नामदार हसनसाहेब मुश्रीफ यांच्या प्रयत्न आणि पाठपुराव्यातून होत आहे...
छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय म्हणजेच
सी.पी.आर. चा कायापालट
तब्बल रु.२५० कोटी निधी
विविध सेवा सुविधांचा आज
लोकार्पण सोहळा



इंटेन्सिव्ह रेस्पिरेटरी केअर युनिट :
आय. आर. सी. यु. संलग्न पल्मनरी लॅबोरेटरी, बेड-१०, व्हेंटिलेटर सुविधा, मल्टीपॅरा मॉनिटर, श्वसन विकाराचे अत्यवस्थ रुग्ण व फुफुसासंबंधीच्या आजारांचे निदान व उपचार



मेडिकल आय. सी. यू. युनिट :
बेड-४०,व्हेंटिलेटर सुविधा, मल्टीपॅरा मॉनिटर मेडिसिनच्या अत्यवस्थ रुग्णांसाठी उपयुक्त



सर्जिकल आय. सी. यू. युनिट :
बेड-१६, व्हेंटिलेटर सुविधा, मल्टीपॅरा मॉनिटर्स सर्जरी, अपघात (ट्रॉमा) च्या अत्यवस्थ रुग्णांसाठी उपयुक्त



रोबोटिक आर्मयुक्त फिजिओथेरपी लॅब :
पश्चिम महाराष्ट्रात पहिल्यांदाच शासकीय रुग्णालयात रोबोटिक आर्मद्वारे फिजीओथेरपी होणारे युनिट रोबोटीक गेट ट्रेनिंग सिस्टीम, फिजिओथेरपी व ऑक्युपेशनल थेरपी अद्ययावत यंत्रसामुग्री

फार्माकोजेनेटिक लॅब
जनुकीय तपासणीद्वारे होणार नेमके औषधोपचार

अत्याधुनिक कान, नाक व घसा विभाग
ऑडिओमेट्री आणि बेरा युनिट कर्णबधिर रुग्णांचा आवाज ऐकण्याची व तपासण्याची क्षमता व दिव्यांग प्रमाणपत्रासाठी

प्रमुख सन्माननीय उपस्थिती

नामदार श्री.प्रकाश आनंदराव आबिटकर – मंत्री सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री कोल्हापूर जिल्हा
नामदार श्री.चंद्रकांतदादा पाटील – मंत्रे, उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य महाराष्ट्र राज्य
नामदार श्रीमती माधुरी सतिश मिसाळ – शहरी विकास, वाहतुक, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफचे राज्यमंत्री आणि सह-पालकमंत्री कोल्हापूर
खासदार श्री.धनंजय महाडिक – राज्यसभा सदस्य
खासदार श्रीमंत छत्रपती शाहू महाराज – लोकसभा सदस्य
खासदार श्री.धैर्यशिल माने – लोकसभा सदस्य
आमदार श्री.सतेज उर्फ बंटी पाटील – विधान परिषद सदस्य
आमदार श्री.जयंत आसगांवकर – विधान परिषद सदस्य
आमदार श्री.अरुण लाड – विधान परिषद सदस्य
आमदार डॉ.विनय कोरे(सावकर) – विधानसभा सदस्य
आमदार डॉ.राजेंद्र पाटील-यड्रावकर – विधानसभा सदस्य
आमदार श्री.चंद्रदीप नरके – विधानसभा सदस्य
आमदार श्री.अमल महाडिक – विधानसभा सदस्य
आमदार श्री.अशोकराव माने – विधानसभा सदस्य
आमदार श्री.शिवाजीराव पाटील – विधानसभा सदस्य
आमदार श्री.राहुल आवाडे – विधानसभा सदस्य

विशेष उपस्थिती

श्री. धीरजकुमार (भा.प्र.से.) – सचिव शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग महाराष्ट्र राज्य
श्री. अनिल भंडारी – आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष
डॉ. विजय राठोड (भा.प्र.से.) – जिल्हाधिकारी, कोल्हापूर
डॉ. पल्लवी सापळे – संचालक शिक्षण व संशोधन, मुंबई

कार्यक्रम स्थळ
छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय सी. पी. आर. कोल्हापूर

दिनांक व वेळ
आज शुक्रवार दि. २९-०५-२०२६ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता

आपले विनित
डॉ. सदानंद भिसे-अधिष्ठाता
राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय-सी.पी.आर. कोल्हापूर

टीप : सी. पी. आर. चे नूतनीकरण व विभागनिहाय सेवा-सुविधांचे आधुनिकीकरण ही सर्व कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. या सर्व कामांचा एकत्रित लोकार्पण सोहळा लवकरच मुख्यमंत्री नामदार देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री नामदार श्रीमती सुनेत्रावहिनी पवार यांच्यासह मान्यवरांच्या शुभहस्ते केला जाणार आहे.

■ संपादकीय ■

# कांद्याच्या दराची व्यथा

रडवणे हा कांद्याचा नैसर्गिक गुण असला तरी हा कांदा पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना मात्र आपल्या चेहऱ्यावर हसू असावे अशीच अपेक्षा असते. पण गेल्या कित्येक वर्षांप्रमाणे यावर्षीसुद्धा कांद्याचा वांदा झाला आहे. देशातील एक महत्त्वाचे पीक असलेला कांदा शेतकऱ्यांना हसवण्यापेक्षा जास्त रडवूच लागला आहे. सरकारने नेहमीप्रमाणे कांद्याचा हमीभाव जाहीर केला असला, तरी तो कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आणि विरोधी पक्षांना मान्य नसल्याने ठिकठिकाणी आंदोलनेही झाली. हा विषय केवळ महाराष्ट्राचा प्रश्न नाही. पण जगातील सर्वात मोठा कांदा उत्पादक देश असलेल्या भारतामध्ये महाराष्ट्र हे सर्वात मोठे कांदा उत्पादक राज्य असल्यामुळे कांद्याचा प्रश्न नेहमीच महाराष्ट्रात मोठा असतो. काही वर्षांपूर्वी कांद्याच्या याच विषयामुळे दिल्लीतील एक सरकार गडगडले होते. त्याचे उदाहरण समोर असतानाही सत्ताधारी अद्यापही त्यापासून धडा घेत नाहीत आणि दरवर्षीच हा कांद्याचा प्रश्न निर्माण होत आहे. कांदा हे जसे शेतकऱ्यांचे आवडते पीक आहे तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी तो आवडता मूलभूत खाद्यपदार्थ आहे. साहजिकच एकीकडे सर्वसामान्य नागरिकांना कमी दरात कांद्याचा पुरवठा करणे आणि दुसरीकडे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना योग्य किंमत देणे या कात्रीमध्ये नेहमीच हा विषय अडकतो. कधी कधी या कांद्याने शंभर, दीडशे दोनशे असासुद्धा किलोचा भाव पाहिला आहे. तर कधी हा भाव दहा रुपयाच्या आतही आला आहे. मुळात सरकारने एक विशिष्ट हमीभाव जाहीर केल्यानंतर शेतकऱ्यांच्या कांद्याची खरेदी त्या भावाने करून ग्राहकांना उपलब्ध करून देणे आवश्यक असते. पण सरकार जेव्हा एखादा निर्णय घेते तेव्हा त्याच्या अंमलबजावणीला इतका वेळ जातो की तोपर्यंत आपले कांदा पीक तसेच ठेवणे शेतकऱ्याला शक्य होत नाही आणि मग मध्यस्थ व दलाल यांच्या घशामध्ये येईल त्या किंमतीला आपले उत्पादन शेतकऱ्यांना विकावे लागते. जोपर्यंत शेतकऱ्यांची साठवणूक क्षमता वाढत नाही तोपर्यंत सरकारने कितीही निर्णय घेतले तरी त्याचा फायदा शेतकऱ्यांना होणार नाही. सर्वसाधारणपणे भारताच्या शेती अर्थशास्त्राचा विचार करता एखाद्या वर्षी ज्या नगदी पिकाला भाव येतो, त्याच प्रकारचे नगदी पीक पुढच्या वर्षी घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल असतो. कांद्याबाबत नेहमी असेच होते. एखाद्या वर्षी कांद्याला चांगला भाव मिळाला तर बहुतांश शेतकरी कांदा पीकच घेतात आणि अर्थशास्त्राच्या नियमाप्रमाणे जेव्हा पुरवठा वाढतो तेव्हा आपोआपच किंमत कमी होत असल्याने शेतकरी पुन्हा एकदा अडचणीत येतो. सर्व गोष्टींची कल्पना सरकारी यंत्रणांना असूनही दरवर्षी त्याच त्याच प्रश्नाचा विचार करून त्याच प्रकारची उत्तरे शोधण्याचा विषय समोर येत राहतो. या विषयावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा विचार कधीच केला जात नाही. कोणताही शेतकरी आपले जे पीक घेत असतो त्यापासून त्याला किमान उत्पन्न मिळावे आणि त्याला किमान तोटा तरी होणार नाही अशा प्रकारे धोरण राबवणे गरजेचे असताना शेतकरी नेहमीच आर्थिक संकटात का येतो याचाही शोध यानिमित्ताने घ्यायला हवा. एखादे पीक घेताना जो संपूर्ण खर्च येतो, त्यामध्ये काही प्रमाणात नफा मिळावा अशा किमतीला आपल्या शेतमालाची विक्री होईल अशी आशा शेतकरी धरत असतो. पण अनेक वेळा उत्पादन खर्चापेक्षाही कमी किंमतीला विक्री करावी लागत असल्याने तोटाच सहन करावा लागतो. कांदा पिकाबाबत तर अनेक वेळा दरवर्षी अशाच प्रकारच्या घटना घडताना दिसतात. हमीभाव असो, निर्यात बंदी असो किंवा निर्यातीला परवानगी देण्याचा विषय असो, अशाच प्रकारची तीच तीच धोरणे राबवून कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सुटणार नाहीत हेसुद्धा लक्षात घ्यावे लागणार आहे. खरे तर जगातील सर्वात मोठा कांदा उत्पादक देश भारत असल्याने आणि त्याच प्रमाणात भारतातून कांद्याची निर्यातही होत असल्याने अशा कांद्याचे पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांची शेती नेहमीच फायदेशीर व्हावी अशीच अपेक्षा असायला हवी, पण दुर्दैवाने तसे होत नाही. सर्वच पातळीवर धोरणामध्ये काहीतरी चुकीचे आखले जात असल्याने त्याचा फटका अखेर बळीराजालाच बसत असल्याचे दिसत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळाला आता बारा वर्षे पूर्ण झाली आहेत. आपल्या कार्यकाळाच्या पहिल्याच वर्षांमध्ये नरेंद्र मोदी यांनी पाच वर्षांमध्ये शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट केले जाईल अशी घोषणा केली होती. ती अद्याप प्रत्यक्षात आलेली नाही. आता सत्ताकारणाला एक तप पूर्ण झाल्यानंतर तरी मोदी सरकारने कांदा उत्पादक शेतकऱ्यांसह समस्त बळीराजाला दिलासा मिळेल अशाच प्रकारचे धोरण आगामी कालावधीमध्ये राबवणे अपेक्षित आहे.

# ‘नीट’ नीट करायची तर...

**वैद्यकीय शिक्षणासाठी संपूर्ण देशात घेतली जाणारी ‘नीट’ परीक्षा पुन्हा एकदा पेपरफुटीच्या आणि गैरप्रकारांच्या चक्रव्यूहात अडकली आहे. यंदाच्या परीक्षेनंतर उद्भवलेल्या परिस्थितीमुळे देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले आहे. या पार्श्वभूमीवर, केवळ वरवरच्या सुधारणा किंवा गुन्हेगारांना अटक करून हा प्रश्न सुटणार नाही, असे स्पष्ट मत देशभरातील शिक्षणतज्ज्ञ, वैद्यकीय संघटना आणि उच्चस्तरीय समित्यांनी व्यक्त केले आहे. परीक्षा पद्धतीतील गैरप्रकार कायमचे रोखायचे असतील तर ‘नीट’ सारख्या अति-केंद्रीकृत परीक्षा पूर्णपणे बंद कराव्यात किंवा त्यांच्या रचनेत मूलभूत बदल करावेत, असाही सूर उमटत आहे.**

भारतीय वैद्यकीय संघटना (आयएमए) आणि फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशन (फायमा) यांसारख्या सर्वोच्च संस्थांनी सध्याच्या परीक्षा प्रणालीतील गंभीर त्रुटींवर बोट ठेवले आहे. २२ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी एकाच दिवशी, एकाच वेळी कागद आणि पेन (ओएमआर शीट) स्वरूपात परीक्षा देतात, तेव्हा त्या संपूर्ण प्रक्रियेत मानवी हस्तक्षेप आणि त्रुटींची शक्यता प्रचंड असते. प्रश्नपत्रिकांची छपाई, त्यांची वाहतूक आणि परीक्षा केंद्रांपर्यंत त्यांचे वितरण या संपूर्ण साखळीत अनेक कच्चे दुवे असून त्यांचा फायदा परीक्षा माफिया आणि गैरप्रकार करणारे गट घेतात. केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनीही ओएमआर आधारित परीक्षा पद्धती हेच पेपर फुटीचे मुख्य कारण असल्याचे मान्य केले आहे. या समस्येवर मात करण्यासाठी केंद्र सरकारने ‘इस्रो’चे माजी प्रमुख डॉ.के.राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती. या समितीने देशभरातून सुमारे ३७ हजार सूचना गोळा करून १८५ पानांचा सविस्तर अहवाल सादर केला होता. त्यामध्ये परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी ९५ महत्त्वपूर्ण शिफारसी करण्यात आल्या होत्या. राधाकृष्णन समितीने यामध्ये स्पष्ट केले होते की, भौतिक स्वरूपातील प्रश्नश्नपत्रिकांची वाहतूक ही या संपूर्ण व्यवस्थेतील सर्वात कमकुवत कडी आहे. त्यावर उपाय म्हणून समितीने संगणक साहाय्य असणारी सुरक्षित प्रश्नपत्रिका’ (सीपीपीटी) ही संकरित पद्धत सुचवली होती. या पद्धतीनुसार, प्रश्नपत्रिका डिजिटल स्वरूपात एनक्रिप्टेड करून थेट परीक्षा केंद्रावरील सुरक्षित



सर्व्हरवर पाठवली जावी आणि परीक्षा सुरू होण्यापूर्वी काही वेळ आधीच तिची छपाई केली जावी. तथापि, तज्ज्ञांच्या मते या तात्पुरत्या उपायांपेक्षा संपूर्ण परीक्षा पद्धती डिजिटल आणि संगणकीकृत करणे अधिक सुरक्षित ठरेल.

राधाकृष्णन समिती आणि इतर शिक्षणतज्ज्ञांनी ‘नीट’ परीक्षा पूर्णपणे संगणक आधारित चाचणी (सीबीटी) मोडमध्ये आणण्याची शिफारस केली आहे. जेव्हा परीक्षा संगणकावर आणि वेगवेगळ्या सत्रांमध्ये घेतली जाते, तेव्हा एकाच वेळी संपूर्ण देशात पेपर फुटण्याचा धोका जवळपास ९५ टक्क्यांनी कमी होतो. वेगवेगळ्या सत्रांमधील काठिण्यपातळी संतुलित करण्यासाठी ‘सायकोमेट्रिक नॉर्मलायझेशन’ (गुण सुसूत्रीकरण) पद्धतीचा वापर करावा, असाही एक उपाय पुढे आला आहे. या बदलामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता त्यांच्या सापेक्ष कामगिरीवरून ठरेल आणि प्रश्नपत्रिकेच्या एखाद्या विशिष्ट सेटमुळे कोणावरही अन्याय होणार नाही.

दुसरीकडे, देशातील काही राज्यांनी आणि तज्ज्ञांच्या गटाने ‘नीट’ परीक्षा पूर्णपणे बंद करून वैद्यकीय प्रवेशाचे अधिकार पुन्हा राज्यांकडे सोपवण्याचा पर्याय सुचवला आहे. तामिळनाडू आणि काही इतर राज्यांच्या समित्यांनी असा युक्तिवाद केला आहे की, ‘नीट’ मुळे कोचिंग क्लास संस्कृतीला अवाजवी महत्त्व आले असून गरीब आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे. जर वैद्यकीय जागांचे वर्गीकरण करून राज्यांना आपापल्या शिक्षण पद्धतीनुसार आणि बारावीच्या गुणांच्या आधारे प्रवेश देण्याची परवानगी दिली, तर राष्ट्रीय स्तरावरील एकाच परिक्षेवर येणारा प्रचंड ताण कमी होईल.

परीक्षा घेणाऱ्या राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या (एनटीए) अंतर्गत

## दैनंदिनी


रचनेवरही अनेक प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. राधाकृष्णन समितीने असे निदर्शनास आणून दिले होते की, एनटीए ही संस्था कंत्राटी कर्मचारी आणि खाजगी संस्थांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. सुरक्षित परीक्षा केंद्रांची कमतरता असल्याने खाजगी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये परीक्षा केंद्रे दिली जातात. तिथे सुरक्षिततेचे नियम पाळले जात नाहीत. भारतीय विज्ञान संस्थेने (आयआयएससी) केलेल्या तपासणीत काही केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे देशातील प्रत्येक जिल्ह्यात शासकीय संस्थांच्या मदतीने किमान एक अधिकृत आणि सुरक्षित परीक्षा केंद्र उभारले जावे, अशी शिफारस करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रांचे हे खाजगीकरण थांबवून केवळ नामांकित शासकीय संस्था, केंद्रीय विद्यालये किंवा आयआयटी सारख्या ठिकाणीच परीक्षा घेतल्या जाव्यात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरात येण्याचा आर्थिक त्रास होऊ नये म्हणून अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज ‘मोबाईल टेस्टिंग सेंटर्स’ (फिरती परीक्षा केंद्रे) तयार करण्याचा एक अभिनव पर्यायही राधाकृष्णन समितीने सुचवला आहे.

केंद्र सरकारने परीक्षांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सार्वजनिक परीक्षा (अनुचित साधनांना प्रतिबंध) कायदा लागू केला आहे.परंतु, हा कायदा केवळ गुन्हा घडल्यानंतर शिक्षा देणारा आहे.पेपर फुटी रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक तंत्रज्ञान आणि संस्थात्मक उत्तरदायित्व अधिक महत्त्वाचे आहे. केवळ कायदे करून किंवा तांत्रिक अद्ययावततेचे दावे करून प्रश्न सुटणार नाही, तर यंत्रणेतील मानवी हस्तक्षेप पूर्णपणे कमी करावा लागेल.

# भोंदू बंगाली बाबांवर कारवाई केव्हा?

## बंगालींच्या भूलथापांनी अनेकांच्या आयुष्याची राखरांगोळी

**वशीकरण, जादूटोणा, करणी, प्रेमातील अपयश, विवाह न होणे, असाध्य रोग, नोकरी व्यवसायातील अपयश, गृहक्लेश, पती-पत्नींमधील भांडणे, मूल न होणे, घटस्फोट, विदेश यात्रा यांसारख्या समस्यांवर हमखास उपाय काढून सर्व समस्यांपासून मुक्ती देण्याचा दावा करणाऱ्या बंगाली बाबांच्या जाहिराती प्रवासात कुठेनाकुठे हमखास वाचायला मिळतात.लोकल तसेच एक्सप्रेस गाड्यांमध्ये अधिकृतरीत्या जाहिरातींसाठी लाखो रुपये मोजावे लागत असताना हे बंगाली बाबा मात्र आपली जाहिरात सर्वत्र फुकटात करत असतात.**



अनेक एसटी बसमध्ये आसनाशेजारी या जाहिरातींचे स्टिकर्स लावलेले पाहायला मिळतात. महिलांच्या राखीव आसनाशेजारी बसच्या पत्र्यांवर तर या जाहिराती हमखास पाहायला मिळतात. महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायदा राज्यात पारित होऊन आज १३ वर्षे उलटली तरी या जाहिराती मात्र थांबलेल्या नाहीत. हिंदू धर्मातील प्रथा परंपरांना सर्रास अंधश्रद्धेचे लेबल लावू पाहणारी अंधश्रद्धा निर्मूलन समिती हा कायदा पारित झाल्यानंतर या बंगाली बाबांच्या विरोधात ठोस काही करताना दिसत नाही. रेल्वे प्रशासन या बंगाली बाबांच्या अनधिकृत जाहिरातीच्या विरोधात कधीतरी जोरदार मोहीम उघडते मात्र दरम्यानच्या काळात या बाबांची फुकटात जाहिरात होत असते.अनेक बंगाली बाबांच्या जाहिरातींमध्ये स्त्रियांसाठी विशेष सवलतींचे प्रयोजन केलेले असते. स्त्रिया भावनिक असतात त्यामुळे बंगाली बाबांच्या या भूलथापांना त्या बऱ्याचदा बळी पडतात आणि आयुष्याची राखरांगोळी करून घेतात. यंदाच्या फेब्रुवारी मासात मोहम्मद नझीर अंदारी या एका बंगाली बाबाला अटक करण्यात आली होती. ज्याच्याकडून १५ हजारांहून अधिक पोस्टर्स आणि स्टिकर्स जप्त करण्यात आले होते. या कारवाईच्या बातम्या त्यावेळी समस्त वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्या होत्या. आजमितीला असे कितीतरी बंगाली बाबा राजरोसपणे आपली दुकाने थाटून बसली आहेत त्यांच्यावर कारवाई केव्हा होणार ?

हिंदू धर्मात अध्यात्मातील मार्गदर्शकांना, साधूंना आणि संतांना बाबा म्हणून आदराने संबोधण्याची प्रथा आहे.घरात पित्याला बाबा म्हणून जसा सन्मान दिला जातो तसा सन्मान अध्यात्मातील अधिकाऱ्यांना बाबा संबोधून दिला जातो. सार्वजनिक वाहनांत स्टिकर्स चिकटवून फुकटात जाहिरातबाजी करणाऱ्या बंगाल्यांपैकी ९९ टक्के बंगाली हे मुसलमानच असतात तरीही त्यांना मुल्ला किंवा मौलवी म्हणून न संबोधता बाबा म्हणून का संबोधले जाते हा सुद्धा एक गहन प्रश्न आहे.तथाकथित पुरोगामी आणि नास्तिक विचारांची मंडळी हिंदू धर्माला बदनाम करण्याची एकही संधी सोडत नाहीत. अशा बंगाली भोंदूमुळे त्यांनाही आयते कोलीत मिळते. या भोंदूंना जेव्हा पोलीस पकडतात तेव्हा वृत्तपत्रांतूनही भोंदू बाबाला अटक केल्याच्या बातम्या प्रसिद्ध केल्या जातात. ज्यामुळे समस्त भोंदू हे हिंदू धर्मातच भरले आहेत असा गैरसमज सामान्य नागरिकांचा होतो. भगवी वस्त्र परिधान करून भोळ्या भाबड्या भाविकांना लक्ष करायचे, वेगवेगळ्या विधींच्या नावाखाली त्यांच्याकडून पैसे लुबाडायचे, महिलांना आपल्या जाळ्यात अडकवायचे आणि आपले इप्सित साध्य करायचे. काहीच नाहीतर प्रसिद्ध तीर्थस्थळांच्या ठिकाणी भगवी वस्त्र परिधान करून वैरागी बनून लोकांकडून भिक्षा मागायची आणि आपला चरितार्थ चालवायचा.अशा कितीतरी मुसलमानांच्या टोळ्या मध्यंतरी प्रयागराज कुंभमेळ्याच्या ठिकाणी जागरूक भाविकांनी पकडल्या.आजही राज्यातील अनेक सुप्रसिद्ध मंदिरांच्या ठिकाणी साधूंचा वेष धारण करून लोकांना लुबाडणारे अन्य धर्मीय सापडतात. अशा लपंटामुळे बदनाम होतो तो हिंदू धर्म. सार्वजनिक वाहतुकीच्या साधनांमध्ये जाहिरातींचे स्टिकर्स चिकटवणाऱ्या तथाकथित बंगाली बाबांच्या विरोधात रेल्वे तसेच महाराष्ट्र परिवहन विभागाने अनेकदा मोहिमा उघडून या बंगाल्यांना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. त्यांच्याकडून दंडवसुलीही केली आहे. तरीही जाहिरातबाजी काही थांबलेली नाही.याचा अर्थ या भोंदूंना मिळणारी शिक्षा तरी अल्प आहे किंवा प्रशासनाचे याकडे म्हणावे तसे लक्ष नाही.या भोंदूंच्या भूलथापांना बळी पडून दरवर्षी कितीतरी जण आपला मेहेनतीचा पैसा वाया घालवतात. स्त्रिया आपले सर्वस्व गमावतात. बाबा बिरुद लावून हिंदू धर्माला बदनाम करणाऱ्या आणि नागरिकांच्या भावनांशी आणि धनाशी खेळणाऱ्या अशा भोंदू बंगाल्यांवर कठोर कारवाई केव्हा होणार ?

■ जगन घाणेकर

# यथार्थ गौरव

महाराष्ट्र राज्य सरकारने कोकणातील थोर नेते, समाजवादी चळवळीचे पुरस्कर्ते,



लोकप्रिय जनता दलाचे वरिष्ठ नेते, अर्थतज्ञ, माजी रेल्वेमंत्री तसेच कोकण रेल्वेचे जनक अर्थात शिल्पकार स्व.प्रा.मधू रामचंद्र दंडवते यांचे नाव कोकणातील सावंतवाडी रेल्वे स्थानकाला देण्याचा निर्णय घेतला आहे.

प्रा.मधू दंडवते कोकणातून सहा वेळा निवडून आले होते. कोकणातील या दिग्गज नेत्याच्या हुशारीची दखल घेत त्यांना केंद्रीय रेल्वे मंत्री पदाची जबाबदारी देण्यात आली होती. आज कोकणात जाण्यासाठी सोयीचा व सुलभ मार्ग म्हणून कोकण रेल्वे समजली जात आहे.

कोकणात विकास हवा तर रेल्वे देखील हवी होती आणि म्हणूनच कोकणवासीयांचे स्वप्न पूर्ण करायचे काम कोकणरेल्वेचे जनक तथा शिल्पकार स्व. प्रा.मधू दंडवते यांनी केलेले असल्यामुळे त्यांचे नाव सावंतवाडी रेल्वे टर्मिनसला देण्याचा घेतलेला निर्णय अभिमानास्पद आणि ऐतिहासिक आहे,असे वाटते.

■ संजय साळगावकर

## वाचकांचा पत्रव्यवहार

### भारतात नदीजोड प्रकल्प राबवावा

सद्या सातत्याने होणारा हवामानातील बदल, अवेळी पडणारा पाऊस यामुळे काही ठिकाणी जास्त तर कुठे कमी पाऊस पडतो त्यामुळे गंभीर परिस्थिती निर्माण होवून अनेकांना फटका बसतो त्यावर मात करायची असेल तर नदी जोड प्रकल्प संपूर्ण देशांमध्ये राबवून जलसंपत्तीच्या अधिक प्रभावी आणि सुयोग्य वापरासाठी हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. मराठवाडा, विदर्भ आणि दुष्काळ यासह राज्यातील पाणीटंचाई, सिंचनाची गरज, आणि जलस्रोतांचा अपुरा वापर लक्षात घेता, विविध नद्या एकमेकांशी जोडणे महत्वाचे आहे. यामुळे विविध जिल्ह्यांमध्ये पाणीपुरवठा, सिंचन सुविधा आणि जलस्रोतांच्या संरक्षणाला प्रोत्साहन मिळू शकते.

विदर्भ, मराठवाडा भागांमध्ये पाणीटंचाई ही एक मोठी समस्या आहे. पाणीटंचाईमुळे कृषी उत्पादनावर साहजिकच वाईट परिणाम होत असतो तसेच, नागरी क्षेत्रांमध्येही पाण्याचा प्रचंड तुटवडा जाणवतो. पाण्याच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना व शेतीला मोठ्या प्रमाणावर संकटांचा सामना करावा लागतो. या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी ‘नदी जोड प्रकल्प’ एक महत्त्वपूर्ण उपाय ठरू शकतो.नदी जोड प्रकल्प म्हणजे जास्त पाणी उपलब्ध असलेल्या अथवा पूरग्रस्त खोऱ्यातील पाणी टंचाईग्रस्त किंवा दुष्काळी खोऱ्यात वळवणे. नदीजोड प्रकल्पातून मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

■ राजू जाधव,मांगूर

### नवदाम्पत्याची गावाला अनोखी भेट

हल्ली लग्न म्हणजे प्रचंड खर्चाची बाब झाली आहे. देखावे, प्रचंड झगमगाट, सोने चांदीचा थाट असा काहीसा साज असतो. मात्र याला अपवाद नांदेडमधील एका विवाहाने एक नवीन धडा घालून दिला आहे. नांदेड मधील कंधार तालुक्यातील बहाद्दरपुरा येथील सिद्धेश्वर पेठकर यांचा विवाह नुकताच २० मे रोजी पार पडला. सामाजिक भान राखत या पेठकर कुटुंबियांनी संपूर्ण गावाची विमा पॉलिसी काढली.गावातील सुमारे ३४६५ नागरिकांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे विमा कवच त्यांनी दिले. विशेष म्हणजे गावातील एकही पात्र नागरिक यापासून वंचित राहू नये यादृष्टीने पेठकर कुटुंबियांनी नियोजन केले होते. आपल्या संस्कृतीत दान केल्याचे सांगितले जात नाही . त्याचा गाजावाजा केला जात नाही गावकऱ्यांचे भले व्हावे व त्यांचे आशीर्वाद पाठीशी असावेत एवढीच इच्छा .

पेठकर कुटुंबियांनी गावाची तब्बल ३३.६ कोटीची पोलिसी काढली ही बातमी नुकतीच वाचली. या विमा कवचामुळे सर्व गावकऱ्यांचे जीवन सुखकर होणार हाच एक आनंद पेठकर कुटुंबियांनी व्यक्त केला आहे. आजकाल लग्नात मोठा खर्च केला जातो पण शेवटी त्याचे काय होते ? त्या ऐवजी खर्च करून त्याचा फायदा समाजाला होणार असेल तर ते केव्हाही चांगले. गावातील लग्नात प्रत्येक लग्न कुटुंबियाने याचाआदर्श ठेवावा. त्या पैशाचा खऱ्या अर्थाने समाजाला उपयोग होईल

■ शांताराम वाघ


### महत्त्वाकांक्षी निर्णय!

महाराष्ट्राचे व्हिजन डॉक्युमेंट -२०४७ अंतर्गत मराठी भाषेला जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी राज्य सरकारने मराठीतील पाचशे पुस्तकांचे जगातील पन्नास भाषांमध्ये भाषांतर करण्याचा घेतलेला महत्त्वाकांक्षी निर्णय समाधान देणारा आहे. यामुळे मराठी साहित्याचा जागतिक स्तरावर प्रसार होऊन विविधांगी साहित्याची ओळख जगापुढे जाईलच शिवाय त्यांनाही त्यांच्या भाषेतून मराठी साहित्याची सहजतेने चांगल्याप्रकारे ओळख होईल, असे म्हणावयास हरकत नाही.

मात्र हे भाषांतर पुस्तकाच्या मुळ नावासह, लेखकाचे विचार,पुस्तकाची मूळ संकल्पना, आशय लेखन याला धक्का न लागता तो कायम रहावा एवढीच माफक अपेक्षा. कारण भविष्यात एखादं भाषांतरित साहित्य वादाचा विषय ठरू नये इतकच.

■ विश्वनाथ पंडीत

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शुक्रवार, ता.२९.५.२०२६**,विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५२, शालिवहन शके १९४८,पराभव नाम संवत्सरे, उत्तरायणे,ग्रीष्म ऋतो, अधिक ज्येष्ठ मासे, शुक्ल पक्षे,त्रयोदशी तिथी,९.५२ नंतर चतुदर्शी तिथी, स्वाती नक्षत्र,१०.३९ नंतर विशाखा नक्षत्र,तुला रास,परिघ योग,२८.२६ नंतर शिवयोग,तैतिल करण ९.५२ नंतर, गरज करण २२.५४ पर्यंत, दिनमान १२.५४, सुर्योदय ६.०३, सुर्यास्त १८.५७, (कोल्हापूरचे) राहू काळ सकाळी १०.३० ते १२,परिघ पूर्वदल म्हणून वर्ज्य, बुध मिथून राशीत ११.११ वाजता.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष**–पुरातन वस्तू आणि दागदागिन्यांमधील गुंतवणूक फायदा आणि समृद्धी आणेल. तुमचा भाऊ तुम्हाला तुमच्या गरजेच्या वेळी भक्कम पाठिंबा देईल.खाजगी घडामोडी संपूर्ण नियंत्रणाखाली राहतील.

**वृषभ**–कामाच्या अधिकतेच्या व्यतिरिक्त आज कार्यक्षेत्रात तुमच्यात ऊर्जा पहिली जाऊ शकते. आज तुम्ही दिलेल्या कामाला ठरलेल्या वेळेच्या आधीच पूर्ण करू शकता. महत्वाच्या कारणास्तव प्रवास घडू शकतो.

**मिथून**–आजच्या दिवशी धर्मादाय आणि सामाजिक कामाचे तुम्हाला आकर्षण वाटू शकते.आपल्या व्यवसाय आणि शिक्षणाचा कार्यक्षेत्रात खूप फायदा होईल.

**कर्क**–आज तुम्हाला आपल्या भाऊ-बहिणीच्या मदतीने धन लाभ होण्याची शक्यता आहे.वैयक्तिक मार्गदर्शन तुमचे नातेसंबंध सुधारतील.

**सिंह**–व्यापारात आज चांगला नफा मिळण्याची शक्यता आहे. आजच्या दिवशी तुम्ही आपल्या व्यवसायाला नवीन उच्चता देऊ शकतात.

**कन्या**–कार्यक्षमता वाढविण्यासाठी नवे तंत्र आत्मसात करा.तुमच्या काम करण्याच्या विशिष्ट कार्यपद्धतीमुळे इतरांवर त्याचा प्रभाव पडेल.

**तुळ**–बुद्धिमत्तेच्या जोरावर कोणतेही अवघड काम सहज पूर्ण कराल.तुम्ही भविष्यासाठी काही आर्थिक योजना बनवू शकता.उत्कृष्ठ कामामुळे कौतुकाची थाप मिळेल.

**वृश्चिक**–मित्रमैत्रिणींबरोबरची सायंकाळ सुखकारक आणि प्रसन्न असेल.कामाच्या ठिकाणी महत्वाची जबाबदारी मिळू शकते.कुटुंबात आनंदी वातावरण राहील.

**धनु**–जुन्या ओळखी आणि संबंधाना उजाळा देण्यासाठी चांगला दिवस.अनुभवी लोकांसाठी वेळ काढा,त्यांचे विचार तुम्हाला उपयोगी पडू शकतात.

**मकर**–भूतकाळात धन गुंतवणूक केली होती. आज त्या गुंतवणुकीचा फायदा होण्याची पूर्ण शक्यता आहे.व्यापार-व्यवसायात चांगला नफा मिळण्याची शक्यता आहे.

**कुंभ**–कलात्मक क्षेत्रातील लोकांना आजचा दिवस यशदायी ठरले.बऱ्याच काळापासून रखडलेली कामे पूर्णत्वास येतील. उत्तम कामगिरीमुळे कीर्ती आणि मानसन्मान मिळेल.

**मीन**–आनंदी दिवसासाठी मानसिक ताणतणाव आणि दडपण बाजूला सारा.व्यापारात नवीन उपक्रम राबविणे आकर्षक ठरेल.कामाच्याबाबतीत नेहमी आशादायी राहा.कौटुंबिक गरजांकडे दुर्लक्ष करू नका.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:‘मँचेस्टर भवन’ ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# काळम्मावाडी धरणातून वेदगंगा नदीत पाणी दाखल

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)–

..............................

**यंदाचा तीव्र उन्हाळा व पाण्याचा वाढलेला वापर याचा परिणाम म्हणून यावर्षी दुसऱ्यांदा वेदगंगा नदी कोरडी पडली होती. यामुळे शेतकरी व नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता.अखेर सोमवारी रात्री काळम्मावाडी धरणातून वेदगंगा नदीत पाणी दाखल झाले. त्यामुळे नागरिकांसह शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.**



चिखली : येथील चिखली वेदगंगा नदीत बंधाऱ्यातून दाखल झालेले पाणी.

आंतरराज्य पाणी करारानुसार नोव्हेंबर ते मे महिन्यापर्यंत काळम्मावाडी धरणातून ३.७५ टीएमसी पाणी हे दूधगंगा वेदगंगा नदीला सोडले जाते.

### चार दिवसांसाठी उपसा बंदी लागू

**काळम्मावाडी धरणातून या हंगामातील अखेरचे पाणी दाखल झाले आहे. यावेळी मे महिन्यातील पाणी सोडण्यासाठी काही तांत्रिक कारणांमुळे थोडा उशीर झाला. मात्र आम.शशिकला जोल्ले यांच्या सह स्थानीक नेत्यांसह आपण महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांच्या वेळोवेळी संपर्कात राहिलो आहोत. जत्राट आणि सिदनाळ बंधारे भरेपर्यंत चार दिवसांसाठी उपसा बंदी लागू केली आहे. नागरिक व शेतकऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन पाटबंधारे खात्याचे सहाय्यक कार्यकारी अभियंता आनंद कुलकर्णी यांनी केले.**

यंदा एप्रिल महिन्यातील आलेले पाणी संपल्यानंतर वेदगंगा नदी कोरडी पडली होती. परिणामी नदीच्या पाण्यावर अवलंबून असलेली पिके वाढण्याचा धोका निर्माण झाला होता.

**नागरिकांसह शेतकऱ्यांना दिलासा**

सुदैवाने दोन दिवसांपूर्वी ढगाळ वातावरण तसेच संततधार पावसाने हजेरी लावल्यामुळे पिकांच्या पाण्याचा प्रश्न तात्पुरता निकाली निघाला. मात्र पिण्याच्या पाण्यासाठी वेदगंगा नदीकडे सर्वांचे डोळे लागले होते.अखेर सोमवारी नदीत पाणी दाखल झाले. त्यामुळे किमान दोन आठवडे फारशी पाणीटंचाई जाणवणार नाही, अशी स्थिती आहे. असे असले तरी या महिन्यातील पाण्याबरोबरच यंदाचा पाणी वाटप कार्यक्रम पूर्ण झाला आहे. त्यामुळे हे पाणी संपल्यानंतर पावसावर अवलंबून राहावे लागणार आहे. याची दखल घेऊन नागरिकांनी आतापासूनच पाण्याचा जपून वापर करणे आवश्यक बनले आहे.

सध्या काळम्मावाडी धरणातून १५० क्युसेकने पाण्याचा विसर्ग होत आहे. मे महिन्यातील एकूण १६० एमसीएफटी पाणी येणार आहे. त्यापैकी आतापर्यंत ३० ते ३५ एमसीएफटी पाणी सिदनाळपर्यंत पोहोचले आहे. येत्या आठ ते दहा दिवसात उर्वरित पाणी पोचणार आहे. कारदगा येथील दूधगंगा नदीचे बॅकवॉटरही सिदनाळपर्यंत पोहोचले आहे.

नदीतील पाणी संपल्याने वेदगंगा नदीतून जवाहर तलावात होणारा पाणी उपसा चार दिवसांपासून थांबला होता. तो सोमवारी रात्रीपासून सुरू झाला आहे. सध्या निपाणीतील जवाहर तलावाची पाणी पातळी ३२ फुटांपर्यंत आहे. ३० फुटाच्या खाली आल्यानंतर गाळ मिश्रित पाण्याचा पुरवठा सुरू होतो. त्यामुळे पाण्याचा वापर काटकसरीने करणे गरजेचे बनले आहे.

### नदीकाठावर उपसाबंदी लागू

या हंगामातील अखेरचे पाणी नदीमध्ये आल्यामुळे याचा केवळ पिण्यासाठी वापर व्हावा म्हणून नदी काठावर उपसा बंदी लागू करण्यात आली आहे.चार दिवसापर्यंत उपसा बंदी राहणार आहे. नदीच्या पाण्यावर डोंगरभाग तसेच गावांमधील बहुग्राम पाणी योजना अवलंबून आहेत.नदीतील पाणी संपल्यामुळे गावांमधील पाणीपुरवठावर परिणाम झाला होता. अशावेळी सोमवारी पाणी आल्यामुळे शहरासह ग्रामीण भागालाही दिलासा मिळाला आहे.

# बेडकिहाळ परिसरात ऊस कुळवणी–भरणी कामांना जोर

बेडकिहाळ,ता.२८(वार्ताहर)–

..............................

**येथील परिसरात गेल्या महिन्याभरापासून ऊस लावण, बाळ भरणी व कुळवणीची कामे जोरदारपणे चालू झाल्याचे दिसून येत आहे.**



परिसरात गेल्या चार ते पाच वर्षापासून चार ते पाच फूट त्यापेक्षा काही ठिकाणी आठ फुटाच्या उसाच्या सऱ्या सोडण्यात येत आहेत.उसाची बाळ भरणी करण्यासाठी काही ठिकाणी मात्र पारंपारिक पद्धतीने बैलांच्या सहाय्याने औत कामे चालू आहेत.चार दिवसापूर्वी पहाटे जोरदार पाऊस झाला असल्याने शेती माती सुपीक झाली असून कुळवणीसाठी उपयुक्त झाली आहे. बैलाबरोबर विशेष करून लहान रोटावेटरच्या सहाय्याने ऊस कुळवणी व भरणी करण्यात येत आहे.तसेच रासायनिक खतांचा डोसही दिला जात आहे.



डॉ.सी.बी.कुरबेट्टी यांचा सत्कार करताना शिवप्रसाद स्वामीजी.

# सहकाररत्न डॉ.सी.बी.कुरबेट्टी यांचा चिंचणी मठाकडून सत्कार

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)–

..............................

**येथील श्री महात्मा बसवेश्वर क्रेडीट सौहार्द सहकारी नियमित निपाणी या संस्थेचे सहकाररत्न संस्थापक चेअरमन डॉ.चंद्रकांत कुरबेट्टी यांचा सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रातील योगदानाबद्दल श्री अल्लम प्रभू सिद्धसंस्थान चिंचणी मठाचे उत्तराधिकारी शिवप्रसाद स्वामीजी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

शिवप्रसाद स्वामीजी म्हणाले, डॉ.सी.बी.कुरबेट्टी यांनी वैद्यकीय व्यवसायात गेली पन्नास वर्षे गोरगरीब जनतेसाठी अहोरात्र विनम्र सेवा देऊन,सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. कोरोना व नैसर्गिक महापूर काळामध्ये रुग्णांना औषध,कपडे अन्नदान,धान्य आर्थिक स्वरूपाची मदत इत्यादी वस्तूंचा मोफत पुरवठा रुग्णांना करून वैद्यकीय क्षेत्राचे नाव उंचावले आहे.यावेळी बोरगावचे सिद्धेश्वर संस्थेचे चेअरमन अण्णासाहेब हवले,अभय पाटील, रामगोंडा पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# माणकापूर बसस्थानकासमोर अपघाताचे प्रमाण वाढले


### रस्त्याच्या रूंदीकरणासह कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज

माणकापूर,ता.२८(वार्ताहर)

..............................

**माणकापूर (ता.निपाणी) येथील इचलकरंजी–हुपरी मार्गावरील 'माणकापूर बसस्थानक समोरच्या रस्त्यावर' दिवसेंदिवस अपघाताच्या प्रमाणात वाढ होत असल्याचे दिसून येत आहे.**

सदर बसस्थानक समोरच्या रस्त्यालगतच गेल्या दोन–अडीच महिन्यापासून गावातील गटारीच्या सांडपाणी निवारणासाठी चर खुदाई करून निघालेल्या मातीचे ढिगारे रस्त्यावरच टाकलेले आहेत. त्यामुळे सदर रस्ता अरुंद बनला असून या ठिकाणी वरचेवर वाहनांची कोंडी होते. परिणामी प्रवाशांना अनेकदा अपघाताला सामोरे जावे लागत आहे. सोमवार ता. २५ मे रोजी सायंकाळच्या सुमारास इचलकरंजीकडे जाणाऱ्या एका डंपरची व इचलकरंजीहून दुचाकीवरून येणाऱ्या रांगोळी (ता.हातकणंगले) येथील महाविद्यालयीन युवकांची समोरासमोर जोरदार धडक झाल्यामुळे तो जागीच ठार झाला आहे. तर त्याच्या गाडीवरील दोन मित्र गंभीर जखमी झाले असून एकाची प्रकृती चिंताजनक आहे. या घटनेची नोंद सदलगा पोलीस ठाण्यात झाली असून अधिक तपास सुरू आहे. यामुळे सदर घटनेची गांभीर्याने दखल घेऊन सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन व माणकापूर ग्रामपंचायत प्रशासनाने



माणकापूर बसस्थानकासमोर चर खुदाई करून मातीचे ढिगारे रस्त्यावर टाकल्याचे दिसत आहे.

समस्या निवारणासाठी व सदर रस्ता रुंदीकरणसाठी कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे.तसेच या ठिकाणी सुरू असलेल्या गटर बांधकाम ठेकेदारांना योग्य तो सल्ला देवून रांगोळी गावांप्रमाणेच माणकापूर बसस्थानकच्या भिंतीलगत मोठ्या आकाराच्या सिमेंट काँक्रीटच्या पाईपलाईनद्वारे सांडपाणी व्यवस्थापन प्रणाली राबविण्यात यावी, अशी मागणी होत आहे अन्यथा उघड्यावरील गटर बांधकाम करणाऱ्या सदर कंत्राटदाराचे सदरचे काम बंद ठेवण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद व महाराष्ट्र शासन आणि ग्रामपंचायत प्रशासनाने लेखी आदेश देण्यात यावेत,अशीही मागणी प्रवाशांमधून होत आहे.

# महिलांच्या सुरक्षिततेसाठी गारगोटीत मनसेचे आंदोलन

### महिलांना अश्लील संदेश पाठवणाऱ्यांवर कारवाईची मागणी

गारगोटी,ता.२८(प्रतिनिधी)–

..............................

**महिलांना परप्रांतीय व्यापाऱ्यांकडून अश्लील संदेश व व्हिडिओ पाठविण्याच्या घटनेचा निषेध करत महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) च्या वतीने गारगोटी येथील क्रांती चौकात आंदोलन करण्यात आले. यावेळी महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भातील विविध मागण्या प्रशासनाकडे करण्यात आल्या.**

आंदोलनादरम्यान डॉ. युवराज येड्रे, राहुल पाटील, राहुल कुंभार, कृष्णा भारतीय,निवेदिता येड्रे, विशाल पाटील,अंजली जाधव,धनश्री पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी डॉ.युवराज येड्रे यांनी गारगोटी व भुदरगड तालुक्यातील सर्व परप्रांतीय दुकाने आणि कामगारांची नोंदणी पुढील १५ दिवसांत पोलीस ठाणे व ग्रामपंचायतीकडे करण्यात यावी, अन्यथा मनसे आक्रमक भूमिका घेईल, असा इशारा दिला.



गारगोटी येथे महिलांच्या सुरक्षिततेसाठी आंदोलन करताना डॉ.युवराज येड्रे, कृष्णा भारतीय व महिला.

आंदोलनकर्त्यांनी महिलांच्या सन्मान आणि सुरक्षिततेच्या प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी केली.यावेळी भुदरगड पोलीस ठाणे आणि ग्रामपंचायत गारगोटी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात सोशल मीडिया, व्हॉट्सअप आणि मोबाईलद्वारे महिलांना होणारा त्रास रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी कॉ.संतराम पाटील,ज्योती थडके, आकाश पाटील, विश्वजीत पाटील यांच्यासह मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.दोषींवर तातडीने कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला.



निपाणीत ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज पठण करताना तमाम मुस्लिम बांधव.

# निपाणीत बकरी ईद उत्साहात संपन्न

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)–

..............................

**निपाणी शहरात बकरी ईद सण मोठ्या उत्साहात संपन्न झाला.बकरी ईद निमित्त गुरुवारी सकाळी आठ वाजता ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज पठण करण्यात आले.**

यावेळी हाफिज इस्माईल ननदी यांनी बकरी ईद सणाचे महत्त्व विशद केले.ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज पठण संपल्यानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना आलिंगन देऊन बकरी ईद सणाच्या शुभेच्छा दिल्या.ईदगाह मैदानावर किल्ला मोहल्ला, दर्गा मोहल्ला, बागवान मोहल्ला, आझाद मोहल्ला,शानेदिवाण मोहल्ला, तहसीलदार प्लॉट मोहल्ला, बादल प्लॉट मोहल्ला अशा विविध भागातून हजारो मुस्लिम बांधव सामूहिक नमाज पठनासाठी एकत्र जमले होते. या सामूहिक नमाज पठण प्रसंगी एम.ए.नाईक, गणी पटेल, इरफान महात,अबुल शेख बक्तीयार कोल्हापुरे, सलीम शेख, दोस्तमोहम्मद पठाण, फझल पठाण, रियाज पठाण, वहीद पठाण, जुबेर बागवान, झाकीर कादरी यांच्यासह तमाम मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोहिणीचा पेरा साधण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग

कोगनोळी,ता.२८(प्रतिनिधी)–

..............................

**रोहिणी नक्षत्राच्या मुहूर्तावर बळीराजा शेतामध्ये भात पेरणी करत असतो. परंतु यंदा अद्यापही पावसाने पाठ फिरवली आहे. परिणामी सोमवारपासून रोहिणी नक्षत्राच्या मुहूर्तावर बळीराजा भात टोकणने व पेरणी करण्याच्या तयारीत आहे. परंतु रोहिणीचा पेरा यंदा कोराच जाणार का ? असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे.**

प्रमुख ऊस पीक असलेल्या निपाणी तालुक्यातील सीमाभागात दोन महिन्यांपासून शेतकरी पेरणीपूर्व मशागतीच्या कामात व्यस्त असला तरी जिल्ह्याच्या अनेक भागात वळीव पावसाने हजेरी लावली. परंतु निपाणी तालुक्यात बहुतांशी ठिकाणी

### बळीराजाचे डोळे आभाळाकडे

पावसाने देखील पाठ फिरवल्याने नांगरणी, बांध जुळविणे, पेरणीपूर्व मशागतीची कामे जलद गतीने झाली नाहीत. त्यामुळे यंदा रोहिणी नक्षत्राच्या मुहूर्तावर शेतकऱ्यांची भात टोकणनी पेरणी करण्याची लगबग दिसत नाही. गतवर्षी मेच्या दुसऱ्या आठवड्यापासून पाऊस सुरु झाला होता.यंदाच्या खरीप हंगामामध्ये पाऊस लांबल्याने ज्या ठिकाणी नदी, विहिरींची पाण्याची व्यवस्था आहे. अशा ठिकाणी शेतकरी सध्या भात पेरणी व टोकणनीचे काम करीत असला तरी डोंगररानावरील टोकणनी, पेरणीला फारशी गती मिळत नाही. तसेच भुईमूग सोयाबीन इतर कडधान्ये पिकांची मशागतीची कामे देखील खोळंबली आहेत.

# निधी मंजूरीबद्दल समरजितसिंह घाटगेंनी मानले मुख्यमंत्री फडणवीसांचे आभार



मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानताना समरजितसिंह घाटगे.

कागल,ता.२८(प्रतिनिधी)

..............................


**मराठा समाजातील व्यावसायिक तरुणांसाठी मोठा दिलासा ठरणाऱ्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या प्रलंबित व्याज परताव्यासाठी राज्य शासनाने तब्बल १५० कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी दिली आहे. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शाहू ग्रुपचे अध्यक्ष राजे समरजितसिंह घाटगे यांनी मुंबई येथे भेट घेऊन आभार मानले.**

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी मराठा समाजातील तरुणांच्या प्रगतीसाठी राज्य शासन कटिबद्ध असून, समाजाच्या उत्कर्षासाठी शासन ठामपणे पाठीशी राहील, अशी ग्वाही दिल्याची माहिती समरजितसिंह घाटगे यांनी दिली.गेल्या आठ महिन्यांपासून व्याज परताव्याची रक्कम प्रलंबित असल्याने अनेक लाभार्थी आर्थिक अडचणीत सापडले होते. निधीअभावी रखडलेल्या या परताव्यासाठी मराठा समाजातील लाभार्थ्यांनी समरजितसिंह घाटगे यांच्याकडे पाठपुरावा करण्याची मागणी केली होती. त्यानंतर घाटगे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन याबाबत निवेदन सादर करत निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.या पाठपुराव्याची दखल घेत राज्य शासनाने १५० कोटी रुपयांच्या निधीस मान्यता दिली.त्यामुळे प्रलंबित व्याज परतावा मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. शासनाच्या या निर्णयाचे विविध स्तरांतून स्वागत होत आहे.

## निधन वार्ता

### पार्वती खोत

कोगनोळी,ता.२८(प्रतिनिधी)–



हणबरवाडी (ता.निपाणी) येथील रहिवाशी पार्वती लक्ष्मण खोत (वय ९२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.त्यांच्या निधनाने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

### आनंद पुजारी

संकेश्वर,ता.२८(प्रतिनिधी)–



म्हसोबा हिटणी येथील शेतकरी आनंद कल्लाप्पा पुजारी (वय ५५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# निपाणीत ५२ हजार ७५७ विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तकांचे नियोजन

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)–

..............................

**निपाणी तालुक्यातील पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळा सुरू होण्यापूर्वी शासनातर्फे शिक्षण खात्याने मोफत पाठ्यपुस्तकांचा लाभ मिळावा, यासाठी येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने केलेल्या नियोजनानुसार पाठ्यपुस्तकांची पहिली गाडी शहरात दाखल झाली आहे.त्यानुसार, शाळाशाळांमध्ये या पुस्तकांचे सुयोग्य पद्धतीने वाटप करण्यासंदर्भात शिक्षण विभागाने तयारी केली असून काही शाळांमध्ये पाठ्यपुस्तकांचे वितरण सुरू झाले आहे.**

लवकरच दुसरी गाडीदेखील येणार असल्याने सर्वांना वेळेत सर्व पुस्तके मिळतील, असे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले आहे.राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ आणि समग्र शिक्षा व पीएमश्री अंतर्गत सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक वितरण प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. निपाणी तालुक्यात पाचवी व सातवीच्या पाठ्यपुस्तकांचा पहिला साठा प्राप्त झाला आहे. त्यामुळे नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांना वेळेत पाठ्यपुस्तके उपलब्ध करण्यात आले आहेत.निपाणी गटशिक्षणाधिकारी कार्यालय कार्यक्षेत्रात एकूण ५२ हजार ७५७ विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तकांचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये मराठी माध्यमातील ३२ हजार ८२६, सेमी इंग्रजी माध्यमातील १७ हजार १९८ तर उर्दू माध्यमातील २ हजार ७३३ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.सर्वसाधारणपणे शाळा ज्या दिवशी सुरु होतात, त्याच दिवशी पुस्तके मिळाली तर विद्यार्थ्यांचा उत्साह वाढतो. शिवाय शाळेच्या पहिल्या दिवशी स्वागताला पुस्तके मिळण्याच्या अपेक्षेने पालक विद्यार्थ्यांना शाळेत आवर्जुन पाठवतात. त्यामुळे शाळेत आल्यानंतर पुस्तके मिळाल्यानंतर त्याचा विद्यार्थ्यांना आनंद होऊन त्याचा चांगला परिणाम त्यांच्या शाळेतील नियमित उपस्थितीवरही होताना दिसून येतो. हे लक्षात घेऊन शिक्षण विभागाने सर्वांना मोफत पाठ्यपुस्तकांचा शाळेच्या पहिल्याच दिवशी लाभ मिळेल, यादृष्टीने नियोजन केले आहे, असे गटशिक्षणाधिकारी महादेवी नाईक यांनी सांगितले.

# माणकापूरात नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

### ग्रामपंचायत प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष;गाव कचरामुक्त करण्याची मागणी

कारदगा,ता.२८(प्रतिनिधी)

..................

**माणकापूर (तालुका निपाणी) येथे संपूर्ण गावांमध्ये घाणीचे साम्राज्य पसरले असून दुर्गंधी वातावरणासह इतर समस्या आ–वासून उभ्या असतानाही ग्रामपंचायत प्रशासनाचे या समस्येकडे साफ दुर्लक्ष झाले आहे त्यामुळे नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तरी संबंधितांनी पावसाळ्यापूर्वी स्वच्छता करून गाव कचरा मुक्त करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.**

> माणकापूरमध्ये गावातील अगदी मध्यभागी चंद्रप्रभु दिगंबर जैन मंदिरच्या समोर कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे.गावात गेल्या दीड–दोन महिन्यापासून कचरा उठाव झाला नसून गावात घाणीचे व दुर्गंधीचे वातावरण झाले आहे.सदर बाबतीत पंचायतीत तक्रार केली असता पीडीओ साहेब रोज एक नवीन कारण देऊन उडवाउडवीचे उत्तर देत असून अजून कोणतीच दखल घेतली नाही.सदर ठिकाणी मंदिर तसेच खेळाचे मैदान आहे.त्यामुळे लहान थोरांना याचा खूपच त्रास होत आहे.या संकटातून मुक्त करावे.
>
> **उल्हास पाटील,माणकापूर ग्रामस्थ.**



गावच्या सर्वच भागात स्वच्छतेकडे साफ दुर्लक्ष होत आहे.ठिकठिकाणी साचलेला कचरा, तुंबलेले गटारी, टाकाऊ पदार्थ व प्लास्टिक कचऱ्यामुळे गावाचे विद्रुपीकरण झाले आहे.गावाच्या मध्यभागी असलेल्या हुडा चौकाच्या सभोवताली गावातील निघालेला कचरा टाकत असल्याने पुरातन महादेव मंदिर, चंद्रप्रभु दिगंबर जैन मंदिर व मलकारसिद्ध मंदिराचे पावित्र्य धोक्यात आले आहे.

अनेकदा भक्तांना रस्त्यावर पडलेल्या कचऱ्यातून जावावे लागते. समस्येबद्दल ग्रामपंचायत विकास अधिकारी यांना सांगून देखील त्यांच्याकडून टाळाटाळ करण्यात येत आहे. गावातील अनेक ठिकाणी गटारीतील सांड पाण्याचा निचरा होत नसल्याने आरोग्याच्या समस्या उद्भवत आहेत. ग्रामपंचायत सदस्यांचा कार्यकाल संपला असल्याने त्यांनाही अशा समस्येकडे लक्ष देण्यास वेळ नाही. त्यामुळे समस्या मांडण्यासाठी नागरिकांना प्रशासक व विकास अधिकारी यांच्याकडे जाऊन तारेवरची कसरत करावी लागत आहे.

या समस्येचा संबंधितानी त्वरित तोडगा काढून गाव कचरा मुक्त करुन स्वच्छ व सुंदर बनवावे यासाठी विकास अधिकारी यांनी लक्ष देऊन त्वरित ही समस्या मिटवण्याची मागणी होत आहे.

# रवी मद्रासी यांचा डिजिटल इंडिया अभियानात अनोखा विक्रम

चिकोडी,ता.२८(प्रतिनिधी)–

..................

**बेळगाव जिल्ह्यासह, चिकोडीच्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात एका नव्या यशाची सुवर्णमयी भर पडली आहे. विविध ऑनलाईन प्रश्नमंजुषा, राष्ट्रीय प्रतिज्ञा आणि विविध स्पर्धांमध्ये सातत्याने सहभाग नोंदवून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विक्रम प्रस्थापित करणारे चिकोडीचे रवी काडप्पा मद्रासी हे आता अधिकृतपणे ''डॉ.रवी मद्रासी'' बनले आहेत.**



नवी दिल्लीतील नामांकित पी.एच.एच.डी मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड्स फाउंडेशनच्यावतीने त्यांच्या या विशेष कामगिरीची दखल घेत नुकतीच त्यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करून गौरविण्यात आले आहे. यासोबतच, नॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्स संस्थेने त्यांच्या अतुलनीय कामगिरीचा सन्मान करत सर्वोच्च भारत विभूषण पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित केले आहे.

**९२५ डिजिटल प्रमाणपत्रांचा ऐतिहासिक टप्पा**

केंद्र सरकारच्या माय गव्ह आणि माय भारत पोर्टलच्या माध्यमातून डिजिटल इंडिया अभियानात डॉ. रवी मद्रासी यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. त्यांनी आतापर्यंत तब्बल ९२५ हून अधिक डिजिटल प्रमाणपत्रे आणि राष्ट्रीय प्रतिज्ञापत्रांची कमाई करून एक नवा इतिहास रचला आहे. यापूर्वी त्यांच्याकडे ७६०+ प्रमाणपत्रे असताना त्यांची नोंद वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि गोल्डन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये झाली होती. आता ही संख्या ९२५ वर नेऊन त्यांनी स्वतःचाच जुना विक्रम मोडीत काढला आहे.

## कोल्हापुरात सोमवारी आणि मंगळवारी अपुरा पाणीपुरवठा

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)–

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फत सोमवार व मंगळवार, दिनांक १ व २ जून २०२६ रोजी काळम्मावाडी ३३ केव्ही सबस्टेशन येथे आयसोलेटर बसविण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामामुळे येथील विद्युत पुरवठा बंद राहणार असल्याने काळम्मावाडी योजनेमधून शहराला पाणीपुरवठा होऊ शकणार नाही.**

तथापि, पर्यायी व्यवस्था म्हणून शहरास शिंगणापूर, बालिंगा व नागदेववाडी पंपिंग स्टेशनमधून पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. त्यामुळे सोमवार व मंगळवार, दिनांक १ व २ जून २०२६ रोजी शहरातील दैनंदिन पाणीपुरवठा अपुरा व कमी दाबाने होणार असून बुधवार, दिनांक ३ जून २०२६ पासून पाणीपुरवठा सुरळीत होणार येईल. यामध्ये ए व बी वॉर्ड तसेच त्यास सलग्न उपनगरे अशा परिसरातही पाणीपुरवठा कमी दाबाने होणार आहे.तरी नागरिकांनी उपलब्ध होणारे पाणी काटकसरीने वापरून कोल्हापूर महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

## जनगणना कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याचे महानगरपालिकेचे आवाहन

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)–

**भारत सरकारच्या जनगणना विभागामार्फत जनगणना २०२७ चा पहिला टप्पा दिनांक १६ मे पासून सुरु करण्यात आलेला आहे. या टप्प्यात घरगणना व घरयादी गट तयार करण्यात येत असून यासाठी आपल्या घरी येणाऱ्या प्रगणकास नागरिकांनी योग्य व अचूक माहिती देऊन देशाच्या विकास प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.**

जनगणना ही देशाच्या विकासासाठी अत्यंत महत्वाची प्रक्रिया असून शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा व विविध शासकीय योजनांच्या नियोजनासाठी ही माहिती उपयुक्त ठरणार आहे. जनगणना प्रक्रियेदरम्यान नागरिकांनी दिलेली सर्व माहिती पूर्णत: सुरक्षित व गोपनीय ठेवली जाणार आहे.जनगणना अधिनियम १९४८ अंतर्गत माहितीची गोपनीयता सुनिश्चित करण्यात आली असून संकलित माहितीचा वापर केवळ सांख्यिकीय उद्देशासाठी केला जाईल. कोणत्याही व्यक्तीचे नाव किंवा पत्ता इतरांना दिला जाणार नाही तसेच कर, पोलीस किंवा इतर कोणत्याही तपासणीसाठी या माहितीचा उपयोग केला जाणार नाही. प्रशिक्षित प्रगणक घरा घरात भेट देऊन माहिती संकलित करतील. नागरिकांनी न घाबरता त्यांना सहकार्य करून अचूक माहिती द्यावी तसेच सदरचे प्रगणक हे राष्ट्रीय कार्य करत आहेत त्यांना अपमानित न करता त्यांचा आदर करावा, त्यांना सन्मानाची वागणूक द्यावी व देशाच्या विकासात साथ द्यावी. इतर कोणत्याही अफवांवर विश्वास ठेऊ नये, अधिक माहितीसाठी टोल फ्री क्रमांक १८५५ वर संपर्क साधावा, असे आवाहन कोल्हापूर महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.



छ.शिवाजी हायस्कूलमध्ये एच.पी.व्ही.लसीकरण जनजागृती बैठकीप्रसंगी उपस्थित आरोग्य सहाय्यिका व आरोग्य सेवक.

## छ.शिवाजी हायस्कूलमध्ये लसीकरण जनजागृती बैठक संपन्न

सै.टाकळी,ता.२८(प्रतिनिधी)–

**श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल, टाकळी येथे १४ वर्षे पूर्ण व १५ वर्षे वयोगटातील मुलींच्या पालकांसाठी एच.पी.व्ही. लसीकरण जनजागृती बैठकीचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.**

मुलींमध्ये होणाऱ्या गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला प्रतिबंध घालण्यासाठी हे विशेष सत्र आयोजित केले गेले. या बैठकीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, टाकळी येथील आरोग्य सहाय्यिका श्रीम. एल. व्ही. सहारे यांनी पालकांना लसीकरणा संबंधी माहिती दिली.आरोग्य सेविका श्रीम. पी. ए. मोरे, आरोग्य सेवक एस. एम. बोधीकर, व्ही. एम. खाडे आणि आशा वर्कर कौशल्या पाटील प्रामुख्याने उपस्थित होत्या. आरोग्य पथकाद्वारे पालकांना मार्गदर्शन करताना सांगण्यात आले की, योग्य वयात दिलेली ही लस मुलींचे भविष्यातील गंभीर आजारांपासून संरक्षण करू शकते.

पालकांच्या मनातील शंका आणि भीती दूर करून सर्वांनी आपल्या मुलींचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक व्ही. टी. पाटील यांनी भूषवले. याप्रसंगी शाळेचे शिक्षक यू. एस. पाटील, एस. ए. बावचे, एम. एम. धुमाळे यांच्यासह अर्चना कानिटकर व विद्याश्री चावरे आदी पालक उपस्थित होते. प्रास्ताविक एम. एम. धुमाळे यांनी तर आभार यू.एस. पाटील यांनी मानले.

# सहा तासात शेतीला पाणी कसे द्यायचे?

### शेतकऱ्यांमध्ये नाराजी | महावितरणच्या निर्णयाचा जाहीर निषेध | शेतकरी आंदोलनाच्या तयारीत

मुरगूड,ता.२८(प्रतिनिधी)–

**महावितरणने शेतीसाठी पंपाची वीज तब्बल दोन तासांनी कपात केली असून आता आठ तासाऐवजी केवळ सहा तासच वीज मिळणार आहे. महावितरणच्या या निर्णयाने शेतकरी वर्गात कमालीची नाराजी पसरली असून ऐन उन्हाळ्यात वीज कपात करून शेतकऱ्यांना मोठा शॉक दिला आहे या निर्णयाचा शेतकरी बांधवांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली असून प्रसंगी मोठ आंदोलन उभा करू, असा इशारा दिला आहे.**

महावितरणकडून शेतीपंपांना वीज पुरवठ्यासाठी यापूर्वी रात्री आठ तास व



दिवसा आठ तास, असे दोन टप्प्यांत वेळापत्रक केले होते. त्याप्रमाणे प्रत्येक विभागाच्या वेळा या वेगवेगळ्या होत्या. परंतु, महावितरणने सक्तीचे भारनियमनच्या नावाखाली आठ तासांऐवजी सहा तासच वीजपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यातच रात्रीचा वीजपुरवठा पूर्णपणे बंद केला आहे.याची अंमलबजावणीही सुरू केली असून, ती २६ मे ते १५ जूनपर्यंत असणार आहे. हा निर्णय पूर्णपणे चुकीचा असून, अन्यायकारक आहे, अशा भावना शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहेत.

दरम्यान, सध्या मोठ्या प्रमाणात वीज मागणी वाढली आहे. त्यामुळे वीजपुरवठा करताना ताण येत आहे. यासाठी हे पाऊल उचलले असून, ते शेतकऱ्यांच्या फायद्याचेच आहे. तसेच हे तात्पुरत्या कालावधीसाठी केल्याचे महावितरणचे म्हणणे आहे.रात्री वीज जादा शिल्लक असल्याचे महावितरणकडून सांगितले जाते. मग, शेतीपंपांना दोन तास वीज कपात करण्याचा निर्णय का घेतला? तो पूर्णपणे चुकीचा असून, त्याला कोणत्याही कायद्याचा आधार नाही. या विरोधात आंदोलन करू, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.उन्हाच्या वाढत्या तीव्रतेने शेतपिकांना मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज असताना सहा तासात सर्व पिकांना पाणी कसे द्यायचे, अशा नव्या चिंतेत सध्या शेतकरी आहे. आतापर्यंत वाढवलेली सर्व चांगली पिके वाळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.त्यामुळे पूर्वीप्रमाणे शेतीसाठी आठ तास वीज मिळावी अन्यथा आंदोलनाशिवाय पर्याय नाही अशी भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत.

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोफत भुईमूग,सोयाबीन वाटप

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)–

**तेलबिया पिकांच्या उत्पादनास चालना देण्यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोफत खरीप भुईमूग व सोयाबीन वाटप करण्यात येणार आहे. जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने भुईमूग आणि सोयाबीन या दोन प्रमुख पिकांसाठी अभियानाची निवड करण्यात आली आहे.**

वैयक्तिक पात्र शेतकऱ्यांना प्रमाणित बियाणे वितरणासाठी १०० टक्के मोफत बियाणे दिले जाईल. अधिक माहितीसाठी आपल्या गावातील सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा , असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी जालिंदर पांगरे यांनी केले आहे.

## बोरवडे येथे रक्तदान शिबीर संपन्न

बिद्री,ता.२८(प्रतिनिधी)

**कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकूळ) कर्मचारी संघटना यांच्यावतीने संजीवनी ब्लड बँकेच्या सहकार्यातून दूध शितकरण केंद्र बोरवडे (ता. कागल) येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.**

यावेळी ६५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.यावेळी शाखाप्रमुख विजय कदम, दूध संकलन अधिकारी राजेंद्र चौगले, संघटनेचे जनरल सेक्रेटरी शाहीर सदाशिव निकम, संघटना प्रतिनिधी बाळकृष्ण मंडलिक, उत्तम पाटील यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व रक्तदाते उपस्थित होते.

# ज्येष्ठांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे

### डॉ.एम.ए.बोरगावे

इचलकरंजी,ता.२८

**६० वर्षावरील ज्येष्ठांनी आपला समतोल आहार, वयानुसार व्यायाम व मनवृत्ती समाधानी ठेवण्यासाठी आपली दिनचर्येचे काटेकोर पालन करावे. सध्याच्या धावपळीच्या जीवनात ज्येष्ठांनी आपल्या आरोग्याकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे यासाठी आपल्या खाण्यापासून व्यायाम, पुरेशी झोप चित्ती असु द्यावे समाधानी हे सुत्र अवलंबले तर जीवन अधिक आनंदी होईल, असा सल्ला डॉ. एम.ए.बोरगावे यांनी दिला.**



डॉ. एम.ए.बोरगावे यांचा सत्कार करताना प्रमुख मान्यवर.

रोटरी सेंट्रल एक्झिक्युटिव्ह प्रोबस क्लबच्यावतीने ज्येष्ठांसाठी डॉ. एम. ए. बोरगावे यांचे जेष्ठांनी आपले आरोग्य कशाप्रकारे सुदृढ ठेवावे याविषयी व्याख्यान आयोजित केले होते.यावेळी ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष प्रकाशराव सातपुते हे होते. स्वागत व प्रास्ताविक क्लबचे सेक्रेटरी किरण कटके यांनी केले. प्रमुख व्याख्याते डॉ.बोरगावे यांचा सत्कार शाल, पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

यावेळी प्रकाशराव सातपुते यांनी ता. ६ जून रोजी होत असलेल्या डिस्ट्रीक्ट कॉन्फरन्स संदर्भात नियोजनाविषयी माहिती दिली.त्याच बरोबर क्लबचे विद्यमान अध्यक्ष सुनिल कोष्टी यांनी रोटरीच्या कार्याचा आढावा घेतला.

यावेळी इचलकरंजी हातमाग विणकर सोसायटीच्या अध्यक्षपदी प्रकाशराव दत्तवाडे व संचालकपदी शिवबसु खोत यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा डॉ. बोरगावे व प्रकाशराव सातपुते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.आभार सौ. संगिता लडगे यांनी मानले. यावेळी डी. एम. बिरादार, काशिनाथ जगदाळे, जयश्री चौगुले, सदाशिव काजवे, माधवी कुलकर्णी, अस्मिता कांबळे, वासंती चिवटे, द्राक्षायणी लाटकर, प्रकाश अकिवाटे, जयप्रकाश साळगावकर, प्रदीप लडगे, प्राजक्ता होगाडे, विना श्रेष्ठी, डेझी कुरणे, सुजाता कोईक,मंजुळा कांबळे, मल्लिकार्जुन तेग्गी, कैलास तिवारी, अनिल ज्वारे, जगन्नाथ पोटे, दिपाली कोळी, रेखा कांबळे, प्रमोदिनी देशमाने, हिमांशु मिरगे, निर्मला मोरे,निता दोडन्नावर,एम. के कांबळे, महावीर कुरुंदवाडे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

## पिंपरी-चिंचवडमध्ये फुगेवाडीत एकाच दिवशी ७ जणांच्या मृत्यूने खळबळ

मुंबई,ता.२८–

**पिंपरी- चिंचवड येथील फुगेवाडी परिसरात एकाच भागात तब्बल पाच जणांचा मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एकाच दिवशी सात जणांचा मृत्यू झाल्याने या परिसरात खळबळ उडाली आहे.**

फुगेवाडीतील गावच्या आझाद चौकात एका फलकावर या मृतांची नावे लिहिल्यानंतर परिसरातील लोकांना या घटनेसंदर्भात माहिती कळाली आणि संपूर्ण परिसरात भीती पसरली. हे मृत्यू अवैध हातभट्टीच्या दारुमुळे झाल्याचा संशय व्यक्त होत आहे.

**हातभट्टीच्या दारूने मृत्यू ?**

एकाच वेळी अशा प्रकारे सात जणांचा मृत्यू झाल्याचे कळल्यानंतर फुगेवाडीत विविध तर्कवितर्क वर्तवण्यात येत आहेत. गावाच्या आझाद चौक आणि परिसरात दोन ठिकाणी हातभट्टीची दारु आणि गावठी दारुचे अड्डे सुरु असल्याची चर्चा आहे.यामुळे या सात नागरिकांचा मृत्यू याच अड्ड्यावरील विषारी दारुमुळे झाला असावा संशय आहे.

या संदर्भात हातभट्टी दारुच्या अवैध धंद्यांवर पोलिसांची कारवाई होत नसल्याने नागरिकांकडून या प्रकरणात कारवाईची मागणी होत आहे.

# जिल्ह्यातील १३१ शेतकऱ्यांना ६० लाखांचे अनुदान मंजूर

### कृषी अधिकारी पांगरे यांची माहिती

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)–

**कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान योजना २०२६-२७ अंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील १३१ शेतकऱ्यांच्या सुमारे ६०.८१ लाख रुपयांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. महाडीबीटी पोर्टलवर प्राप्त अर्जांमधून 'प्रथम अर्ज, प्रथम प्राधान्य' या तत्त्वानुसार लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जालिंदर पांगरे आणि कृषी उपसंचालक नामदेव परीट यांनी दिली.**

योजनेअंतर्गत वैयक्तिक शेततळे अस्तरीकरणासाठी सर्वाधिक ७० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून त्यासाठी ३६.३६ लाख रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. मसाले पीक व औषधी वनस्पती लागवडीसाठी २२ लाभार्थ्यांना ६.०१ लाख, विड मॅटसाठी ११ लाभार्थ्यांना ५.०५ लाख, मधुमक्षीका वसाहटीसाठी १४ लाभार्थ्यांना ४.७० लाख, ड्रॅगन फ्रूट व अव्होकॅडो लागवडीसाठी ५ लाभार्थ्यांना ४.१० लाख, लहान मशरूम उत्पादन प्रकल्पासाठी ३ लाभार्थ्यांना ४ लाख आणि प्लास्टिक मल्चिंगसाठी ६ लाभार्थ्यांना ०.५९ लाख रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. निवड झालेल्या शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी महा-ई-सेवा केंद्राच्या माध्यमातून आवश्यक कागदपत्रे तातडीने पोर्टलवर अपलोड करावीत, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. यामध्ये ७/१२ व ८-अ उतारा, आधार कार्ड, बँक पासबुक तसेच संबंधित घटकासाठीचे अधिकृत कोटेशन आणि इतर आवश्यक कागदपत्रांचा समावेश आहे.एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान योजनेअंतर्गत विविध घटकांचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या आणि अद्याप अर्ज न केलेल्या शेतकऱ्यांनी :https://mahadbt. maharashtra. gov.in](https://mahadbt. maharashtra.gov.in पोर्टलवर जाऊन त्वरित अर्ज सादर करावेत, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

योजनेबाबत अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी नजीकच्या कृषी विभागाशी संपर्क साधावा.

श्रीहरी
शुक्रवार, ता. २९/०५/२०२६ पासून
रोज ३ खेळ, दु. १ व ४ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
मधुर मिलन
सायं. ७ वा.
तेरी चाहत
A प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. २९ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
ऑकल विस्टा
A फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी चित्रमंदिर
इचलकरंजी
इचलकरंजीकरांची पहिली पसंती



देऊळ बंद 2
आता मंदिर देवारी...
हास्य, भक्ती आणि कौटुंबिक मनोरंजनाचा अनोखा संगम!
देऊळ बंद 2 - रोज 4 खेळ
दुपारी 12.00 वा. | दुपारी 3.00 वा. | सायंकाळी 6.00 वा. | रात्री 9.00 वा.
DOLBY 7.1 SURROUND SOUND
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील !
ऑनलाईन बुपेमेंट स्वीकारले जाते
Google Pay • PhonePe • Accept है!
G Pay PhonePe
ऑनलाईन बुकिंग सुरु book my show
संपर्क : 9623150103

५७ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजिटल साऊंड सिस्टीम
महिला व बच्चे कंपनीचा २ रा आठवडा
रोज ४ खेळ १२-३-६-९ वा.
मूर्तीत अडकण्या पेक्षा माणसातील देव ओळखायला शिकवणारा अप्रतीम सिनेमा....
देवळात गर्दी करण्यापेक्षा माणसाला माणुसकी दाखवा देव स्वत: तुमच्याकडे येईल...



देऊळ बंद-२ आता परीक्षा देवाची...

कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत गुरुवार ता. २१ पा
११.४५ * ३ * ६.१५ व ९.३० वा.
संपूर्ण फॅमिलीसह चित्रपट पहा
(मराठी चित्र)
जनता दर 50/-
DOLBY DIGITAL QUBE
वाढत्या गर्दीचा २ रा आठवडा



देऊळ बंद २
आता परीक्षा देवाची...
मु. मोहन जोशी, महेश मांजरेकर, प्रसाद ओक, प्रविण तरडे

गुरु
गुरुवार ता.२१ पासून
ऑनलाईन बुकींग book my show
१२ * ३.१५ * ६.१५ व ९.३० वाजता
सहकुटुंब सहपरिवार महिलांच्या प्रचड गर्दीचा २ रा आठवडा



देऊळ बंद २ (मराठी)

RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 book my show



" देऊळ बंद 2 "- मराठी
10:15 AM, 12:15 PM
02:30 PM, 03:30 PM
06:00 PM, 07:00 PM
09:15 PM, 10:15 PM
" राजा शिवाजी "- मराठी
11:00 AM, 04:30 PM
10:30 PM
" चाँद मेरा दिल " - हिंदी
01:30 PM
" कृष्णावतारम " - हिंदी
08:00 PM
आता कोणताही शो पहा 100/-* पासून पुढे

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on book my show
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11



देऊळ बंद २ (MAR) (U/A)
10.45am, 12.00, 02.00, 03.30, 05.30, 07.00, 09.00, 10.30pm
राजा शिवाजी (MAR) (U/A)
10.30am, 04.45, 10.30pm
पती पत्नी और वो दो (HIN) (U/A)
08.15pm
चांद मेरा दिल (HIN) (U/A)
02.00pm
आता पहा कोणताही शो फक्त 100 पासून पुढे

# जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये निधीवरून रस्सीखेच

## बैठकांवर बैठका,निधी वाटपाचे सूत्र ठरेना; विकास कामांचे घोडे अडले

सांगली,ता.२८(प्रतिनिधी)-

**दीर्घकाळाच्या प्रशासकराज नंतर लोकनियुक्त पदाधिकारी-सदस्य कार्यरत झाले असून जिल्हा परिषदेला आर्थिक निधीची लॉटरी लागली आहे. वित्त आयोग, मुद्रांक शुल्क,शासन उपकर आदी माध्यमातून विकास कामांसाठी सुमारे ६० कोटी रूपयांहून अधिकचा निधी उपलब्ध झाला आहे.या निधीच्या वाटपाचे सुत्र मात्र अद्याप फायनल नसून त्यासाठी विकास कामांचे घोडे अडले आहे.**



अध्यक्ष, उपाध्यक्षांसह सभापतींना किती निधी व प्रत्येक सदस्यांना किती निधी द्यायचा यासाठी बैठकांवर बैठका होत आहेत.एकजूट दाखवत सत्तेवर आलेल्या महाविकास आघाडीच्या या पदाधिकाऱ्यांमध्ये निधीवरून रस्सीखेच सुरू असल्याचे चित्र आहे. निधी वाटपाचे सूत्र ठरवून कार्यवाही कधी सुरू होणार याकडे प्रशासनासह जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.मार्च अखेर व त्यानंतर नव्या आर्थिक वर्षात जिल्हा परिषदेला शासनाकडून सुमारे ६० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाल्यानंतर आता या निधीच्या वाटपावरून जिल्हा परिषदेत जोरदार चर्चा सुरू झाली आहे. पदाधिकारी आणि सत्ताधारी पक्षातील काही प्रमुख नेत्यांची सोमवारी यासाठी बैठकही झाली. मात्र ठोस निर्णय झाला नसल्याचे समजते.विरोधी पक्षातील सदस्यांची भूमिकाही अद्याप गुलदस्त्यात दिसत आहे. या निधी वाटपाच्या सुत्र ठरवण्यावर चर्चा सुरू आहेत. वाटप कशा पद्धतीने करायचे यावरून सत्ताधारी गटातच मतभेद निर्माण झाल्याची चर्चा अधिकारी, कर्मचाऱ्यांमध्ये रंगली आहे. अध्यक्ष आणि उपाध्यक्षांना प्रत्येकी दोन कोटी रुपयांचा तर प्रत्येक सभापतींना प्रत्येक १ कोटी रूपयांचा निधी देण्याचा प्रस्ताव चर्चेला आहे. त्याशिवाय उर्वरीत सर्व सदस्यांना प्रत्येकी ६० ते ७० लाख रूपये निधी विकास कामांसाठी देण्याचा प्रस्ताव विचारधीन आहे.तसेच चार सभापतींना प्रत्येकी एक कोटी रुपयांचा निधी देण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला.

निधी वाटपाचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. वरिष्ठ नेत्यांच्या कानावर हा विषय घालून लवकरच मार्ग नक्की होईल असे समजते.आगामी काही दिवसांत यावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. मात्र निधी वाटपाच्या निकषांवरून पदाधिकाऱ्यांमध्ये सुरू असलेली अंतर्गत नाराजी पुढील काळात अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### मंत्रालयात जाऊनही मिनी मंत्रालयात आशा

जिल्हा परिषदेच्या निधीतून विकास योजना राबवण्याचा अधिकार जि.प. पदाधिकारी व सदस्यांचा आहे. आमदार व खासदार यांना शासनाचा स्वतंत्र निधी असतो. या आमदार महोदयांना राज्य शासनाच्या विविध विभागाच्या माध्यमातून विकास योजना राबवण्याची संधी असते. तरीही जिल्ह्यातील आमदारांनी सुचवलेल्या विकास कामांसाठी जिल्हा परिषदेच्या या निधीतून प्रत्येकी ५० लाख रुपयांचा निधी राखून ठेवण्याची नवी चर्चा जिल्हा परिषदेत सुरू झाली आहे. त्यामुळे आमदारांनी सुचवलेल्या कामांवर पाच ते सहा कोटी रूपये खर्च होण्याची शक्यता आहे.

# लोडशेडिंग विरोधात शिवसेनेची मिरजेत महावितरणवर धडक

मिरज,ता.२८(प्रतिनिधी)-

**ग्रामीण भागात शेतकऱ्यांना होत असलेला अनियमित व कमी दाबाने वीजपुरवठा, तसेच लोड शेडिंग विरोधात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाने मिरजेत महावितरण कार्यालयावर धडक दिली. शिवसेनेचे महानगर प्रमुख व मिरज विधानसभा मतदार संघाचे नेते मोहन वनखंडे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण भागातील पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकऱ्यांनी महावितरणच्या अधीक्षक अभियंता यांना निवेदन दिले.**

महावितरणच्या अधिकाऱ्यांनी आवश्यक त्या उपाययोजना करुन शेतकऱ्यांना नियमित वीज पुरवठा करण्याचे आश्वासन दिले. यावेळी प्रदीप सावंत, विजय पाटील, विलास देसाई, कपिल कबाडगे, विद्याधर कांबळे, नगरसेवक सागर वनखंडे, तुषार खांडेकर, अजित शेजुळ, इस्माईल कुरणे, संजय



**महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांना निवेदन देताना शिवसेना नेते मोहन वनखंडे, प्रदीप सावंत, विजय पाटील व इतर मान्यवर.**

लिंबेकाई, श्रीकांत पाटील यांच्यासह पदाधिकारी,कार्यकर्ते, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.निवेदनात म्हटले आहे, ग्रामीण भागात वारंवार होणारे लोडशेडिंग, अनियमित व कमी दाबाने वीजपुरवठा यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. उन्हाळा तीव्र आहे व शेती हंगामात पिकांना वेळेवर पाणी देणे गरजेचे आहे. मात्र सततची वीज कपात व रात्री केला जाणारा वीजपुरवठा यामुळे शेतकऱ्यांना मानसिक, आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. विजेअभावी पाण्याचे विद्युत पंप बंद राहत आहेत.कमी दाबाने होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे विद्युत पंप जळणे, ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त होणे असे प्रकार घडत आहेत. शेतीपंपांसाठी नियमित व पुरेशा दाबाने वीजपुरवठा करावा, शेतकऱ्यांना वीज पुरवठ्याचे वेळापत्रक पूर्वसुचनेसह उपलब्ध करुन द्यावे, आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

### शेतीसाठी नियमित वीज पुरवठा करण्याची मागणी

## गतिरोधकांवर पांढरे पट्टे नसल्याने अपघाताचा धोका

कराड,ता.२८(प्रतिनिधी)-

**शहरातील अनेक रस्त्यांवरील गतिरोधकांवर पांढरे पट्टे न मारल्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः नवीन वाहनधारकांना किंवा बाहेरगावाहून येणाऱ्या नागरिकांना गतिरोधकांची कल्पना नसल्याने अचानक ब्रेक मारावे लागत असून छोटे-मोठे अपघात घडत आहेत.**

शहरातील मुख्य रस्ते तसेच उपनगरांतील अनेक भागांमध्ये गतिरोधक आहेत.मात्र त्यावर कोणत्याही प्रकारचे परावर्तित पांढरे पट्टे किंवा सूचना फलक नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. तरी शहरातील सर्व गतिरोधकांवर पांढरे पट्टे मारून परावर्तित रंगाचा वापर करावा. सूचना फलक लावावेत, याकडे नगरपालिकेने तातडीने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

# आष्टा मळे भागातील विद्युत पुरवठा सुरळीत करावा-शिंदे

## संतप्त नागरिकांचा महावितरण कार्यालयावर मोर्चा

आष्टा,ता.२८(प्रतिनिधी)-

**आष्टा शहरातील मळे भाग व परिसरातील गोटखिंडी, बावची कारंदवाडी मिरजवाडी,मर्दवाडी या गावांमधून रात्रीच्या वेळी लोड शेडिंगच्या नावाखाली विद्युत पुरवठा खंडित होत होता.बिबट्याचे दर्शन,विषारी प्राण्यांचे हल्ले, चोरीच्या घटना यामुळे मळे भाग भयभीत आहे.त्यामुळे खंडित होणारा विद्युत पुरवठा थांबवून तो सुरळीत करावा अन्यथा आंदोलन करू, असा इशारा निवेदनाद्वारे नगराध्यक्ष विशाल शिंदे यांनी महावितरणचे उपकार्यकारी अभियंता यांना दिला आहे.**

दरम्यान,बुधवारी रात्री शिंदे मळा, खोतमळा परिसरातील संतप्त नागरिकांनी विद्युत वितरण कार्यालयावर मोर्चा काढून कार्यालयाला कुलूप ठोकले होते. आष्टा शहरात खोत मळा,शिंदे मळा,घाटगे मळा, बोडके मळा, खोत-माने मळा,रान मळा, बसुगडे मळा, खाडे मळा यासह वीस ते पंचवीस मळे आहेत. मळे भागात सुमारे दहा हजार लोकसंख्या वास्तवास असेल. काही दिवसापासून रात्रीच्या वेळी या मळे भागातील विद्युत पुरवठा दोन ते तीन तास खंडित केला जात होता. याबाबतच्या तक्रारी नागरिकांनी संबंधित अधिकारी व नगराध्यक्ष विशाल शिंदे यांच्याकडे केल्या होत्या. नगराध्यक्ष यांनी देखील तशा सूचना महावितरणचे अधिकाऱ्यांना दिल्या होत्या, मात्र त्यांच्या कामात कसलीच सुधारणा झाली नाही. दोन ते अडीच तास जाणारी लाईट यामुळे नागरिक बेजार झाले आहेत. संतप्त नागरिकांनी नगरसेवक विराज शिंदे,संजय सावंत, प्रवीण माने,पोपट शिंदे यांच्यासह नागरिकांनी बुधवारी रात्री लाईट गेल्यानंतर येथील महावितरणच्या कार्यालयावर राडा केला. कार्यालयासमोरच घेराव केला अधिकाऱ्यांशी हमरी तुम्ही झाली. जमावाने कार्यालयाला कुलूप ठोकले. त्यानंतर विद्युत पुरवठा खंडित केला जाणार नाही असे तोंडी आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी दिले.नगराध्यक्ष विशाल शिंदे यांनी तोंडी आश्वासन नको तर प्रत्यक्ष लोड शेडिंग बंद करून कृती करा अन्यथा आंदोलन करू असा इशारा निवेदनाद्वारे दिला.



आष्टा येथील विद्युत वितरण कार्यालयाबाहेर जमलेले नागरिक.

### गोटखिंडी गावातही वीजेचा लपंडाव

गोटखिंडी येथील विकास पाटील, विनायक पाटील,दिलीप पाटील, प्रताप थोरात, प्रकाश पाटील, राहुल नांगरे, प्रकाश एटम पाटील व नागरिकांनी देखील एकत्रित येत खंडित होणाऱ्या विद्युत पुरवठा विरोधात आवाज उठवीत अधिकाऱ्यांना जाब विचारला. इस्लामपूर येथील कार्यकारी अभियंता एस.व्ही.माळी यांना भेटून निवेदन दिले.



डॉ.प्रसाद जोशी यांना पुरस्कार प्रदान करताना मकरंद अनासपुरे, संजय आवटे, सागर अहिवळे व इतर.

## जीवनगौरव पुरस्काराने डॉ.प्रसाद जोशींचा सन्मान

फलटण,ता.२८(वार्ताहर)-

**फलटण येथे समर्पित, सहानुभूतीपूर्ण आणि प्रगत ऑर्थोपेडिक सेवा देणाऱ्या डॉ. प्रसाद जोशी यांना पुणे येथे प्रतिष्ठित 'जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. ग्रीन सोल्युशन्स प्रा. लि.यांच्यावतीने पुण्यातील बालेवाडी येथे भव्य सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.**

हा पुरस्कार प्रख्यात अभिनेते मकरंद अनासपुरे आणि संजय आवटे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे फलटणमधील गुणवत्तापूर्ण व परवडणाऱ्या ऑर्थोपेडिक सेवेला मिळालेली दखल अधोरेखित झाली आहे. पुरस्कार स्वीकारताना संबंधित मान्यवरांनी ग्रीन सोल्युशन्स प्रा. लि. तसेच सागर अहिवळे आणि श्रीमती आरती भोसले अहिवळे यांचे आभार मानले.

## खरीप पीक स्पर्धेत ढेबेवाडीच्या शेतकऱ्यांचे यश

ढेबेवाडी,ता.२८(प्रतिनिधी)-

**वन्य प्राण्यांचा उपद्रव, बेभरोशी पाऊस, कधी आला, तर कधी कोरडा दुष्काळ अशा आव्हानात्मक स्थितीत ढेबेवाडी विभागातील विविध गावच्या शेतकऱ्यांनी कृषी विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या खरिपाच्या पीक स्पर्धेत झेंडा फडकवला. विभागातील चार शेतकऱ्यांनी तालुका व जिल्हापातळीवर यश संपादन केल्याने त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.**

आव्हानात्मक स्थितीत विभागातील विविध गावच्या शेतकऱ्यांनी कृषीमार्फत गेल्या खरीप हंगामात घेतलेल्या पीक स्पर्धेत यश मिळवले. स्पर्धेचा निकाल नुकताच लागला. मंद्रुळकोळेचे गणपत रामचंद्र जौजाळ यांनी खरीप भुईमूग पिकांत एकरी ३६.११ क्विंटल उत्पन्न घेऊन, तर मत्रेवाडीचे सुरेश भाऊ मत्रे यांनी खरीप ज्वारी पिकांत एकरी ३०.८० क्विंटल उत्पन्न घेऊन द्वितीय क्रमांक पटकावला. मत्रेवाडीचे लक्ष्मण मारूती मत्रे यांनी खरीप भुईमूग पिकांत एकरी ३३.९२ क्विंटल उत्पन्न घेऊन पाटण तालुक्यात प्रथम क्रमांक व मानेगावचे सुभाष मारूती माने यांनी भात पिकांत एकरी ६४.८९ क्विंटल उत्पन्न घेऊन तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळविला. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाग्यश्री फरांदे, तालुका कृषी अधिकारी विठ्ठल बांभळे, मंडल कृषी अधिकारी बळवंत खोराटे, उपकृषी अधिकारी श्रीकृष्ण माने, सोनबा नेवसे, सहाय्यक कृषी अधिकारी अर्जुन पवार, उदय पवार, विश्वजीत काळे, मंडल कृषी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन मिळाले.

# खासगी क्लासेस नियंत्रणासाठी कायदा करा

## क्लासेस चालकांची मागणी; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



निवासी जिल्हाधिकारी डॉ.स्नेहल कनिचे यांच्याकडे निवेदन देताना क्लास चालक संघटनेचे पदाधिकारी.

मिरज,ता.२८(प्रतिनिधी)-

**कोचिंग क्लासेस टिचर्स असोसिएशन व सोशल फोरम या चरितार्थासाठी शिकवणी वर्ग चालवणाऱ्या क्लास चालकांच्या संघटनेच्या वतीने नीट पेपरफुटीचा निषेध करणारे व असे गैरप्रकार टाळण्यासाठी, शिक्षण क्षेत्राचा धंदा करणाऱ्या अपप्रवृत्ती रोखण्यासाठी क्लासेस नियंत्रित करणारा सशक्त व भक्कम कायदा आणावा, अशी मागणी केली आहे. याबाबतचे निवेदन निवासी जिल्हाधिकारी डॉ. स्नेहल कनिचे यांना देण्यात आले.**

यावेळी प्रा. नारायण उंटवाले, रावसाहेब हल्लोले,संजय कुलकर्णी, प्रताप गस्ते,भीमराव धुळूबुळू, आर. बी. शिंदे, राघवेंद्र नाईक, विशाल मगदूम, बसवराज हिरेमठ,राजू पाटील, मकरंद उपळावीकर,सूर्यकांत तवटे, विनायक ढवळे, सुनील कुलकर्णी, विशाल लोहार आदी क्लास चालक उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे, गेली १५ वर्षे शिकवणीवर्ग नियंत्रित करणारा कायदा आणावा अशी मागणी आहे. दुर्दैवाने असा कायदा शासनाने केला नाही.पैसा मिळवण्यासाठी आलेल्या लोकांच्या अनैतिक कारनाम्यामुळे हा व्यवसाय बदनाम केला जात आहे.अशा क्लासचालकांच्या अतिक्रमणामुळे छोटे गुणवान शिक्षक बाहेर फेकले जात आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेली मार्गदर्शक तत्वे,संघटनेने सुचवलेल्या सुधारणा विचारात घेऊन सशक्त कायदा अस्तित्वात यावा, अशी मागणी केली आहे.

# भीमा नदीवर बॅरेजेस बांधावेत

## मंत्री जयकुमार गोरेंना निवेदन

पंढरपूर,ता.२८(प्रतिनिधी)-

**सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी उजनी धरणाच्या पाणीवाटप धोरणाप्रमाणे सद्या रब्बीमध्ये एक आणि उन्हाळ्यात एक पाण्याची पाळी कालव्यातून सोडण्यात येत असून भीमा नदीवर बॅरेजेस बांधून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक व चेअरमन कल्याणराव काळे यांनी निवेदन देऊन केली.**



मंत्री जयकुमार गोरेंना निवेदन देताना कल्याणराव काळे व इतर.

मंत्री जयकुमार गोरे यांनी चेअरमन कल्याणराव काळे यांची पंढरपूर शहरातील संपर्क कार्यालय या ठिकाणी सदिच्छा भेट घेऊन विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली.

यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भीमा नदीत शेती सिंचनासाठी पाणी सोडण्यात येत नाही. केवळ शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी पाणी सोडून त्या काळात वीज पुरवठा खंडित करण्याची पद्धत सुरु झाली आहे.त्यामुळे नदीकाठच्या शेतकऱ्यांना कृत्रिम पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. भविष्यातील कायमस्वरूपी पाणी टंचाई टाळण्यासाठी भीमा नदीवर बॅरेजेस बांधण्यात यावेत.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या निवेदनाचा विचार करून भविष्यात संभाव्य पाणीटंचाई होणार नाही याबाबत योग्य तो निर्णय घेऊ, असे आश्वासित केले. याप्रसंगी महादेव देठे, सहकार शिरोमणी कारखान्याचे व्हा. चेअरमन भारत कोळेकर, गोरख जाधव, मोहन नागटिळक, सुरेश देठे, जयसिंह देशमुख,अरुण नलावडे,शंकर चव्हाण,अमोल माने, जोतीराम पोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी ऊस विकास योजनेचा लाभ घ्यावा

## विराज नाईक; मांगलेत शेतकरी संवाद मेळावा

शिराळा,ता.२८(प्रतिनिधी)-

**'विश्वास' कारखान्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या ऊस विकास योजनेचा व मार्गदर्शनाचा फायदा शेतकऱ्यांनी करून घ्यावा, असे प्रतिपादन कारखान्याचे संचालक व जिल्हा परिषद सदस्य विराज नाईक यांनी केले.**

मांगले (ता.शिराळा) येथे विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखाना आणि दि डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन यांचे मार्फत 'ऊस उत्पादकता वाढ अभियान' अंतर्गत शेतकरी संवाद मेळावा संपन्न झाला.त्याच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. दि डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन इंडियाचे अध्यक्ष सोहन शिरगावकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संचालक विराज नाईक म्हणाले, कारखान्या मार्फत ऊस विकासासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू आहेत.वाढत्या रासायनिक खताच्या किमती व इंधनाची उपलब्धता यामुळे शेतकऱ्यांना ऊस शेती करताना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे.कारखाना अनुदान तत्त्वावर रोपांचा पुरवठा करत आहे. जिवाणूंचा व व्ही. एस. आय.च्या उत्पादनाचा अनुदानावर पुरवठा केला जात आहे. रासायनिक व कंपोस्ट खताचा पुरवठाही केला जातो. या सर्वांचा फायदा नक्कीच शेतकऱ्याच्या उत्पादनावर होईल यात काही शंका नाही. विश्वास कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस शेतकऱ्यांचे उत्पादन वाढवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे.

'दि डेक्कन शुगर'चे श्री. शिरगावकर म्हणाले, डी.एस.टी.ए. ही तज्ञ लोकांची संस्था आहे. त्यांच्याकडील ज्ञानाचा उपयोग आपल्या कारखान्यासाठी व्हावा, यासाठी आम्ही तुमच्यापर्यंत पोहोचलो आहोत. वाढत्या गाळप क्षमतेनुसार ऊस उत्पादन वाढवणे हा एकमेव पर्याय आहे. प्रारंभी स्वागत प्रास्ताविक उप ऊस विकास अधिकारी संदीप पाटील यांनी केले. प्रमुख वक्ते डॉ.अरुण मराठे यांनी मृदा शास्त्र जमिनीची सुपीकता याविषयी सखोल मार्गदर्शन केले. कृषी भूषण डॉ. संजीव माने यांनी ऊस उत्पादन वाढीचे सोपे तंत्रज्ञान या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी 'विश्वास'चे संचालक सुरेश पाटील, कार्यकारी संचालक अमोल पाटील,पंचायत समिती सदस्य मोहन पाटील,सरपंच प्रल्हाद पाटील, उपसरपंच पांडुरंग कुंभार, जयसिंग पाटील, शेती अधिकारी प्रकाश सूर्यवंशी,मांगले व पंचक्रोशीतील ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते. कामगार संचालक दत्तात्रय पाटील यांनी आभार मानले.



मांगले येथील शेतकरी संवाद मेळाव्यात बोलताना जिल्हा परिषद सदस्य विराज नाईक, समोर उपस्थित शेतकरी.

# 'तिळगूळ घ्या गोडबोले' एकांकिकेला दादा महाराज करंडक

## सातारा येथे राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा उत्साहात

सातारा,ता.२८(प्रतिनिधी)-

**सातारा नगरपरिषद आयोजित राज्यस्तरीय दादा महाराज करंडक श्री शाहू कलामंदिर येथे उत्साहात आणि प्रेक्षकांच्या भरघोस प्रतिसादात पार पडला.**

कलादर्शन व कलाशृंगार पुणे यांनी सादर केलेल्या तिळगूळ घ्या गोडबोले या एकांकिकेने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. यात रोख रु.५१ हजार व करंडक यांचा समावेश होता.या स्पर्धेमध्ये राज्यभरातून एकूण २८ संघांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेतील विविध एकांकिकांमधून सामाजिक प्रश्न,मानवी नातेसंबंध,ग्रामीण वास्तव,युवकांचे प्रश्न आणि बदलती जीवनशैली यांचे प्रभावी चित्रण करण्यात आले. संपूर्ण स्पर्धेमध्ये अनेक दर्जेदार एकांकिका सातारकर नाट्य रसिकांना मोफत पाहायला मिळाल्या.

स्पर्धेच्या परिक्षणाची जबाबदारी प्रमोद अत्रे, आशीर्वाद मराठे आणि सलीम मुल्ला या मान्यवरांनी पाहिली. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मान्यवर परीक्षक तसेच सातारकर रंगकर्मी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सूत्र संचालन हेरंब जोशी यांनी केले. प्रास्ताविक स्पर्धा प्रमुख आणि माजी नगरसेवक कल्याण राक्षे यांनी केले तर निकाल वाचन संदीप जंगम यांनी केले.

**स्पर्धेचा अंतिम निकाल खालील प्रमाणे..**

सर्वोत्कृष्ट एकांकिकाः प्रथम -तिळगूळ घ्या गोडबोले(कलादर्शन व कलाशृंगार, पुणे), द्वितीय-घर घर (सोहम प्रॉडक्शन, कोल्हापूर), तृतीय-किचकवध पुन्हा (सीके ठाकूर कला महाविद्यालय,पनवेल). सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक :प्रथम-विनोद रत्ना (तिळगूळ घ्या गोडबोले),द्वितीय-प्रमोद पुजारी (घर घर), तृतीय-प्रणव शेंडगे(कीचकवध पुन्हा). सर्वोत्कृष्ट अभिनेता : प्रथम -अमेय राजमाने (तिळगूळ घ्या गोडबोले), द्वितीय-अभिषेक हीरेमठ स्वामी (ग्वाही), तृतीय-प्रमोद पुजारी (घर घर), सर्वोत्कृष्ट अभिनेत्री : प्रथम-शर्वरी लहाणे (तिळगूळ घ्या गोडबोले), द्वितीय-शांभवी धामणीकर (बात हो ना हो), तृतीय-अक्षता बारटक्के (ग्वाही).सर्वोत्कृष्ट बालकलाकार:प्रथम-देवराज गांधी(झिम पोरी झिम),द्वितीय-दूर्वा कुंभार (सेक्स अँड व्हिलेज).



सातारा : राज्यस्तरीय दादा महाराज करंडक स्वीकारताना तिळगूळ घ्या गोडबोले या एकांकिकेतील सर्व कलाकार व अन्य मान्यवर.

# माझी पुजा करा पण अस्तित्वही जपा

प्रिय कोल्हापूरकरांनो,
सप्रेम नमस्कार.

मी... तुमची पंचगंगा नदी बोलत आहे.

पत्रास कारण की, काही दिवसांपूर्वी तुम्ही माझा उगमदिन मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा केला. माझ्या घाटांवर आरतीचे स्वर दुमदुमले, मंत्रोच्चारांनी वातावरण भारावून गेले, फुलांच्या सुगंधाने माझे काठ दरवळून गेले. तुमच्या डोळ्यांतील श्रद्धा आणि माझ्यावरील प्रेम पाहून माझे मन कृतज्ञतेने भरून आले.

कुंभी, कासारी, तुळशी, भोगावती आणि अदृश्य सरस्वतीच्या पवित्र संगमातून जन्मलेली मी... शतकानुशतके तुमच्या संस्कृतीची, श्रद्धेची आणि जीवनाची साक्षीदार आहे. तुमच्या सुख-दुःखात सहभागी होत मी अखंड वाहत राहिले. तुमच्या शिवारांना हिरवाई दिली, तहानलेल्या कंठांना पाणी दिले आणि मुक्या जीवांना जीवन दिले.मात्र, आज हे पत्र लिहिताना माझे मन वेदनेने भरून आले आहे.

उगमापासून संगमापर्यंत माझ्या प्रवाहात आता दूषित पाण्याचे ओढे-नाले मिसळत आहेत. शहरांचे सांडपाणी, कारखान्यांतून येणारे रासायनिक विष,



ओढ्यांतून वाहत येणारा प्लास्टिक कचरा, वाढणारे केंदाळ माझ्या अस्तित्वाला पोखरत आहे. कधीकाळी निर्मळ आणि पारदर्शक असणाऱ्या माझ्या लाटांशी खेळणारे हजारो जलचर प्राणी मृत्यूमुखी पडत आहेत. त्यामुळे आता दुर्गंधी आणि प्रदूषणाचे सावट पसरले आहे.

कुंभीच्या शांततेतून, कासारीच्या वेगातून, तुळशीच्या निर्मळतेतून आणि भोगावतीच्या जीवनदायी प्रवाहातून जे पाणी माझ्यात सामावते, ते पुढे मानवनिर्मित प्रदूषणामुळे दूषित होत जाते. अदृश्य सरस्वतीसारखी माझी पवित्रताही आता हरवत चालली आहे.

तरीही मी न थकता वाहते आहे...

कारण तुम्हा सर्वांची तहान भागवणे हेच माझे कर्तव्य आहे.निवडणुकीचे दिवस आले की माझ्या नावाने घोषणा होतात. 'पंचगंगा शुद्ध करू', 'गाळमुक्त करू', ''प्रदूषण थांबवू'', अशी अनेक आश्वासने दिली जातात. घाटांवर नेत्यांच्या पाहण्या होतात, भाषणे होतात; पण निवडणुका संपल्या की ती आश्वासनेही माझ्याच प्रवाहात विरघळून जातात.मला तुमच्या फुलांचा मोह नाही...

मला आरतीच्या प्रकाशाची आस नाही...

मला फक्त हार-फुले नकोत, तर स्वच्छ आणि निर्मळ प्रवाह हवा आहे.माझे पात्र स्वच्छ ठेवा. माझ्या लाटांना पुन्हा निर्मळ श्वास घेऊ द्या. कारण मी फक्त नदी नाही, तर तुमच्या कोल्हापूरच्या संस्कृतीचा श्वास आहे, भविष्यातील पिढ्यांचा जीवनाधार आहे.

तुम्हीच सांगा... माझं चुकलं तरी काय?

माझ्यावर प्रेम असेल, तर मला प्रदूषणमुक्त ठेवा. हीच माझी तुम्हा सर्वांना कळकळीची विनंती.

आपलीच,
पंचगंगा नदी
(शब्दांकन : पांडुरंग दळवी)

# महापालिकेची अतिक्रमण विरोधी कारवाई

## डिजिटल बोर्ड, हातगाड्या व केबीन जप्त

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)-

**शहरातील अतिक्रमणा विरोधात महापालिकेने पुन्हा कडक कारवाई करत तांबट कमान ते तलवार चौक परिसरातील अनधिकृत फेरीवाले, डिजिटल बोर्ड व केबिन हटविले. विभागीय कार्यालय गांधी मैदान व अतिक्रमण निर्मूलन पथकाने या मोहिमेत ६ अनधिकृत डिजिटल बोर्ड, ९ हातगाड्या आणि ३ केबिन जप्त केले. तर २४ हातगाडी धारकांनी स्वतःहून आपले अतिक्रमण काढून घेतले.**



हातगाड्यांचे अतिक्रमण काढताना महापालिकेचे कर्मचारी

महानगरपालिकेच्या ठरावानुसार अतिक्रमण कारवाई दरम्यान जप्त करण्यात आलेले अनधिकृत साहित्य संबंधित व्यवसायधारकांना परत न देण्याचा निर्णय घेण्यात आला असून जप्त करण्यात आलेले साहित्य कायमस्वरूपी जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई महापौर रुपाराणी निकम व आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड यांच्या आदेशानुसार करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त रविकांत आडसूळ, उपआयुक्त किरणकुमार धनवाडे, सहाय्यक आयुक्त उज्वला शिंदे आणि शहर अभियंता रमेश मस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

या कारवाईमध्ये उपशहर अभियंता महादेव फुलारी, कनिष्ठ अभियंता अनिरुद्ध कोरडे, चेतन आरमाळ,अतिक्रमण प्रमुख प्रफुल्ल कांबळे, कनिष्ठ लिपीक सजन नागलोत तसेच अतिक्रमण विभाग व विभागीय कार्यालय क्र.१ मधील कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

अनधिकृत फेरीवाले, व्यवसायधारक तसेच रस्त्यांवर उभारण्यात आलेल्या अनधिकृत शेड्स व अतिक्रमणांविरोधातील कारवाई यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार आहे. तरी संबंधितांनी आपले अतिक्रमण त्वरित स्वतःहून हटवावे, अन्यथा जप्त करण्यात आलेले साहित्य परत दिले जाणार नाही, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.



शिरगाव येथील आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीच्या दुरुस्तीच्या कामाचा शुभारंभ करताना एकनाथ पाटील,सोबत उपस्थित मान्यवर.

# अखेर शिरगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या छत दुरुस्तीचे काम सुरु

शिरगाव,ता.२८(प्रतिनिधी)-

**राधानगरी तालुक्यातील शिरगाव येथील आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीच्या छताचे पत्रे चौदा महिन्यापूर्वी वादळी वाऱ्याने उडून गेले होते. मात्र वारंवार मागणी करूनही या इमारतीच्या छताचे दुरुस्ती काम करण्यात आले नव्हते. त्यामुळे ऊन व पावसाच्या माऱ्यामुळे या इमारतीचे बरेच नुकसान झाले आहे. तसेच रुग्णसेवेवर याचा परिणाम होत होता. अखेर पंचायत समितीचे सदस्य यांच्या पाठपुराव्यामुळे इमारतीच्या छताच्या दुरुस्तीच्या कामाला अखेर सुरुवात झाली आहे.**

**इमारतीला अखेर मिळणार छत**

या पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण होणार असल्याने नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे. या कामाचा शुभारंभ सरपंच संदीप पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी पं. स.सदस्य संग्राम कलिकते,माजी सभापती संजयसिंह कलिकते, उपसरपंच लक्ष्मण चरापले, सुभाषराव कलिकते,मधूकर कलिकते, ग्रा.पं.अधिकारी लक्ष्मण इंगळे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष एकनाथ पाटील तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# महावितरणने ११ लाख ४९ हजार स्मार्ट टीओडी मीटर बसवले

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)-

**जिल्ह्यातील वीज ग्राहकांना अचूक बिलासोबत विविध सुविधा उपलब्ध करून देणारे स्मार्ट टीओडी मीटर बसविण्यात येत आहेत. ११ लाख ४९ हजार ७९८ स्मार्ट टीओडी मीटर कोल्हापूर परिमंडलामध्ये बसविण्यात आले आहेत. उर्वरित वीज ग्राहकांना स्मार्ट टीओडी मीटर बसवून घेण्याचे आवाहन कोल्हापूर परिमंडलाचे मुख्य अभियंता स्वप्निल काटकर यांनी केले आहे.**

कोल्हापूर जिल्ह्यातील नेसरी, पन्हाळा, कोल्हापूर शहरातील मार्केट यार्ड या तीन उपविभागांत १०० टक्के स्मार्ट टीओडी मीटर बसवण्यात आले असून येथील वीज बिलाच्या तक्रारी जवळपास नगन्य झाल्या आहेत. तर स्मार्ट टीओडी मीटरमुळे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना चालू आर्थिक वर्षात ८५ पैसे इतकी सवलत मिळत आहे. कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील स्मार्ट टीओडी मीटर वापरणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या मासिक बिलातून मागील नऊ महिन्यात ६ कोटी ४१ लाखांची टीओडी सवलत दिली आहे.

# यंदाचा शिव राज्याभिषेक सोहळा डॉल्बी मुक्त करणार

## अखिल भारतीय मराठा महासंघाचा संकल्प

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)-

**अखिल भारतीय मराठा महासंघ व मराठा स्वराज्य भवन ट्रस्टच्या वतीने ३५२ वा शिवराज्याभिषेक सोहळा विविध सामाजिक उपक्रम, पारंपारिक मिरवणूक, डॉल्बी मुक्त व पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारा जनतेचा लोकोत्सव साजरा केला जाणार आहे.**

यानिमित्ताने शिवराज्याभिषेक व्याख्यानमाला शनिवार ता. ३० मे व रवि. ३१ मे दोन दिवसाची आयोजित केली आहे. यामध्ये माजी आमदार उल्हास पवार यांचे 'महाराष्ट्रातील सांस्कृतिक राजकारण' व डॉ.दीपक पवार यांचे 'छत्रपती शिवराय आणि आजचा महाराष्ट्र धर्म' याविषयी व्याख्यान सायं ५.३० ला होणार आहे. तसेच १ जून रोजी स.११ वा. फेटा बांधणी प्रशिक्षण हे दोन्ही कार्यक्रम राजर्षी शाहू स्मारक येथे आयोजित केले आहे.यावेळी बोलताना राष्ट्रीय उपाध्यक्ष वसंतराव मुळीक यांनी कार्यक्रमाची रूपरेषा व त्यामागचा उद्देश सांगितला. ता.६ जून रोजी सायं. ४.३० वा. शिवराज्याभिषेक मिरवणूक काढण्यात येणार आहे. यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अखिल भारतीय मराठा महासंघ व मराठा स्वराज्य भवन ट्रस्टच्यावतीने करण्यात आले. यावेळी जिल्हा अध्यक्ष शशिकांत पाटील, महिला अध्यक्ष शैलजा भोसले, शहर अध्यक्ष निलेश पाटील, डॉ.संदीप पाटील, शंकरराव शेळके, बबनराव रानगे, कादर मलबारी, चंद्रकांत चव्हाण, विजय पाटील,प्रकाश पाटील, प्रताप नाईक, संयोगिता देसाई,संपत्ती पाटील, मोहन डवरी, डी.एस.पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# जनगणना प्रगणक गावात, ग्रामस्थ शिवारात

## शेतीकामाची धांदल उडाल्याने शिवारे फुलली, प्रगणकांना माहिती गोळा करण्यात अडचणी

बिद्री,ता.२८(सुनील माजगावकर)-

**मान्सूनपूर्व पावसाची चाहूल लागल्याने शिवारात कामांची लगबग सुरु झाली आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग सकाळपासूनच घरेदारे बंद करुन शिवारात हजेरी लावत आहे. तर दुसरीकडे जनगणना करणारे प्रगणकांना माहिती गोळा करताना कुलूपबंद घरांमुळे अडचणी निर्माण होत आहेत.यामुळे प्रगणक गावात आणि ग्रामस्थ शिवारात असल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसून येत आहे.**

मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पावसाचा अंदाज वर्तवला जात असल्याने शेतकरी शेतीकामात गुंग झाल्याचे दिसत आहे. जिल्ह्यात भात पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असल्याने शेताची नांगरणी करणे, बांध घालणे, वाफे तयार करणे आदी कामे पावसापूर्वी करावी लागतात. काही ठिकाणी भाताची धूळवाफ पेरणी केली जाते तर काही ठिकाणी भाताची



टोकणीही केली जाते. यंदा रोहिणी नक्षत्र १८ मे रोजी आल्याने या मुहूर्तावर पेरणी करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे.

याशिवाय जिल्ह्याचे प्रमुख पीक असलेल्या ऊस शेती कामांची धांदल मे महिन्याच्या अखेरीस पहावयास मिळते. नवीन केलेल्या ऊस लागणीची भरणी करणे, खोडवा पिकांची भांगलण करणे, ऊसाला खतांचा मिरगी डोस देणे आदी शेतीकामे या कालावधीत पूर्ण करावी लागतात. याशिवाय पाऊस सुरु होण्यापूर्वी औषध फवारणीही करावी लागते. त्यामुळे शेतकरी पहाटेपासून सायंकाळपर्यंत शिवारातच दिसत आहे. शेतशिवारे सध्या माणसांनी फुलून गेली आहेत.

दुसरीकडे संपूर्ण देशभर सुरु असलेल्या जनगणना प्रक्रियेतील पहिला टप्पा असलेल्या घरगणनेचे काम प्रगणकांकडून सुरु आहे. सुमारे दहा हजार प्रगणक जिल्ह्यातून घरोघरी जाऊन घरांची इत्थंभूत माहिती गोळा करत आहेत. परंतु या प्रगणकांना शेतीच्या कामांमुळे गावांतून माहिती जमवण्यात अडचण येत आहे. शेतकरीवर्ग घरे कुलूपबंद करुन शिवारात जात असल्याने गल्ली बोळात सामसूम दिसत आहे.

प्रगणक दारात गेल्यावर त्यांना कुलुपबंद असलेली घरे दिसून येत आहेत. तर काही घरांत हजर असलेले वृद्ध किंवा अजाण बालके प्रगणकांना आवश्यक माहिती देण्यात असमर्थ ठरत आहेत. त्यामुळे प्रगणक सकाळऐवजी सायंकाळी पाचनंतरच माहिती घेण्यासाठी गावात जात आहेत. या कालावधीत पुन्हा जनावरांच्या धारा काढणे, दूध डेअरीला घालणे, स्वयंपाकपाणी आवरणे आदी कामे करावी लागत असल्याने ग्रामस्थ प्रगणकांच्या प्रश्नांकडे कानाडोळा करत अपूर्ण किंवा चुकीची माहिती देत असल्याचे दिसून येत आहे. एकीकडे शेतीकामांसोबतच जनगणनेचे कामही महत्वाचे असल्याने शेतकरी आणि प्रगणक दोघेही धावपळीत असल्याचे चित्र ग्रामीण भागात पहावयास मिळत आहे.

> **'शेतकरी वर्ग सकाळी ७ ते दुपारी १२ आणि परत दुपारी ३ ते सायंकाळी ७ पर्यंत शिवारात असल्याने त्यांची भेट होत नाही. मधल्या १२ ते ३ या वेळेत त्यांची विश्रांतीची वेळ असल्याने माहिती घ्यायची तरी केंव्हा असा प्रश्न उपस्थित होत आहे. याला पर्याय म्हणून रात्री उशिरापर्यंत घरगणनेचे काम करावे लागत आहे.' -एक प्रगणक.**

# निवेदिता पाटील यांची उपसरपंचपदी निवड

राधानगरी,ता.२८(प्रतिनिधी)-

**सोळांकूर (ता.राधानगरी) येथील ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी निवेदिता विकास पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच राजाराम कांबळे व निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ग्रामसेवक तानाजी पाटील होते.**



निवडीनंतर उपसरपंच पाटील, यांचा जिल्हा बँकेचे संचालक ए.वाय.पाटील, राधानगरीचे सभापती आर. वाय. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सदस्य अरविंद निचीते, शिवानंद महाजन, आनंदा जाधव, पूजा पानारी,रेखा पाटील, कल्याणी कुंभार, नंदा कांबळे उपस्थित होते. आभार ग्रामसेवक तानाजी पाटील यांनी मानले.

# निर्यात नियमांनुसारच घेतले हलाल प्रमाणपत्र

- गोकुळकडून आधिकृत भूमिका जाहीर
- सोशल मिडीयावर गैरसमज न पसरवण्याचे आवाहन

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)-

**सोशल मीडियावर गोकुळ दूध संघाच्या हलाल प्रमाणपत्रासंदर्भात दिशाभूल करणारी माहिती व गैरसमज पसरविले जात असल्याच्या, पार्श्वभूमीवर गोकुळ प्रशासनाने वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे. संघाकडून स्पष्ट करण्यात आले की, हलाल प्रमाणपत्र हे कोणत्याही धार्मिक प्रचार, सक्ती किंवा विचारसरणीशी संबंधित नसून आंतरराष्ट्रीय व्यापारातील एक आवश्यक व्यावसायिक व गुणवत्तेशी संबंधित आहे. 'हलाल' या शब्दाचा अर्थ 'वैध' किंवा 'परवानगी असलेला' असा असून, खाद्यपदार्थांच्या उत्पादन प्रक्रियेत कोणतेही प्रतिबंधित किंवा भेसळयुक्त घटक वापरलेले नाहीत, याची खात्री या प्रमाणपत्राद्वारे केली जाते.**

डेअरी उद्योगात लोणी,चीज,श्रीखंड, तूप, मिल्क पावडर यांसारख्या उत्पादनांमध्ये वापरले जाणारे घटक हे काटेकोरपणे तपासले जातात. दुग्धजन्य पदार्थांमध्ये वापरले जाणारे घटकसुद्धा हलाल मानांकनानुसार असल्याची खात्री या प्रक्रियेत केली जाते. त्यामुळे हे प्रमाणपत्र FSSAI, ISO २२००० आणि HACCP प्रमाणेच गुणवत्ता व सुरक्षितता सुनिश्चित करणारे मानक मानले जाते.

गोकुळ दूध संघामध्ये हलाल प्रमाणपत्र प्रणालीची अंमलबजावणी ता.१५/१०/२०१८ पासून करण्यात आली आहे. सध्या या प्रमाणपत्राची वैधता मार्च २०२८ पर्यंत आहे. गल्फ देशांसह अनेक इस्लामिक राष्ट्रांमध्ये खाद्यपदार्थ आयातीसाठी हलाल प्रमाणपत्र असणे कायदेशीरदृष्ट्या अनिवार्य आहे. विशेषतः सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, ओमान, कतार आणि कुवेत यांसारख्या देशांमध्ये हलाल प्रमाणपत्राशिवाय कस्टम क्लिअरन्स मिळत नाही.

गोकुळ दूध संघाने सन २०१८ मध्ये तुर्कीये, जॉर्जिया, सिरीया, बांग्लादेश व यूएई येथे सुमारे ८५० मेट्रिक टन दूध पावडर निर्यात केली होती. तसेच सन २०२४ मध्ये अझरबैजान येथे ४६२ मेट्रिक टन लोणी निर्यात करून नवीन बाजारपेठ विकसित केली आहे.

गोकुळ दूध संघाने घेतलेले हलाल प्रमाणपत्र हे केवळ निर्यात वाढ, जागतिक बाजारपेठेत प्रवेश, परकीय चलन प्राप्ती आणि दूध उत्पादकांचे हित लक्षात घेऊन घेतलेले व्यावसायिक पाऊल आहे.त्यामुळे या विषयाकडे केवळ आर्थिक व व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक असून, कृपया कोणत्याही प्रकारचा गैरसमज करून घेवू नये व पसरवू नयेत, असे आवाहन गोकुळ प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# मतदार नोंदणी प्रक्रिया पारदर्शकपणे राबवा-चोकलिंगम

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)-

**मतदार याद्यांमधील त्रुटी दूर करून विशेष सखोल पुनरिक्षणानंतर दोषविरहित आणि अद्ययावत नवीन मतदार यादी अस्तित्वात येणार आहे.सर्व मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता तटस्थपणे आणि पारदर्शकतेने ही प्रक्रिया राबवावी, असे निर्देश राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिले.**

जिल्ह्यात सुरू असलेल्या 'विशेष सखोल पुनरिक्षण' कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, प्रभारी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अर्चना नष्टे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी जिल्हाधिकारी डॉ.राठोड यांनी सादरीकरणाद्वारे जिल्ह्यातील पुनरिक्षण कार्यक्रमाची माहिती दिली.

कोल्हापूर जिल्ह्यात ही मोहीम अत्यंत पारदर्शक पद्धतीने राबविण्यासाठी ३ हजार ४५० मतदान केंद्रस्तरीय अधिकारी प्रत्यक्ष घरभेटीद्वारे पडताळणी करणार आहेत. तसेच विविध राजकीय पक्षांकडून ३ हजार ९२८ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी नियुक्त करण्यात आले असून, या संख्येत राजकीय पक्षांकडून आणखी वाढ करण्याच्या सूचना मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिल्या. राज्यात आजमितीस ७२.०४ टक्के मॅपिंग पूर्ण झाले असून, कोल्हापूर जिल्ह्यात ८०.९१ टक्के मॅपिंग पूर्ण झाले आहे.

# पाटगाव ३० तर चिकोत्रा धरणात ३४ टक्के पाणीसाठा शिल्लक

## नागनवाडी धरणात अवघे चार टक्के पाणी शिल्लक

## भुदरगड तालुका पावसाच्या प्रतिक्षेत

गारगोटी,ता.२८(प्रतिनिधी)-

**भुदरगड तालुक्यातील वेदगंगा नदीवर असलेल्या पाटगाव धरणात आज ३०.४९ टक्के पाणी साठा शिल्लक आहे, तर तालुक्यातील चिकोत्रा नदीवरील चिकोत्रा धरणात ३४.९१ टक्के पाणी साठा शिल्लक आहे, विशेष म्हणजे यंदा मान्सूनपूर्व पावसाने भुदरगड तालुक्याकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे भुदरगड तालुका पावसाच्या प्रतिक्षेत आहे.**



भुदरगड तालुक्यातील चिकोत्रा धरणाचे संग्रहीत छायाचित्र.

भुदरगड तालुक्यातील पाटगाव येथे वेदगंगा नदीवर पाटगाव धरण (श्री मौनीसागर जलाशय) ३.७१६ टीएमसी क्षमतेचा असून या धरणामुळे भुदरगड, कागल तालुक्यातील व कर्नाटक राज्यातील शेतीचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे, हे धरणक्षेत्र सह्याद्रीच्या कुशीत आहे. त्यामुळे या धरणक्षेत्रात कोल्हापूर जिल्ह्यातील किंबहुना महाराष्ट्रातील सर्वाधिक पाऊस पडतो. पाटगाव धरणाची पाणी साठा पूर्ण संचय पातळी ६२६.६० मीटर आहे. गेल्या वर्षभरात धरण क्षेत्रात एकूण ६९८५ मिलिमिटर इतका पाऊस झाला आहे. आज धरणात ३२.०८ दशलक्ष घनमीटर म्हणजे ११३३.१३ दशलक्ष घनफूट इतका पाणी साठा आहे. धरणात आज ३०.४९ टक्के इतके पाणी आहे. असे असले तरी धरणातून विद्युत गृहासाठी ३०० क्यूसेक पाण्याचा विसर्ग होत आहे. त्यामुळे भुदरगड तालुक्यात तरी वेदगंगा नदीतून पाणी वाहत आहे.

गेल्या वर्षी मे महिन्यापासूनच पावसाने सुरुवात केली होती, त्यामुळे पावसाळयात जुलै महिन्याच्या अखेरीस पाटगाव धरण पूर्ण क्षमतेने भरले होते.मे महिन्याच्या अखेरीस अजूनही धरणातील पाणीसाठा ३० टक्के आहे. जुनपासून पाऊस सुरु झाला तर यंदाही धरण लवकर भरण्याची शक्यता आहे.त्यानंतर मात्र भुदरगड, कागल तालुका व कर्नाटक राज्यातील निपाणी भागातील वर्षभराचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे,असे मत जलसंपदा विभागाच्या पाटगाव मध्यम प्रकल्पाच्या उपअभियंता सौ.दिप्ती पाटील यांनी सांगितले.

### चिकोत्रा धरणात ३४ टक्के पाणीसाठा शिल्लक

चिकोत्रा नदीवरील चिकोत्रा धरणाचा एकूण पाणी साठा १.५२२ टीएमसी आहे, भुदरगड तालुक्यातील पाच गावे व कागल तालुक्यातील अनेक गावांचा या धरणामुळे पिण्याच्या पाण्याचा व शेतीचा प्रश्न सुटला आहे, धरणाची पूर्ण संचय पातळी ६८८.०० मीटर इतकी आहे. आजच्या दिवशी धरणात१५.०५४ दशलक्ष घनमीटर म्हणजे ५३१.६४४ दशलक्ष घनफूट इतका पाणीसाठा आहे. धरणात अजूनही ३४.९१ टक्के इतका पाणीसाठा आहे. गतवर्षी पावसाळ्यात जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात हे धरण पूर्ण क्षमतेने भरले होते. या धरण क्षेत्रात गेल्या वर्षी २७६० मिलीमीटर पाऊस झाला होता. आजच्या दिवशी या चिकोत्रा धरणात ३४.९१ टक्के पाणीसाठा असून मान्सून सुरु होण्यासाठी आठ दहा दिवसांचा कालावधी आहे, त्यानंतर धरणातील पाणीसाठा वाढेल असे चिकोत्रा मध्यम पाटबंधारे प्रकल्पाचे शाखा अभियंता एम.के.चव्हाण यांनी सांगितले.तर भुदरगड तालुक्यातील नागनवाडी लघु पाटबंधारे प्रकल्पाची आजची पाणी पातळी ११५.०० मीटर असून पाणीसाठा ३.४१ दशलक्ष घनमीटर इतका आहे. धरणात आजच्या दिवशी फक्त ४ टक्के पाणीसाठा आहे.

# मंत्री मुश्रीफ शेतकऱ्यांसमवेत करणार शिवारफेरी

## सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखान्याचे आयोजन

करनूर, ता.२८ (प्रतिनिधी)

**वैद्यकीय शिक्षण मंत्री मंत्री हसन मुश्रीफ शनिवारी दि. ३० रोजी शेतकऱ्यांसमवेत शिवारफेरी करणार आहेत. करनूर (ता. कागल )येथे ऊस शेतीमधील ए.आय तंत्रज्ञानावर चर्चासत्र होणार आहे. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट– पुणे व कृषी विज्ञान केंद्र– बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखान्याने या चर्चासत्राचे आयोजन केले आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन कारखाना प्रशासनाने केले आहे.**

ए. आय. म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ऊस उत्पादन वाढीसाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.या चर्चासत्रात ऊस पिकातील आधुनिक प्लॉट विकास, ए आय तंत्रज्ञानाचा वापर, ठिबक सिंचनाद्वारे खत व्यवस्थापन आणि उत्पादनवाढीसाठी आवश्यक उपाययोजनांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन होणार आहे. यावेळी युवराज पाटील, प्रताप ऊर्फ भैय्या माने, नविद मुश्रीफ हे प्रमुख उपस्थितीत राहणार आहेत.

डॉ. तुषार जाधव हे ''ऊस पिकात ए आय तंत्रज्ञानाचा वापर व महत्त्व''तर अरुण देशमुख हे ''ठिबकद्वारे पाणी व खत व्यवस्थापन'' तसेच विनय पोळ हे ''ए आय तंत्रज्ञानामध्ये जिवाणू खतांचे महत्त्व'' या विषयांवर माहिती देणार आहेत.

दरम्यान, प्रत्यक्ष ऊस शेतीमध्ये वापरलेल्या ए. आय. तंत्रज्ञानाचा म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा अभ्यास करण्यासाठी शिवार फेरीने कार्यशाळेला सुरुवात होणार आहे.

या कार्यक्रमास ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी उपस्थित राहून आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेसाठी सक्षम बनविणेची गरज

## –कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांची ग्वाही

कोल्हापूर ता.२८ (प्रतिनिधी):

**उच्च शिक्षण संस्थांनी केवळ पदवी प्रदान करणाऱ्या संस्था म्हणून न राहता विद्यार्थ्यांमध्ये समस्या सोडविण्याची क्षमता, नेतृत्वगुण, संशोधनवृत्ती आणि उद्योजकीय विचार विकसित करणारे केंद्र बनले पाहिजे. विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेसाठी सक्षम बनविणे ही आजच्या शिक्षणव्यवस्थेची प्रमुख गरज आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी केले.**



केआयटी अभियांत्रिकी (स्वायत्त प्रदत्त) महाविद्यालयाच्या वतीने शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष साजिद हुदली, उपाध्यक्ष सचिन मेनन तसेच संस्थेचे विश्वस्त भरत पाटील आणि सुनील कुलकर्णी यांनी कुलगुरूंचे स्वागत करून अभिनंदन व शुभेच्छा दिल्या. या भेटीने केवळ औपचारिक स्वागतापुरते मर्यादित न राहता उच्च शिक्षण क्षेत्रातील गुणवत्तावाढ, संशोधन, नवोपक्रम आणि उद्योगाभिमुख शिक्षण याविषयी सकारात्मक दिशादर्शक चर्चा घडून आली.

कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी संवाद साधताना सांगितले की, ''केआयटी सारखी दर्जेदार संस्था ज्या प्रकारे नवीन शैक्षणिक धोरणाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी उद्योग, संशोधन संस्था आणि समाज यांच्याशी अधिक सशक्त संबंध निर्माण करत आहेत ते कौतुकास्पद आहे.''

यावेळी बोलताना अध्यक्ष साजिद हुडली यांनी सांगितले की, 'शिवाजी विद्यापीठाची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी केआयटीकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही संस्थेच्या वतीने देण्यात आली. केआयटीचे उपाध्यक्ष सचिन मेनन यांनी संशोधनाला सामाजिक आणि औद्योगिक मूल्य प्राप्त होण्याची आवश्यकता अधोरेखित केली. संस्थेचे संचालक डॉ. मोहन वनरोट्टी यांनी पारंपरिक शिक्षण पद्धतीत बदल करून विद्यार्थीकेंद्रित, प्रकल्पाधारित आणि अनुभवाधारित शिक्षणावर भर देण्याची गरज व्यक्त केली.

बैठकीत विद्यापीठ आणि केआयटी यांच्या संयुक्त सहकार्याने संशोधन प्रकल्प, स्टार्टअप्स, नवोपक्रम, तंत्रज्ञान हस्तांतरण, कौशल्य विकास, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि उद्योगशिक्षण भागीदारी या क्षेत्रांमध्ये भविष्यात अधिक प्रभावी उपक्रम राबविण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

# सिव्हिल वर्कची कामे गुणवत्तापूर्ण करावीत

## अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज

कोल्हापूर, ता.२८ (प्रतिनिधी):

**महापालिका प्रशासनाने सिव्हिल वर्कची कामे गुणवत्तापूर्ण करावीत, पाणीपुरवठा व्यवस्थेतील गळती कमी करून वसुली वाढवावी, कचरा प्रक्रिया प्रकल्पातून उत्पन्न वाढविण्यावर भर द्यावा अशा सूचना करतांनाच. महापालिकेचे प्रलंबित प्रश्न लवकर मार्गी लावण्यासाठी शासनस्तरावर सहकार्य करण्याची ग्वाही नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज यांनी दिली.**

नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज यांनी कोल्हापूर महानगरपालिकेच्या विविध विकास प्रकल्पांचा. महापालिकेच्या छत्रपती ताराराणी सभागृहात आढावा घेतला. बैठकीपूर्वी महापौर रुपाराणी निकम, आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड, उपमहापौर अक्षय जरग, स्थायी समिती सभापती विशाल शिराळे, विरोधी पक्षनेते राजेश लाटकर, सभागृह नेते मुरलीधर जाधव, गटनेते शारंगधर देशमुख, आदिल फरास व इंद्रजित बोंद्रे यांनी डॉ.के.एच. गोविंदराज यांचे स्वागत केले.

यानंतर महापौर सौ. रुपाराणी निकम यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी महापालिकेच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत अतिरिक्त मुख्य सचिवांशी चर्चा केली. भारतीय जनता पार्टी, शिवसेना व काँग्रेसच्या वतीने विविध विषयांवरील निवेदने यावेळी देण्यात आली.

प्रशासकीय बैठकीत आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड यांनी स्लाईड शोच्या माध्यमातून महापालिकेच्या विविध प्रकल्पांची माहिती सादर केली. यावेळी अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त रविकांत आडसूळ, उप–आयुक्त परितोष कंकाळ, किरणकुमार धनवाडे, सहाय्यक आयुक्त जयंत जावडेकर, उज्वला शिंदे, स्वाती दुधाणे, डॉ.विजय पाटील, सहाय्यक संचालक नगररचना प्रशांत भोसले, मुख्य लेखापरिक्षक कलावती मिसाळ, लेखा व वित्त अधिकारी राजश्री पाटील, मुख्य लेखापाल संजय सरनाईक, शहर अभियंता रमेश मस्कर, जल अभियंता हर्षजीत घाटगे उपस्थित होते.

# डॉ. सुनेत्रा शिराळे यांना आरोग्य विद्यापीठाची पीएचडी

कोल्हापूर,ता.२८–

**प्रथितयश होमिओपॅथी डॉ. सुनेत्रा देशभूषण शिराळे यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत मेडीसीन विषयात पीएच.डी.बहाल करण्यात आली. जुलै २०२६ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या दिक्षांत समारंभात त्यांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे.**



आरोग्य विद्यापीठातून होमिओपॅथी विद्याशाखेमध्ये पीएच.डी. प्राप्त करणाऱ्या त्या पश्चिम महाराष्ट्रातील पहिल्या होमिओपॅथिक तज्ञ आहेत. जगद्गुरू पंचाचार्य एज्युकेशन सोसायटीच्या होमिओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय कोल्हापूर या आरोग्य विद्यापीठ मान्यता प्राप्त संशोधन केंद्रामधून प्रा.डॉ.सुजाता कामिरे यांच्या मार्गदर्शनाखाली 'इफेक्टीव्हनेस ऑफ होमिओपॅथीक मेडीसीन इन द मॅनेजमेंट ऑफ अँक्यूट हायनायटीस' या विषयावर डॉ. सुनेत्रा शिराळे यांनी शोध निबंध सादर केला. तसेच त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालीकांमधून संशोधनपर लेख देखील प्रसिध्द झाले आहेत.

संशोधन कार्यात त्यांना आरोग्य विद्यापीठाच्या होमिओपॅथी विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.राजकुमार पाटील, महाविद्यालयातील मेडीसीन विभागाचे प्राध्यापक डॉ.सचिन मगदूम, डॉ. शिवानी पाटील यांचे सहकार्य लाभले.

# टोळक्याकडून युवकावर जीवघेणा हल्ला

## दुर्गानगरात मध्यरात्रीचा थरार! तलवार,एडक्याने मारहाण

कुपवाड, ता. २८ (प्रतिनिधी)–

**एमआयडीसी परिसरातील दुर्गानगर चौक येथे किरकोळ कारणावरून दोन युवकांवर सहा जणांच्या टोळीने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तलवारसदृश हत्यार, एडक्या तसेच दगडांचा वापर करून झालेल्या या हल्ल्यात दोघेजण गंभीर जखमी झाले असून, एमआयडीसी पोलिस ठाण्यात सहा संशयितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यश मल्लिकार्जुन बजंत्री (वय २१, रा. दुर्गानगर, कुपवाड) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. २५ मे रोजी रात्री सुमारे १०.१५ वाजण्याच्या सुमारास दुर्गानगर चौकातील रॉयल पान शॉपसमोर ही घटना घडली. फिर्यादी यश बजंत्री आणि त्याचा मित्र विजय आनंदा कांबळे हे तेथे असताना तीन मोटारसायकलींवरून आलेल्या सहा जणांनी अचानक हल्ला चढविल्याचा आरोप करण्यात आला आहे.फिर्यादीनुसार, संशयित संकेत कांबळे याने एडक्याने यशच्या डोक्यावर वार केला, तर सुनील जाधव याने विजय कांबळे याला तुला जिवंत सोडत नाही अशी धमकी देत डोक्यावर, हातावर आणि पायावर हल्ला केला. तसेच रियाज खान याने तलवारसदृश हत्याराने विजयवर वार केल्याचे नमूद करण्यात आले आहे. याशिवाय इतर संशयितांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करत दगडफेकही केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या प्रकरणी संकेत अनिल कांबळे, सुनील मारुती जाधव, रियाज खान, साकिब अफसर शेख, शुभम संजय कारंडे आणि संमेक उदयकुमार कांबळे यांच्याविरोधात विविध गंभीर कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींच्या अटकेची तजवीज सुरू असून तपास पोलीस उपनिरीक्षक अनिरुद्ध गवारी करत आहेत.या घटनेमुळे एमआयडीसी परिसरात खळबळ उडाली असून, वाढत्या गँगवार व हत्यारांच्या वापराबाबत नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# कापुसखेड येथे युवकावर धारदार शस्त्राने हल्ला

ईश्वरपूर, ता.२८(प्रतिनिधी)

**कापुसखेड (ता. वाळवा) येथे जयंती मिरवणुकीच्या कारणावरून एका युवकावर धारदार शस्त्राने हल्ला करून जातीवाचक शिवीगाळ व मारहाण केल्याची घटना घडली असून, याप्रकरणी ईश्वरपूर पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात अ‍ॅट्रॉसिटीसह वेगवेगळ्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत ईश्वरपूर पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी सौरभ सुहास धुमाळे (वय २८, व्यवसाय–व्यापार, रा. कापुसखेड ता. वाळवा) यांना आरोपी प्रशांत नायकल याने फोन करून कापुसखेड गावातील जोतीबा मंदिराजवळ बोलावून घेतले. जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

त्यानंतर आरोपीने जवळील कोयत्यासारख्या धारदार शस्त्राने फिर्यादीच्या डोक्यात व डाव्या कानावर वार करून दुखापत केली. तसेच आरोपी सुशांत नायकल, प्रसाद देसाई व अभिजित विकास धुमाळे यांनी फिर्यादी व त्याचा भाऊ सुमित यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. ही घटना दि. २७ मे रोजी रात्रीच्या सुमारास कापुसखेड गावातील जोतीबा मंदिराजवळ घडली.

# मद्यधुंद ट्रक चालकाचा तानंग फाट्यावर थरार!

## पिकअप व दुचाकीला धडक पोलिसांनाही शिवीगाळ

कुपवाड, ता. २८ (प्रतिनिधी)–

**मद्यप्राशन करून भरधाव ट्रक चालवत पिकअप आणि दुचाकीला जोरदार धडक देत अपघात घडवून आणल्याप्रकरणी एका ट्रक चालकाविरोधात एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, अपघातानंतर घटनास्थळी पोहोचलेल्या गणवेशातील पोलिसांनाही आरोपीने सार्वजनिक ठिकाणी शिवीगाळ केल्याने खळबळ उडाली आहे.**

एमआयडीसी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सतीश शिवाजी सरगर (वय ३९, रा. अवधूत कॉलनी, कुपवाड) याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) तसेच मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतची फिर्याद एमआयडीसी कुपवाड पोलिस ठाण्यात कार्यरत पोलिस शिपाई मधुकर सूर्याबा सरगर (वय ३८) यांनी दिली आहे. घटना २६ मे रोजी रात्री सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास तानंग फाटा येथे घडली. पोलिसांच्या माहितीनुसार, तासगावकडून मिरजकडे जाणाऱ्या रस्त्यावर आरोपी सतीश सरगर हा ट्रक मद्यधुंद अवस्थेत भरधाव आणि निष्काळजीपणे चालवत होता. यावेळी त्याने समोरून येणाऱ्या महिंद्रा पिकअप आणि दुचाकी यांना डाव्या बाजूने जोरदार धडक दिली. धडकेमुळे पिकअप उलटली असून वाहनांचे मोठे नुकसान झाले.

अपघातानंतर घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांशीही आरोपीने अरेरावी करत सार्वजनिक ठिकाणी अश्लील व घाणेरड्या शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात आरोपीविरोधात मद्यप्राशन करून बेदरकार वाहन चालवणे, अपघात घडवणे, सरकारी कामात अडथळा व शिवीगाळ आदी गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले असून, आरोपीला नोटीस देण्यात आली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस फौजदार श्री. जाधव करीत आहेत.

### हुपरी तलाठी धमकी प्रकरण

# मुख्य आरोपीस दोन दिवसांची कोठडी

हुपरी, ता. २८(वार्ताहर ):

**मौजे हुपरी परिसरात अवैध मुरूम वाहतुकीवर कारवाई करणाऱ्या तलाठ्याला जीवे मारण्याची धमकी देऊन जप्त केलेला डंपर पळवून नेणाऱ्या प्रकरणातील मुख्य आरोपी अखेर पोलिसात हजर झाला आहे. बुधवार, दि. २७ रोजी हुपरी पोलिसांसमोर मुख्य आरोपी हजर झाल्यानंतर पोलिसांनी या गुन्ह्यात वापरलेला डंपर (क्र.एम. एच. ०९एफ.एल ४०९६) जप्त केला आहे.गुरुवार, दि. २८ रोजी आरोपीला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.**



सोमवारी २५ मे रोजी तलाठी सुभाष जाधव यांना हुपरी–तळंदगे रोडवर डंपर मालक युवराज मुधाळे आणि त्याच्या साथीदारांनी पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीतून येत सिनेस्टाईल धमकी दिली होती. या घटनेतील अन्य दोन संशयित आरोपी अद्याप फरार असून, गुन्ह्यात वापरलेली स्कॉर्पिओ गाडीही अद्याप पोलिसांच्या हाती लागलेली नाही. फरार आरोपींचा आणि स्कॉर्पिओ गाडीचा शोध हुपरी पोलीस घेत आहेत.

# महापालिकेच्या विविध जागा व वाहनतळांसाठी निविदा प्रक्रिया

कोल्हापूर, ता.२८ (प्रतिनिधी):

**कोल्हापूर महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.राजेंद्र भारुड यांचे विशेष प्रयत्न सुरु आहेत. त्याअनुषंगाने महापालिकेच्या विविध मालमत्ता व वाहनतळे भाडेतत्त्वावर देण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याचे निर्देश आयुक्त डॉ.राजेंद्र भारुड यांनी इस्टेट विभागास दिले होते. या अनुषंगाने इस्टेट विभागाच्यावतीने बी वॉर्ड हॉकी स्टेडियम गाळे, सरस्वती टॉकीज शेजारील वाहनतळ व एसटी स्टॅण्ड येथील वाहनतळ विकसित करणे व चालविण्यास देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. सदरच्या सर्व निविदा पुढील दोन दिवसांत प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.**

यामध्ये बी वॉर्ड हॉकी स्टेडियम येथील सुमारे ४ हजार स्क्वेअर फूट गाळयांची जागा लिलाव पद्धतीने भाडेतत्त्वावर देण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या जागेतून महापालिकेला अंदाजे २० ते २५ लाख रुपये वार्षिक उत्पन्न अपेक्षित आहे. यावेळी निविदा प्रक्रियेत जास्तीत जास्त सुरक्षा अनामत रक्कम देणाऱ्या निविदाधारक प्राधान्य क्रमाने देण्याचा विचार महापालिकेचा आहे. त्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात मोठी वाढ होईल. तसेच महापालिकेच्या मालकीच्या श्री महालक्ष्मी फेरीवाला मार्केट, सि.स. नं. २२६७, सरस्वती टॉकीज शेजारील वाहनतळ चालविण्यास देण्याची निविदा मागविण्यात येत असून, पाच वर्षांच्या मुदतीकरिता ठेकेदाराची नियुक्त याठीकाणी करण्यात येणार आहे. या वाहनतळातून महापालिकेला अंदाजे १ कोटी ५० लाख रुपये वार्षिक उत्पन्न अपेक्षित आहे. याचबरोबर मध्यवर्ती एसटी स्टॅण्ड येथे वाहनतळ व्यवस्थेसाठीही ठेकेदार नियुक्त करण्यात येणार असून, त्यातून अंदाजे २५ लाख रुपये वार्षिक उत्पन्न अपेक्षीत धरण्यात आले आहे. तरी या निविदेमध्ये जास्तीजास्त ठेकेदारांनी भाग घ्यावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# आंतरराष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत अथर्व गंगनमाले आशिया खंडात प्रथम

जयसिंगपूर, ता २८(प्रतिनिधी)

संभाजीपुर ता.शिरोळ येथील अथर्व शिवाजी गंगनमाले याने नेपाळ येथे झालेल्या इंटरनॅशनल युथ कॉम्पिटिशन आंतरराष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत आशिया खंडात प्रथम क्रमांक मिळवला.



या स्पर्धेत त्याने भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले आहे.

अथर्व याने १४ वर्षे वयोगटा खालील ३० किलो वजनी गटांमध्ये हे यश मिळवले . येथील अण्णासाहेब विभुते विद्या मंदिर चा तो विद्यार्थी आहे. रिस्की फायटर मार्शल आर्ट अकॅडमी यामध्ये तो तायक्कांदो चे प्रशिक्षण घेतो. त्याने मिळवलेल्या यशामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. अथर्व ने मिळवलेल्या यशामुळे भारत देशाच्या क्रीडा क्षेत्रामध्ये एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशाबद्दल त्याला त्याचे वडील शिवाजी गंगनमाले, प्रशिक्षक प्रतिक्षेत बुचटे विभुते विद्या मंदिर चे मुख्याध्यापक शिक्षक यांचे मार्गदर्शन मिळाले.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, कोल्हापूर**

**ई– निविदा कार्यप्रणाली अंतर्गत निविदा सूचना क्र.१२ सन २०२६–२०२७**

खालील कामाचे '' ब–१'' नमुन्यातील ऑनलाईन निविदा कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, कोल्हापूर ई– निविदा प्रणालीव्दारे पात्र निविदाकारांकडून ऑनलाईन निविदा मागवित आहेत. निविदाधारकांना सुचित करण्यात येते की, ऑनलाईनमध्ये प्रसिध्द केलेल्या व कॉन्ट्रॅक्ट डाटामधील अटी तांत्रिक स्पेसिफिकेशन व शेडयुल–बी मधील परिमाण हे बिड डाटा निविदा संचामध्ये समाविष्ट करणेत आलेले आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजित किंमत रु.लक्ष (जी.एस.टी. वगळून) | इसारा रक्कम रुपये | निविदा फी जीएसटी सह रु. | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ठेकेदारांचा वर्ग (सा.बां. खातेकडील व खालीलप्रमाणे) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| खुली निविदा (सा.बं. खातेकडील नोंदणीकृत ठेकेदार) | | | | | | | |
| १. | कोल्हापूर महानगरपालिका हद्दीमध्ये भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी मुलभूत सोई सुविधा पुरविणेसाठी बगीचा सुधारणा करणे. | ब–१ | ८४.०२ | ८५०००/– | १३६०/– | ६ महिने | वर्ग–चार– अ व त्यावरील |

**निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| निविदा डाऊनलोड करणेचा कालावधी | : | दि. १/६/२०२६ (सकाळी १०.०० नंतर) ते दि. ८/६/२०२६ (१७.३० वाजेपर्यंत) |
| निविदा इसारा रक्कम, निविदा शुल्क व प्रतिज्ञापत्र इत्यादीचे मूळ दस्ताऐवज सादर करावयाचा दिनांक | : | कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, कोल्हापूर<br>कार्यकारी अभियंता, सा.बां.(दक्षिण) विभाग, कोल्हापूर<br>मा. अधीक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, कोल्हापूर<br>**वरील तिन्ही कार्यालयाचा पत्ता :–** ताराबाई पार्क, मुख्य पोष्ट कार्यालयाजवळ, रमणमळा, कोल्हापूर – ४१६००३ वरील कार्यालयात<br>दि. १०/६/२०२६ रोजी (१२.०० पर्यंत) |
| तांत्रिक व आर्थिक निविदा उघडण्याचे ठिकाण व दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | : | मा. कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, कोल्हापूर येथे<br>दि. १०/६/२०२६ रोजी (१२.०१ वाजता) |

**टीप :–** १) सर्व पात्र/इच्छूक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या Main Portal - "https://mahatender.gov.in" वर enrolled करणे आवश्यक आहे.

२) निविदाकारांना वर नमूद केलेल्या संकेत स्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरित करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी ई–मेल support-eproc@nic.in व दूरध्वनी क्रमांक ०१२०–४२००४६२, ०१२०–४००१००२ वर संपर्क साधावा.

३) निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा रक्कमेची ऑनलाईन पावती, ऑनलाईन कोरा निविदा संच, डाऊनलोड केलेली पावती, स्वत: च्या नावाची गोपनियता बाळगून ई–निविदा वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

४) निविदेचे वेळापत्रक, इतर अटी व शर्ती तसेच अनुषंगीक बदल ई–निविदा पोर्टलवर https://mahatenders.gov.in पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करणेचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

५) वरील कामांची ई–निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.gov.in या इंटरनेट वरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/–
**(रोहीत वि. तोंदले)**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर**

**विमाका/कोल्हापूर/३७/२०२६–२०२७**


# राज्योपाध्येनगरात युवकाची आत्महत्या

कोल्हापूर ता.२८(प्रतिनिधी)

राज्योपाध्यनगरात राहणारा रविकिरण सतिश सावंत (वय ४५) या युवकाने गुरुवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी छताच्या लोखंडी पाईपला नॉयलॉनच्या दोरीने गळफास घेतला.

हा प्रकार नातेवाईकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी त्याला खाली उतरून सीपीआर रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले. आत्महत्येचे कारण समजलेले नाही. सीपीआर पोलीस चौकीत याची नोंद झाली आहे.

# व्यावसायिकाची गळफास घेऊन आत्महत्या

सरूड, ता. २८ (प्रतिनिधी) :

**शाहूवाडी तालुक्यातील नांदगाव येथे ४२ वर्षीय व्यावसायिकाने राहत्या घराच्या माडीवर गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी दुपारी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, भगवान निवृत्ती पोवार (वय ४२) असे मृत व्यक्तीचे नाव असून ते घाणा व दळण गिरणी व्यवसायाशी संबंधित होते. गुरुवारी दुपारी सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास त्यांनी आपल्या राहत्या घराच्या माडीवर गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना उघडकीस येताच कुटुंबीयांनी तातडीने स्थानिकांना माहिती दिली.

आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून याबाबत शाहूवाडी पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे. घटनेची नोंद शाहूवाडी पोलीस ठाण्यात करण्यात आली असून मृतदेह शवविच्छेदनासाठी मलकापूर ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

भगवान पोवार यांच्या निधनामुळे नांदगाव परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा व आई असा परिवार असून नातेवाईक व ग्रामस्थांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# दुचाकीवरून पडून युवक जखमी

कोल्हापूर ता.२८(प्रतिनिधी)

तावडे हॉटेल परिसरात दुचाकीवरून पडल्याने चंद्रशेखर दिपक मोहिते (वय ४५ रा.मंगळवार पेठ, कोल्हापूर) हा युवक जखमी झाला.२८ मे रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला. गांधीनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार घेऊन मोहिते यांनी सीपीआर रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. सीपीआर पोलीस चौकीत याची नोंद झाली आहे.

# गुजरात-राजस्थानमध्ये 'महामुकाबला'

**चंडीगढ,ता.२८–**

**इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२६ च्या प्लेऑफमध्ये राजस्थान रॉयल्सने सनरायझर्स हैदराबादचा ४७ धावांनी धुव्वा उडवला. या विजयासह त्यांनी आयपीएल ट्रॉफीच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले आहे. बुधवारी (दि. २७) झालेल्या एलिमिनेटर सामन्यात राजस्थानने सर्व विभागांत उत्कृष्ट कामगिरी केली आणि क्वालिफायर २ मध्ये आपली जागा पक्की केली. आता अंतिम फेरीतील दुसरा संघ निश्चित करण्यासाठी राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात क्वालिफायर २ सामना रंगणार आहे.**

एलिमिनेटर सामन्यात प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्सने २४३ धावांचा डोंगर उभा केला. या डावाचा मुख्य शिल्पकार ठरला १५ वर्षीय वैभव सूर्यवंशी. त्याने अवघ्या २९ चेंडूंमध्ये ९७ धावांची वादळी खेळी करत १२ षटकार आणि ५ चौकारांची आतषबाजी केली. एका हंगामात सर्वाधिक ६५ षटकार मारण्याचा विक्रमही त्याने आपल्या नावावर केला. यापूर्वी हा विक्रम ख्रिस गेलच्या नावावर ५९ षटकारांसह १४ वर्षांपासून कायम होता. ध्रुव जुरेलनेही २१ चेंडूंमध्ये ५० धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली.२४४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सनरायझर्स हैदराबादची सुरुवात खराब झाली. पॉवरप्लेमध्येच संघाने चार विकेट्स गमावल्या आणि अखेर संपूर्ण संघ १९६ धावांवर सर्वबाद झाला. राजस्थानच्या गोलंदाजांनीही अचूक गोलंदाजी करत हैदराबादला महत्वपूर्ण सामन्यात धूळ चारली.

गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातील क्वालिफायर २ सामना शुक्रवार, २९ मे रोजी महाराजा यादवेंद्र सिंग पीसीए स्टेडियम, मुल्लानपूर, न्यू चंदीगड येथे खेळवला जाणार आहे. भारतीय वेळेनुसार हा हायव्होस्टेज सामना सायंकाळी ७:३० वाजता सुरू होईल, तर नाणेफेक ७ वाजता होणार आहे. या सामन्याचा विजेता संघ अंतिम फेरीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूशी २०२६ च्या ट्रॉफीसाठी भिडणार आहे. या सामन्याचे थेट प्रक्षेपण स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर पाहता येणार असून जिओहॉटस्टार ॲप आणि वेबसाइटवर लाइव्ह स्ट्रीमिंग उपलब्ध असेल.

**गुजरात टायटन्स संघ :** शुभमन गिल, साई सुदर्शन, जोस बटलर (विकेटकीपर), जेसन होल्डर, इशांत शर्मा, जयंत यादव, कागिसो रबाडा, राहुल तेवतिया, ल्यूक वूड, शाहरुख खान , साई किशोर, वॉशिंग्टन सुंदर, राशीद खान, मोहम्मद सिराज, ग्लेन फिलिप्स, प्रसिद्ध कृष्णा, कुलवंत खेजरोलिया, अनुज रावत, कुमार कुशाग्र, मानव सुथार, कोनोर एस्टरहुइझेन, गुरनूर ब्रार, निशांत सिंधू, अरशद खान, अशोक शर्मा.

**राजस्थान रॉयल्स संघ :** रियान पराग, वैभव सूर्यवंशी, यशस्वी जैस्वाल, रवींद्र जडेजा, ॲडम मिल्ने, संदीप शर्मा, डोनोव्हन फरेरा, ध्रुव जुरेल, युद्धवीर सिंग, दासुन शनाका, जोफ्रा आर्चर, शिमरॉन हेटमायर, तुषार देशपांडे, नांद्रे बर्गर, कुलदीप, शुभम दुबे, रवी बिश्नोई, सुशांत मिश्रा, विघ्नेश पुथूर, अमन राव, अमनजोत सिंग चहल, यश पुंजा, रवी सिंग, ब्रिजेश शर्मा, क्वेना मफाका, लुआन-ड्रे प्रिटोरियस.



## पावसामुळे सामना रद्द झाला तर फायनलमध्ये कोण जाणार?

२०२६ च्या फायनलसाठीची शर्यत आता शेवटच्या टप्प्यात पोहोचली आहे. विद्यमान विजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आधीच अंतिम फेरीत धडक मारली असून आता दुसरा संघ कोणता असणार, याकडे क्रिकेट चाहत्यांचे लक्ष लागले आहे. गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात होणाऱ्या क्वालिफायर-२ सामन्यातून फायनलचा दुसरा संघ ठरणार आहे. मात्र, या सामन्यावर पावसाचे सावट असेल आणि सामना रद्द झाला, तर फायनलचे तिकीट कोणाला मिळणार? हा प्रश्न अनेकांच्या मनात आहे.

याचे उत्तर आयपीएलच्या नियमांमध्ये दडले आहे. जर क्वालिफायर-२ सामना पावसामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे पूर्णपणे रद्द झाला आणि एकही चेंडू टाकता आला नाही, तर सामन्याचा निकाल ठरवण्यासाठी प्रथम 'सुपर ओव्हर'चा पर्याय तपासला जाईल. मात्र, परिस्थिती इतकी बिघडली की सुपर ओव्हरही खेळता आली नाही, तर मग लीग स्टेजमधील गुणतालिकेच्या आधारे निर्णय घेतला जाईल. अशा परिस्थितीत गुजरात टायटन्सला मोठा फायदा होणार आहे.

कारण, २०२६ च्या लीग स्टेजनंतर गुजरात टायटन्स गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर होती, तर राजस्थान रॉयल्स चौथ्या स्थानावर होती. त्यामुळे सामना पूर्णपणे रद्द झाल्यास किंवा निकाल लागण्याची शक्यता नसेल, तर नियमांनुसार गुजरात टायटन्स थेट फायनलमध्ये पोहोचेल आणि राजस्थानचा प्रवास संपेल.

रविवारी ३१ मे रोजी होणाऱ्या फायनलमध्ये आधीच रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने स्थान निश्चित केले आहे. आता बंगळुरूचा सामना गुजरात टायटन्सशी होणार की राजस्थान रॉयल्सशी, याचा फैसला शुक्रवारच्या क्वालिफायर-२ सामन्यात होईल.

# तिसऱ्या फेरीत प्रज्ञानंदची मॅग्नस कार्लसनवर मात

**ओस्लो,ता.२८–**

**भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने बुधवारी नॉर्वे चेस २०२६ च्या तिसऱ्या फेरीत जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या मॅग्नस कार्लसनला पराभूत करत धक्कादायक निकालाची नोंद केली. प्रज्ञानंदने उत्कृष्ट रणनीतिक खेळाचे प्रदर्शन करत ओस्लोमधील हा क्लासिकल सामना जिंकला. सामन्याच्या बहुतांश वेळेत प्रज्ञानंद मजबूत स्थितीत असल्याचे दिसत होते. वेळेच्या दबावामुळे काही काळासाठी सामना कार्लसेनच्या बाजूने झुकत असल्याचे दिसत असले तरी, त्यानंतर लगेचच या नॉर्वेजियन स्टार बुद्धिबळपटूने एक मोठी चूक केली आणि त्याला पराभव स्वीकारावा लागला.**

विश्वविजेता डी. गुकेश आणि स्पर्धेत आघाडीवर असलेला अलीरेझा फिरौजा यांच्यातील क्लासिकल सामना अत्यंत चुरशीचा



झाला आणि अखेरीस बरोबरीत संपला. त्यानंतरच्या आर्मागेडन सामन्यात, फिरौजाने विजय मिळवून अतिरिक्त गुण मिळवले आणि गुणतालिकेतील आपली आघाडी कायम राखली.

व्हिन्सेंट केमर आणि वेस्ली सो यांच्यातील क्लासिकल सामनाही बरोबरीत सुटला. वेस्ली सो ने नंतर आर्मागेडन सामना जिंकला. तिसऱ्या फेरीनंतर, अलीरेझा फिरौजा गुणतालिकेत अव्वल स्थानी कायम आहे.

नॉर्वे बुद्धिबळ महिला स्पर्धेतील सर्व क्लासिकल सामने बरोबरीत सुटल्याने आर्मागेडन सामने खेळवले गेले. महिला विश्वविजेती जू वेनजुन आणि झू जिनर यांच्यात एक चुरशीची लढत पाहायला मिळाली. एका क्षणी झू जिनर मजबूत स्थितीत होती, पण तिला त्याचे विजयात रूपांतर करता आले नाही. झू जिनरने नंतर आर्मागेडन सामना जिंकून अतिरिक्त गुण मिळवले. मुझीचुक आणि भारतीय ग्रँडमास्टर कोनेरू हम्पी यांच्यातील क्लासिकल सामना बरोबरीत सुटला. मुझीचुकने नंतर आर्मागेडन सामना जिंकला.

स्पर्धेत आघाडीवर असलेल्या बिबिसारा असौबायेवा आणि भारताच्या दिव्या देशमुख यांच्यातील क्लासिकल सामनाही अनिर्णित राहिला. त्यानंतर दिव्या देशमुखने शानदार कामगिरी करत आर्मागेडन सामना जिंकला. तिसऱ्या फेरीनंतरही महिलांच्या गटात बिबिसारा असौबायेवा आघाडीवर आहे. पण दिव्या देशमुख आणि झू जिनर यांनी हे अंतर कमी केले आहे.

## महेंद्रसिंह धोनी आयपीएल २०२७ मध्ये खेळणार का?

**नवी दिल्ली,ता.२८–**

**आयपीएल २०२६ मध्ये चेन्नई येथे झालेल्या सीएसकेच्या अंतिम सामन्यानंतर धोनीने चाहत्यांना अभिवादन केले. त्यामुळे धोनी अचानक निवृत्ती जाहीर करू शकतो अशी भीती चाहत्यांना आहे. कारण त्याने यापूर्वी असे केले आहे.**

महेंद्रसिंह धोनीच्या चाहत्यांना धोनीने सामना खेळून निवृत्त व्हावे अशी इच्छा व्यक्त केली आहे. त्यामुळे पुढच्या पर्वात धोनीने खेळावे अशी मागणी जोर धरत आहे. दुसरीकडे, महेंद्रसिंह धोनीनेही पुढच्या पर्वात खेळणार की नाही याबाबत स्पष्ट काही सांगितलेले नाही. असे असताना चेन्नई सुपर किंग्सचे सीईओ काशी विश्वनाथन यांनी धोनीच्या आयपीएल २०२७ मध्ये सहभागी आणि निवृत्तीबाबत माहिती दिली आहे.

क्रिकबझशी दिलेल्या मुलाखतीत सीएसकेचे सीईओ काशी विश्वनाथन म्हणाले की, ''मला विश्वास आहे की तो पुढच्या हंगामात परत येईल. आम्ही अद्याप त्याच्याशी याबद्दल बोललो नाही, पण आम्हाला आशा आहे की धोनी परत येईल.''



# पी. व्ही सिंधू, लक्ष्य सेन आणि सात्विक-चिराग उपांत्यपूर्व फेरीत

**सिंगापूर,ता.२८–**

**दोन वेळ ऑलिम्पिक पदक विजेत्या पी.व्ही सिंधूने सिंगापूर ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. महिला एकेरीच्या सामन्यात सिंधूने जपानच्या रिको गुंजीचा २१-९, २१-१२ असा पराभव करून पुढील फेरीत प्रवेश केला. सिंधूचा पुढील प्रवास सोपा नसेल, कारण उपांत्यपूर्व फेरीत तिचा सामना कोरियाच्या अव्वल मानांकित ॲन से यंगशी होणार आहे.**

पॅरिस २०२४ चा रौप्यपदक विजेता, थायलंडचा कुन्लावुत विटिडसर्न याने सामना सुरू होऊन अवघ्या एका मिनिटात आणि केवळ दोन गुणांनंतरच माघार घेतल्यामुळे, लक्ष्य सेनला उपांत्यपूर्व फेरीत वॉकओव्हर मिळाला. शुक्रवारी होणाऱ्या उपांत्यपूर्व फेरीत लक्ष्य सेनचा सामना जपानच्या, जागतिक क्रमवारीत १९ व्या क्रमांकावर असलेल्या कोकी वातानाबे याच्याशी होईल.

भारताच्या चौथ्या मानांकित पुरुष दुहेरी जोडी सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांना मात्र उपांत्यपूर्व फेरीत पोहोचण्यासाठी चांगलचे कष्ट करावे लागले. त्यांनी चायनीज तैपेईच्या ली झी हुई आणि यांग पो सुआन यांचा २१-१५, ११-२१, २१-१८ असा पराभव केला. सात्विक आणि चिराग यांचा सामना आता मलेशियाच्या खाई जिंग कांग आणि ॲरॉन ताई यांच्याशी होणार आहे.

ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो या भारतीय मिश्र दुहेरीच्या जोडीनेही उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. त्यांनी जपानच्या युटा वातानाबे आणि माया तागुची यांचा ८-२१, २१-१७, २१-१६ असा पराभव केला. या भारतीय जोडीचा सामना आता किम जे ह्योन जांग आणि हा जोंग किंवा तिसरे मानांकित मलेशियन जोडी चेन टँग जी आणि तोह ई वेई यांच्यापैकी एकाशी होईल.

# ईशा सिंगला विश्वविक्रमासह सुवर्णपदक

**म्युनिक,ता.२५–**

**ईशा सिंगने महिलांच्या २५ मीटर पिस्तूल प्रकारात शानदार कामगिरी करत विश्वविक्रमासह सुवर्णपदक पटकावले. तीन वेळा विश्व चॅम्पियनशिप पदक विजेत्या ईशाने आयएसएसएफ विश्वचषकाच्या दुसऱ्या दिवशी भारताच्या पदकाचे खाते उघडले. या भारतीय नेमबाजने अंतिम फेरीत ४३ गुणांचा विश्वविक्रम नोंदवला आणि यजमान जर्मनीच्या माजी विश्वविजेत्या डोरीन वेनेकॅम्पवर पाच गुणांनी मात केली. बल्गेरियाच्या मिरोस्लावा मिंचेवाने कांस्यपदक जिंकले.**



ऑलिंपिक शूटिंग रेंजवर झालेल्या अंतिम फेरीत ईशाने सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवले. तिने पहिल्या तीन सिरीजमध्ये अचूक गुण मिळवून इतर स्पर्धकांवर मोठी आघाडी घेतली. ईशाने दोन वर्षांपूर्वी बाकू येथे कोरियाच्या किम ये-जीने नोंदवलेला ४२ गुणांचा विश्वविक्रम मोडला. तिने यांग जिनचा ४१ गुणांचा ज्युनियर विश्वविक्रमही मागे टाकला. विद्यमान ऑलिम्पिक चॅम्पियन यांग जिन या स्पर्धेत पाचव्या स्थानावर राहिली.ईशाने पात्रता फेरीच्या प्रिसिजन राऊंडमध्ये २९३ आणि रॅपिड फायर राऊंडमध्ये २९४ गुण मिळवले. एकूण ५८७ गुणांसह, तिने चौथ्या स्थानावर अंतिम फेरीसाठी पात्रता मिळवली. इतर भारतीय नेमबाज मनू भाकर आणि राही सरनोबत यांनी अनुक्रमे ५८२ आणि ५८१ गुणांसह १२वे आणि १४वे स्थान पटकावले.

सुवर्णपदक जिंकल्यानंतर ईशा सिंग म्हणाली, ''म्युनिक माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. येथील पिस्तूल प्रकारातील स्पर्धा खूप कठीण आहे. पहिल्या ८ मध्ये स्थान मिळवणे देखील सोपे नाही. येथे स्पर्धा करण्याची ही माझी तिसरी वेळ होती आणि मला यावेळी जिंकायचे होते. अंतिम फेरीच्या दबावाबद्दल ती म्हणाली, मी अजिबात शांत नव्हते. एका क्षणी माझा डावा हात थरथरत होता. मी खूप घाबरले होते, पण आमच्या खेळात तुम्हाला त्या दबावाला सामोरे जावेच लागते आणि यालाच अनुभव म्हणतात.

# छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयातील विविध सेवांचा आज लोकार्पण सोहळा

## मंत्री मुश्रीफ व आम. क्षीरसागर यांची उपस्थिती

**कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी) –**

**छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयाचे नूतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या रुग्णालयातील विविध नूतनीकृत सेवा-सुविधांचा लोकार्पण सोहळा वैद्यकीय शिक्षण मंत्री नाम. हसन मुश्रीफ यांच्या हस्ते व राज्य नियोजन मंडळाचे अध्यक्ष आम. राजेश क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. शुक्रवारी ता. २९ रोजी सायंकाळी चार वाजता सी. पी. आर. हॉस्पिटल परिसरात हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाला जिल्ह्यातील विविध लोकप्रतिनिधीही उपस्थित राहणार आहेत.**



दरम्यान सी. पी. आर. चे नूतनीकरण व विभागनिहाय सेवा-सुविधांचे आधुनिकीकरण ही सर्व कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. या सर्व कामांचा एकत्रित लोकार्पण सोहळा लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते केला जाणार आहे.

या कार्यक्रमात लोकार्पण होणाऱ्या सेवा सुविधांची माहिती अशी.....,

इंटेन्सिव्ह रेस्पिरेटरी केअर युनिट आय. आर. सी. यु. संलग्न पल्मनरी लॅबोरेटरी-

बेड-१० , व्हेंटिलेटर सुविधा, मल्टीपॅरा मॉनिटर,श्वसन विकाराचे अत्यवस्थ रुग्ण व फुफुसासंबंधीच्या आजारांचे निदान व उपचार.

सर्जिकल आय. सी. यू.-बेड-१६ , व्हेंटिलेटर सुविधा, मल्टीपॅरा मॉनिटर्स

सर्जरी, अपघात (ट्रॉमा) च्या अत्यवस्थ रुग्णांसाठी उपयुक्त.

मेडिकल आय. सी. यू.-बेड-४० , व्हेंटिलेटर सुविधा, मल्टीपॅरा मॉनिटर

मेडिसिनच्या अत्यवस्थ रुग्णांसाठी उपयुक्त.

रोबोटिक आर्मयुक्त फिजिओथेरपी लॅब-पश्चिम महाराष्ट्रात पहिल्यांदाच शासकीय रुग्णालयात रोबोटिक आर्मद्वारे फिजीओथेरपी होणारे युनिट.

रोबोटीक गेट ट्रेनिंग सिस्टीम, फिजिओथेरपी व ऑक्युपेशनल थेरपी अद्ययावत यंत्रसामुग्री.

फार्माकोजेनेटिक लॅब-जनुकीय तपासणीद्वारे होणार नेमके औषधोपचार

अत्याधुनिक कान, नाक व घसा विभाग.ऑडिओमेट्री आणि बेरा युनिट,कर्णबधिर रुग्णांचा आवाज ऐकण्याची व तपासण्याची क्षमता व दिव्यांग प्रमाणपत्रासाठी.

## डी.व्ही. पाटील स्मृतीचषक क्रिकेट स्पर्धेत

# द्रोणा स्पोटर्स निपाणी विजेता

**निपाणी दि.२७ (प्रतिनिधी)–**

**येथील दिवंगत माजी नगराध्यक्ष डी.व्ही. पाटील यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ हिंदवी स्पोर्ट्स क्लबतर्फे आयोजित पाचव्या पर्वातील डी. व्ही. पाटील स्मृती चषकावर निपाणीतील द्रोणा स्पोर्टस संघाने आपले नाव कोरले. या संघाला रोख ५१ हजार रुपये आणि चषक देण्यात आला.**



अर्जुननगर येथील एम.डी. विद्यालय मैदानावर या स्पर्धा पार पडल्या. गुरुवारी (ता.२८) पाचगाव परमणे टेडर्स आणि निपाणीतील द्रोणा स्पोर्ट्स यांच्यात उपांत्य सामना झाला. चुरशीच्या या सामन्यात द्रोणा स्पोर्ट् ने विजय मिळवला. त्यानंतर कुरली स्पोर्ट्स क्लब विरुद्ध कोगनोळी स्पोर्ट्स क्लब यांच्यात दुसरा उपांत्य सामना झाला. त्यामध्ये कुरली संघाने एकतर्फी विजय मिळविला. सायंकाळी द्रोणा स्पोर्ट्स निपाणी आणि कुरली स्पोर्ट्स संघात अंतिम सामना पार पडला. या संघात दोन सामने खेळविण्यात आले. कुर्ली संघाने प्रथम फलंदाजी करताना ३७ धावा केला. तर निपाणी संघाने ५० धावा केल्या. दुसऱ्या सामन्यात कुर्ली संघाने ४२ धावा केल्या. निपाणीला ३० बॉलमध्ये ३० धावा गरज असताना दोन ओव्हरमध्ये ३० धावा करून दणदणीत विजय मिळविला.

उपविजेत्या कुरली संघाला रोख २५ हजार रुपये आणि चषक तर तृतीय क्रमांक पटकावलेल्या पाचगाव परमने ट्रेडर्स व चतुर्थ कोगनोळी संघाला रोख ७ हजार ५०० रुपयांचे बक्षीस देण्यात आले. मालिकावीर सागर कमते कुरली, सामनावीर श्रेयस मातीवडर निपाणी, उत्कृष्ट संघ पाटील स्पोर्ट्स तमनाक वाडा, उत्कृष्ट झेल गणेश कांबळे कडगाव, शिस्तबद्ध खेळाडू रोहित खांडेकर कोडणी, उत्कृष्ट फलंदाज शुभम नागेश निपाणी, उत्कृष्ट गोलंदाज श्रेयस मातीवडर निपाणी या खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. डी.डी. हळवणकर यांनी स्पर्धेचे समालोचन केले.

यावेळी टाऊन प्लॅनिंग अध्यक्ष निकु पाटील, ॲड. अशोक शिंदे, निपाणी ब्लॉक काँग्रेस अध्यक्ष राजेश कदम, पंकज पाटील, सुजय पाटील, सुप्रिया पाटील, किरण कोकरे, किरण पाटोळे, विजय शेटके, रवींद्र श्रीखंडे, अरुण आवळेकर, सागर पाटील, नितीन उपाळे, स्वप्निल पावले, रणजीत मगदूम, विनोद बल्लारी, कृष्णा कुंभार, सचिन काटकर, सुरेश घाटगे, रमेश भोईटे, पुंडलिक कुंभार यांच्यासह शेकडो क्रिकेट प्रेमी उपस्थित होते.